म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं: नं. २०१

# पुरुष

(…वृत्ति)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा
अनुक्र. नं.
विभाग निबंध
पुस्तकाचें नांव
लेखक
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006474

किंमत २ रुपये

[illegible] ~~२३५~~ ३४.

# स्त्री आणि पुरुष

( दुसरी आवृत्ति )

लेखक

वि. स. खांडेकर

REFBK-0006474

किंमत २ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक :
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
१९१ शनिवार पेठ, पुणें २

संचालक :
भ. व्यं. देशमुख,
बी. ए., एल्‌एल्. बी.

पहिली आवृत्ति १९४४
दुसरी आवृत्ति १९४४

१ सर्व हक्क सौ. उषा खांडेकर यांच्या स्वाधीन आहेत.

२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.

मुद्रक :
रा. का. तटणीस,
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४ ठाकुरद्वार, मुंबई नं. २

# सप्रेम समर्पण

वामन माईणकर

व

सौ. वैजयंती माईणकर

यांस—

## भूमिका

गेल्या नोव्हेंबरडिसेंबरमधली गोष्ट. प्राज्ञ परीक्षेची तयारी करणाऱ्या दोन विद्यार्थिनी 'महाराष्ट्र शारदा' या काव्यसंग्राहांतील कांहीं शंका मला विचारीत होत्या. केशवसुतांच्या 'प्रतिभे'पाशीं त्यांनीं अडखळावें हें मला स्वाभाविकच वाटलें. त्या कवितेंतील कल्पनाविलास ढगांतून संचार करणाऱ्या विमानाप्रमाणें मनोहर व किंचित् अद्‌भुतरम्य असला, तरी तिची रचना थोडीफार क्लिष्टच आहे. फणस पिका असला तरी तो कापावा तेव्हांच त्यांतील गऱ्यांचा सुगंध आणि गोडी यांची खरी कल्पना आपल्याला येते. 'प्रतिभे' सारख्या कविताही याच वर्गांत मोडतात. महाराष्ट्रशारदेंतील इतर अनेक संस्कृतप्रचुर कवितांतही त्या विद्यार्थिनी मधूनमधून ठेंचकाळतच होत्या. त्याचेंही मला विशेष नवल वाटलें नाहीं. कुठल्याही म्युनिसिपालिटीच्या ताब्यांतील रस्त्याप्रमाणेंच असलीं काव्यें असतात. मधूनमधून लहानलहान अणकुचीदार दगड वर डोकें काढून बसल्याशिवाय त्या रस्त्यांना जशी शोभा येत नाहीं, तसें असल्या कवितांत कठिण शब्द व क्लिष्ट समास यांची पेरणी केल्यावांचून कवीला आपण काव्य केलें असें वाटत नाहीं.

त्या मुलींच्या शंका संपल्या असें वाटून मी उठणार इतक्यांत त्या म्हणाल्या, 'आणखी एकच कविता हं!' आतां कोणत्या प्रकारच्या कविराजाशीं आपल्याला टक्कर द्यावी लागणार याचा कुतूहलानें विचार करीत मी खालीं बसलों. त्या मुलींनीं मला पृष्ठांक सांगितला. मीं तें पान उघडून कवितेकडे

पाहिलें मात्र! मी एकदम बोलून गेलों, 'अगदीं सोपी कविता आहे ही! अडण्यासारखं काय आहे हिच्यांत?'

ती विनायक कवीची 'फुललिं फुलें, त्यायोगें उपवन खुललें' या गोड ओळींनीं प्रारंभ होणारी एक चिमुकली सुंदर कविता होती. मनोरंजनाच्या फार जुन्या अंकांत बारीक टाइपांत छापलेली ही चिमुकली कविता मीं कॉलेजांत गेलों त्या वर्षी प्रथम वाचली होती. तिच्यांत कांहीं तरी विशेष आकर्षकता आहे असें त्यावेळींसुद्धां मला वाटलें होतें. पुढें विनायकाच्या काव्यसंग्रहाचे रसिक प्रस्तावनाकार प्रि. वासुदेवराव पटवर्धन यांनीं कवीच्या प्रतिभेचा एक मनोहर विलास म्हणून तिचा जो उल्लेख केला, तोही मला यथार्थ वाटला होता. या कवितेची रचना इतकी प्रसादपूर्ण आहे आणि तिच्यांत रेखाटलेलें चित्र इतकें परिणामकारक आहे कीं—

मीं त्या सुरस कवितेचा अर्थ अगदीं बालबोध मराठींत त्या मुलींना सांगितला. पण त्या मुलींच्या मुद्रांवर समाधानाचा आनंद कांहीं दृग्गोचर झाला नाहीं. मी विचार करूं लागलों. नुसत्या स्पर्शज्ञानानें हत्तीची कल्पना करणाऱ्या आंधळ्यांच्या मतांत दोन ध्रुवांचें अंतर पडावें हें स्वाभाविकच आहे! पण डोळस माणसांच्या वर्णनांतही तसेंच अंतर पडूं लागलें तर? एकदम एक कल्पना माझ्या मनांत येऊन गेली—या कवितेची मध्यवर्ती कल्पनाच या मुलींना पटली नसावी. त्या कल्पनेवर पिढ्यान् पिढ्या अनेक कवींनीं सुंदर काव्यमंदिरें उभारलीं होतीं, आणि रसिकांनीं त्यांचीं स्तुतिस्तोत्रेंही गायिलीं होतीं. पण १९४३ च्या या मुलींना ती कल्पना म्हणजे एक मोहक पण भ्रामक कविसंकेत आहे असें वाटत असलें तर? भाव तिथें देव हें जितकें खरें, तितकेंच जसा भाव तसें काव्य हेंही सत्य आहे.

या नव्या दृष्टीनें मीं ती कविता पुन्हा वाचली. परंपरागत रूढी आणि कायदे यांच्याप्रमाणें कविसंकेतही अगदीं आपल्या रक्तांत कसे भिनून गेले असतात, हें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. त्या कवितेचें सौंदर्य मला अजूनही मोह घालीत होतें. पण हृदय हालवून सोडण्याचें तिचें सामर्थ्य—तें मात्र या नवीन दृष्टीनें एका क्षणांत नाहींसें करून टाकलें.

या चिमण्या कवितेचा सर्वसाधारण आशय एवढाच आहे—एका रम्य उद्यानांत एक स्त्री सहज फिरायला येते. एका सुंदर फुलाकडे तिचें लक्ष वेधलें

जातें. त्याचें कौतुक करण्यांत अगदीं दंग होऊन जाते ती ! इतक्यांत तेथें एक पुरुष येतो, तोही तें फूल पाहतो. त्यालाही तें फार फार आवडतें. पण तो तें लगेच तोडून त्याचा वास घेतो आणि वास घेऊन होतांच तें चुरगुळून फेंकून देऊन तो तेथून निघून जातो. बिचारी स्त्री हें सारें मुकाट्यानें पाहत असते. तिच्या डोळ्यांतून अश्रु ठिबकूं लागतात.

या चित्रणांतील कोमलता आणि सूचकता मला नेहमींच मोठी सुंदर वाटत आली होती. पण आतां माझ्यापुढें एक विचित्र प्रश्न येऊन पडला. केवळ सौंदर्यानें एखादी कलाकृति परिणामकारक ठरते काय ? छेः ! त्या सौंदर्याला सत्याची जोड हवीच हवी ! कल्पकतापूर्ण चमत्कृतीचा उत्कट आणि व्यापक अनुभूतीशीं ज्यांत संगम होतो तेंच खरें वाङ्मय. विनायकाच्या या कवितेंतील अनुभव मागच्या पिढीच्या वाचकांना खरा वाटला असेल ! पण आजच्या पिढीला तो—

आयुष्यभर स्त्री कोमल भावनांची पूजा करीत राहते, उलट पुरुष पराक्रमाच्या नादांत कठोर होऊन जातो अशी जी जुन्या काळची सर्वसामान्य समजूत, तिचेंच या कवितेंत कलापूर्ण प्रतिबिंब पडलें आहे. पण ही समजूत हें सनातन सत्य आहे. परिस्थितीनें उत्पन्न केलेलें अर्धसत्य आहे कीं सत्याभास निर्माण करणारा तो एक रम्य कविसंकेत आहे ?

स्त्री आणि पुरुष यांच्या मनांत खरोखरच दोन ध्रुवांचें अंतर आहे का ? निसर्गानें पुरुषाला घडवितांना वज्राच्या कठोरपणाशिवाय दुसरें कांहींच वापरलें नाहीं आणि स्त्री निर्माण करतांना कुसुमाच्या कोमलपणाखेरीज दुसऱ्या कशालाही हात लावला नाहीं, ही सौंदर्यवेड्या कवींची मधुर कल्पना आहे, का मानवजातीच्या वांट्याला आलेलें तें एक अनुभवसिद्ध कटु सत्य आहे ?

वैचित्र्यपूर्ण मानवी जीवनाचें आणि स्वभावाचें प्रतिबिंब ज्याच्या सुंदर कलाकृतींत पडलेलें आहे, अशा आजपर्यंत होऊन गेलेल्या प्रतिभावान् कवि-लेखकांचें जागतिक संमेलन भरविलें तरी सुद्धां या प्रश्नांचें निश्चित उत्तर मिळेल कीं नाहीं याची शंकाच आहे. गडकरी विनोदपंडित असूनही गंभीरपणानें उद्गारतील 'पुरुष परमेश्वराची कीर्ति आहे; पण स्त्री ही परमेश्वराची मूर्ति आहे!' उलट मोलियर गडकऱ्यांकडे पाहून मिस्किलपणानें हंसत आपली एक आठवण सांगूं लागेल. त्याच्या वेळीं कांहीं कांहीं राज्यांत चौदा

वर्षांच्या राजपुत्रांना सुद्धां सिंहासनारूढ होतां येत असे; मात्र अठरा वर्षें झाल्याशिवाय त्यांना लग्न करतां येत नसे. असा फरक करण्याचें कारण काय असा कोणी तरी मोलियरला प्रश्न केला. त्यानें तत्काळ उत्तर दिलें, 'राज्य ताब्यांत ठेवण्यापेक्षां बायको ताब्यांत ठेवणें हें अधिक कठीण काम आहे.' (*It is more difficult to rule a wife than a kingdom*) शेक्स्पीयरनें विविध कथनकांच्या अनुषंगानें स्त्रियांची पुष्कळ स्तुतिनिंदा केली असली, तरी त्याचें अतिशय सुटसुटीत व म्हणूनच जगप्रसिद्ध असें चार शब्दांचें जें वाक्य आहे तें स्त्रीजातीची उघड उघड बदनामी करणारें आहे. स्त्री ही चंचलपणाची प्रतिमाच आहे असें तो म्हणतो. (*Frailty, thy name is woman*) पण स्त्रियांविषयीं इतके अनुदारपणाचे उद्गार काढणाऱ्या शेक्स्पीयरशीं काव्यप्रतिभेच्या दृष्टीनें तुल्यबल असलेल्या कालिदासाकडे पाहावें, तर तो स्त्रीजातीची स्तुतिसुमनांनीं पूजा करण्यांत गुंग होऊन गेलेला दिसेल. 'गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ' हा कविकुलगुरूचा चरण नुसत्या कल्पनारम्यत्वामुळें पिढ्यान् पिढ्या लोकांच्या जिव्हाग्रावर नाचत राहिला नसता. तो हृदयगम्य आहे, त्यांत सूचित केलेलें सत्य प्रत्येक पुरुषाच्या प्रत्ययाला केव्हां ना केव्हां तरी येतेंच येतें, आणि म्हणूनच ध्रुवताऱ्याप्रमाणें अढळ असणाऱ्या सुभाषितांत अगदीं अग्रभागीं त्याची गणना झाली आहे. मात्र मोहक रमणी आणि चतुर गृहिणी, पोक्त सल्लागार आणि अल्लड शिष्या या भूमिका एकाच वेळीं तन्मयतेनें पार पाडणाऱ्या स्त्रीचें कालिदासानें कितीही कौतुक केलें असलें, तरी जगांतील अनेक कवींनीं आपला अनुभव अगदींच निराळा असल्याची ठिकठिकाणीं कबुली दिली आहे हें विसरून चालणार नाहीं. एक पारशी कवि म्हणतो–'जगाच्या प्रारंभीं अल्लानें एक गुलाब, एक कमळ, एक कबुतर, एक साप, थोडा मध आणि मूठभर माती एवढ्या गोष्टी एकत्रित करून त्या मिश्रणाकडे पाहिलें मात्र! अरे बाप रे! जगांतली पहिली स्त्री तेथें निर्माण झाली होती.'

स्त्रियांविषयीं असले काव्यमय अथवा विनोदी, गंभीर अगर मिस्किल उद्गार शेंकडों लेखकांनीं काढले आहेत. वाङ्मयनिर्मितीच्या क्षेत्रांत प्राचीन काळीं स्त्रिया फारशा वावरत नसल्यामुळें पुरुषाविषयींचे त्यांचे लेखी जबाब विपुल प्रमाणांत आढळत नाहींत हें खरें. पण पुरुषाच्या भ्रमरवृत्तीचा

अवास्तव डांगोरा पिढयान् पिढया त्याच पिटीत आल्या आहेत हें कांहीं खोटें नाहीं. ‘साप म्हणूं नये धाकला नि नवरा म्हणूं नयें आपला’ या मार्मिक लौकिक म्हणीचा उगम स्त्री–मनांतच झाला असला पाहिजे हें उघड आहे. अशा प्रकारच्या उद्गारांत सत्याचा अंशसुद्धां नसतो असें पुरुष तरी कोणत्या तोंडानें म्हणणार? फ्रान्सचा प्रसिद्ध मुत्सद्दी क्लेमेंको या नरव्याघ्र म्हणून गाजलेल्या गृहस्थाची एक गोष्ट सुप्रसिद्धच आहे. आपल्या ऐंशिआव्या वाढदिवशीं तो एका स्नेह्याबरोबर बागेंत फिरायला गेला होता. एक देखणी मुलगी सहज त्याच्या अंगावरून गेली. लगेच क्लेमेंको उद्गारला, “पुन्हा सत्तर वर्षांचा होण्यांत केवढी मौज आहे!”

स्त्री अथवा पुरुष यांची काव्य आणि कथा यांच्या अनुरोधानें अशी जी स्तुतिनिंदा होते, तिचें स्वरूप एकांगी असावें यांत नवल नाहीं. पण स्त्रीपुरुषांचें परस्परांविषयींचें आकर्षण व विवाहामुळें त्याला येणारें स्थैर्य यांच्याविषयींचे विविध व्यक्तींचे उद्गार वाचूं लागलें तरीदेखील मत-वैचित्र्याचा हाच विलक्षण अनुभव पदोपदीं येतो. गटे म्हणतो, ‘लग्नामुळें मनुष्याच्या आयुष्यांत इतकें सुख निर्माण होतें कीं चुकून त्याच्या जीवनांत दुःखानें प्रवेश केला तरी सुखाचें पारडें नेहमीं खालींच राहतें.’ गटेच्या या सुखस्वप्नांत गुंगत गुंगत लघुनिबंधाचा जनक मॅंटेन याच्याकडे वळलें कीं आश्चर्याचा धक्का बसल्या-वांचून राहत नाहीं. चिमणी जशी कोठेंही पडलेला दाणा टिपून घेते, त्याप्रमाणें लघुनिबंधकार जीवनांतील बारीकसारीक सुखें वेंचून तीं रंगवून दाखविण्यांत निपुण असतो अशी आपली समजूत आहे. पण मॅंटेन विवाहाविषयीं म्हणतो, ‘संसार सुखाचा व्हायचा असेल तर दांपत्यापैकीं नवरा बहिरा नि बायको आंधळी असेल तरच तें शक्य आहे!’ सिडने स्मिथचे उद्गार इतके मर्मभेदक नसले, तरी अधिक मार्मिक आहेत. तो म्हणतो, “लग्न ही एक कात्री आहे. पतिपत्नी हीं त्या कात्रीचीं दोन पातीं; हीं पातीं अनेकदां परस्परविरुद्ध दिशेनें हालचाल करीत असलीं तरी त्यांची ताटातूट होऊं शकत नाहीं. उलट त्यांच्यामध्यें येण्याचें धाडस करणाराच्या मात्र चिंधड्या उडाल्याशिवाय राहणार नाहींत!”

सिडने स्मिथच्या या वर्णनांत विनोदाइतकेंच सामान्य मनुष्याच्या संसारविषयक अनुभवाचें प्रतिबिंब पडलें असलें, तरी तो कांहीं मोठा तत्त्वज्ञ

म्हणून प्रख्यात नाहीं. अशी प्रसिद्धि पावलेल्या, 'नीत्शे' चे उद्गार पाहा— "स्त्री पुरुषाला नेहमींच बिलगते. पण तिचें खरें प्रेम कांहीं पुरुषावर नसतें. पुरुष हें तिच्या फक्त सुखाचें साधन आहे. तिचें साध्य? अपत्य हेंच तिचें साध्य असतें. बरें, पुरुष स्त्रीवर लुब्ध होतो तो काय प्रेमामुळें? छे:! पुरुषाला आयुष्यांत दोनच गोष्टी मुख्यत: हव्या असतात—साहस आणि क्रीडा. या नसतील तर त्याला आयुष्य अगदीं अळणी वाटेल. आपल्या या दोन्ही आवडत्या गोष्टींचा मिलाफ त्याला स्त्रीमध्यें आढळतो. पुरुषाला खेळायला एक भयंकर खेळणें हवें असतें व तें स्त्रीच्या रूपानें त्याला नेहमीं मिळतें!"

स्त्री हें पुरुषाचें सुंदर म्हणा अथवा भयंकर म्हणा, खेळणें आहे ही कल्पनाच विसाव्या शतकांतील मनुष्याला किती चमत्कारिक वाटते! जिच्या मांडीवर झोंके घेत घेत मुलाच्या जीवनकलिकेचा विकास होतो, आणि प्रसंगीं त्याच्या भावी मोठेपणाच्या संस्कारांचेंही बीजारोपण केलें जातें, ती आई हें एक खेळणें आहे? छे:! जिच्या प्रेमळ धीरावर पुरुष आयुष्यांतील अनेक संकटांना हंसतखेळत टक्कर देतो, जिच्या आधारावर असामान्य असें कांहीं तरी करण्याची ईर्ष्या बाळगतो, आणि जीवनसंग्रामांत वारंवार होणाऱ्या जखमा जिच्या स्पर्शाच्या संजीवनीनेंच त्याला सुसह्य वाटतात, ती पत्नी हें एक भयंकर खेळणें आहे? अशक्य! आपल्या अपूर्ण महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याकरितांच हिचा अवतार आहे या भावनेनें पिता जिच्या उज्ज्वल भविष्याकडे पाहत असतो, ती कन्या हें काय एक निव्वळ सुंदर खेळणें आहे? असल्या विधानांवर कोण विश्वास ठेवील? पतीच्या पावलावर पाऊल ठेऊन हंसतमुखानें वनवास स्वीकारणाऱ्या सीतेपासून पतीच्या हातांत हात घालून आनंदानें बंदिवासांत जाणाऱ्या आणि तेथें मृत्यूचें स्वागत करणाऱ्या कस्तुरबापर्यंतच्या सतींना जग विसरेल, तेव्हांच असल्या स्त्रीविषयक अर्धवट सत्यांत अर्थ आहे असें त्याला वाटूं लागेल. पतिप्रेमासाठीं पेटलेल्या यज्ञकुंडांत उडी घेणारी पार्वती, आपल्या हक्कासाठीं रणांगणावर विजलीप्रमाणें तळपणारी झांशीची लक्ष्मीबाई आणि देशभक्तीच्या पायीं दुबळ्या प्रकृतीची पर्वा न करतां प्रासादतुल्य घरांतून तुरुंगाच्या कोठडींत जाऊन बसणारी कमला नेहरू यांचीं मानधन आणि तेजस्वी चरित्रचित्रें पाहिल्यावर 'स्त्री हें खेळणें आहे' असें

म्हणण्याची कोणाची छाती होईल? उलट विस्मयानें आणि आदरानें प्रत्येक मनुष्य स्वतःशींच म्हणेल ' स्त्री ही देवता आहे.'

पण स्त्री ही देवता आहे हें सुद्धां एक अर्धसत्यच आहे. तें दिसायला सुंदर आहे, ऐकायला गोड आहे, ही गोष्ट निराळी—पण अनेक अर्धसत्यें कवंडळा-सारखीं असतात. दिसायला अत्यंत मोहक, पण आंत विलक्षण विषारी. स्त्री ही देवता आहे असें म्हणणाऱ्या पहिल्या पुरुषानें—मग तो कवि असो अथवा शास्त्रकार असो-तिला अतिशय मोठा अन्याय केला यांत संशय नाहीं. देवपणामुळें व्यक्तीला पूजेचा अधिकार प्राप्त होतो हें खरें. पण ही पूजा करतांना पुजारी नेहमीं आपल्या स्वार्थाकडेच लक्ष देत असतो हें विसरून चालणार नाहीं. देवाला नैवेद्य दाखविल्याशिवाय तो तोंडांत पाणीही घालीत नाहीं हें खरें असलें, तरी तो सारा नैवेद्य आपल्याच पोटांत जाणार आहे अशी खात्री त्याला असते म्हणूनच तो भक्तिभावाचें हें प्रदर्शन करूं शकतो. पुजारी देवाला नटवील थटवील, त्याची काकड आरति शेजारति करील, पालखींतून त्याच्या मौल्यवान मूर्तीची मिरवणूक काढील. त्याच्यापुढें हात जोडून डोळे मिटून घटकान् घटका त्याची प्रर्थनाही करील; पण पंचपक्वान्नांच्या नैवेद्यांतून आपला देव अन्नाच्या कणालाही शिवणार नाहीं, अंगावर घातलेल्या हिरेमोत्यांच्या दागिन्यांपैकीं एकही तो लपवून ठेवणार नाहीं किंवा हरवणार नाहीं आणि नवस करण्याकरितां अथवा फेडण्याकरितां आलेल्या धनिकांना ' मी शुद्ध दगड आहें, मी नवसाला पावत नाहीं ! ' हें सत्य तोंड उघडून तो कधींही सांगणार नाहीं याची मनोमन जाणीव असल्यामुळेंच पुजारी देवाचें देवपण आनंदानें मान्य करीत असतो; इतकेंच नव्हे, तर हें देवस्थान जागृत आहे म्हणून त्याचा डंका पिटूं लागतो.

स्त्रीच्या देवतापदाच्या इतिहासाची कथा याहून फारशी भिन्न नाहीं. ' यत्र नार्यस्तु पूज्यंते रमन्ते तत्र देवताः ' हा सुंदर चरण लिहिणाऱ्या शास्त्रकाराची आपण चिरंतन सामाजिक कल्याणाला आवश्यक असें एक सुंदर सत्य सांगत आहों अशी श्रद्धा असती, तर ' पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने। स्थविरे रक्षन्ति पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' हा श्लोक लिहितांना त्याची लेखणी थोडी तरी गोंधळली असती, क्षणभर तरी अडखळली असती ! पण तसें घडलें नाहीं. स्त्री ही प्राचीन पंडितांच्या दृष्टीनें देवता खरी ! पण ती दुबळी

देवता आहे, तिचें संरक्षण कुणी ना कुणी पुरुषानें केलेंच पाहिजे, या कल्पनेवर जुन्या समाजशास्त्रज्ञांची ईश्वराच्या अस्तित्वाइतकीच श्रद्धा होती. अगदीं रानटी काळांत–ज्या वेळीं मनुष्यप्राणी गुहेंत राहत होता, आणि अरण्यांतील फळांवर किंवा रानावनांत मिळणाऱ्या प्राण्याच्या मांसावर आपली उपजीविका करीत होता–त्या वेळीं पुरुष आणि स्त्री यांच्या जीवनांत विषमतेचा प्रवेश मोठ्या प्रमाणांत होणेंच शक्य नव्हतें. त्या काळांत स्त्रीही पुरुषाप्रमाणें जीवावर उदार होऊन शिकार करीत होती आणि त्याच्या खांद्याला खांदा लावून निसर्गाशीं झुंजत होती आणि त्याच्या हातांत हात नि गळयांत गळा घालून निसर्गप्रेरित प्रीतीची देवाण–घेवाण करीत होती. मात्र अशा स्थितींत सुद्धां स्त्रीविषयीं पुरुषाच्या अंतर्मनांत एक प्रकारचा गूढ आदर व एक प्रकारची सूक्ष्म करुणा या भावना लवकरच निर्माण होणें अपरिहार्य होतें. उपजीविकेंतील सहकारिणी आणि उपभोगांतील सहचारिणी या दृष्टीनें स्त्रीकडे पाहणाऱ्या पुरुषाची वृत्ति तिला प्रथमतः मातृपद प्राप्त झालें तेव्हां किती विचित्र झाली असेल, तिच्या प्रसूतिवेदना पाहून ओठ कितीही घट्ट आंवळून धरले तरी तिच्या तोंडांतून निघणारे असहायतेचे अणि दुःखाचे आर्त स्वर ऐकून त्याच्या अंतःकरणांत केवढी कालवाकालव झाली असेल. कोठली तरी अतर्क्य विचित्र शक्ति–कदाचित् एखादें भूतपिशाच्च–आपल्या जीवभावाच्या मैत्रिणीला छळीत आहे, ती शक्ति तिला एकदम उचलून घेऊन अदृश्य होण्याचाही संभव आहे, या दारुण शंकेनें त्याचें मन किती व्याकुळ होऊन गेलें असेल. तिच्या वेदना आपल्याला लवमात्रही कमी करतां येत नाहींत म्हणून तो मनांतल्या मनांत स्वतःवर किती चडफडला असेल! कदाचित् आकाशाकडे हात जोडून भावनापूर्ण हृदयानें आपल्या मैत्रिणीला लवकर आराम पडावा म्हणून त्यानें कोठल्या तरी अज्ञात देवाची प्रार्थनाही केली असेल; मात्र स्त्री प्रसूत होऊन 'ट्यांहा ट्यांहा' करीत जगांत एक चिमणा जीव आलेला पाहतांच त्याच्या भीतीचें अद्भुतरम्य आनंदांत रूपांतर झालें असेल, आणि स्वतःपेक्षांही त्या चिमुकल्या जीवाचें अधिक कौतुक करणाऱ्या स्त्रीकडे पाहून त्याच्या मनांत आश्चर्ययुक्त आदराची नवीन भावनाही निर्माण झाली असेल.

पण त्याबरोबरच जीवनांत घडून आलेल्या या नव्या स्थित्यंतरानें स्त्री आपल्यापेक्षां दुबळी आहे ही जाणीवही त्याच्या मनांत तीव्रतेनें उत्पन्न केली

यांत शंका नाहीं. प्रसूतीनंतर थोडे दिवस तरी आपली मैत्रिण शिकारींत पूर्वी-इतकें शौर्य प्रकट करूं शकत नाहीं, श्वापदाचा आवाज ऐकल्याबरोबर तीर-कमठा घेऊन गुहेंतून धांवत बाहेर येण्याऐवजीं डोळे मिटून स्तनपान करणाऱ्या आपल्या अपत्याकडे पाहण्यांतच तिला अधिक मौज वाटते, आवेगानें आपण घेतलेल्या चुंबनाचें प्रतिचुंबनानें स्वागत करण्याची ओढ तिला पूर्ववत् राहिली नसून न बोलणाऱ्या, न चालणाऱ्या अशा एका चिमुकल्या मांसाच्या गोळ्याच्या गालाला गाल लावण्यांत ती गुंग होऊन जाते इत्यादि गोष्टी ज्या क्षणीं पुरुषाच्या लक्षांत आल्या, त्याच क्षणीं स्त्री ही त्याच्या कौतुकाचा, करुणेचा आणि काव्याचा विषय बनली. तो तिचा सहचारी राहिला नाहीं. तिचा संरक्षक झाला.

मानवजातीच्या भौतिक आणि सांस्कृतिक प्रगीतनें स्त्रीचें हें दुबळेपण अधिकच दृढमूल केलें. गुहेंत राहणारा मनुष्यप्राणी बुद्धिवैभवानें निर्माण केलेल्या घरांत राहायला आला. घर हा पराक्रमी पुरुषाचा रंगमहाल झाला.पण स्त्रीच्या दृष्टीनें मात्र घर हें नुसतें विलासमंदिर राहिलें नाहीं. तो तिचा तुरुंगही ठरला. स्त्री ही राणी झाली खरी. पण ती टीचभर घरांतली. बाहेरच्या अफाट जगाचा आणि वास्तव जीवनाचा तिचा संबंध तुटला. तिचें जग नकळत संकुचित झालें. चूल आणि मूल हींच आपलीं कार्यक्षेत्रें आहेत असे संस्कार स्वाभाविकच तिच्या भावनाशील मनावर उमटूं लागले. दुबळ्यांच्या कपाळीं गुलामगिरी यायची हा निसर्गाचा नियमच आहे. त्यामुळें हां हां म्हणतां स्त्रीवर पुरुषाचा मालकी हक्क प्रस्थापित झाला. पावित्र्याच्या अनेक कल्पनांचा उगम जीवनविषयक अज्ञानांत आणि परलोकाविषयींच्या अंधश्रद्धेंत असला, तरी घराबाहेरच्या अफाट जगांत धडपडणाऱ्या हरतऱ्हेच्या संकटाशीं पदोपदीं टक्कर देणाऱ्या आणि त्यांत यश मिळालें कीं नवेनवे पराक्रम करूं इच्छिणाऱ्या पुरुषाला या सोनेरी शृंखला कधींच बंधनकारक झाल्या नाहींत. उलट घरकुलांत प्रेमाची आणि वात्सल्याची पूजा करीत बसलेल्या स्त्रीनें मात्र नवे अलंकार म्हणून त्यांचा मोठ्या आनंदानें स्वीकार केला.

आजची हिंदी स्त्री शतकानुशतकें पायांत पडलेल्या या शृंखलांतून नुक्तीच कोठें मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. ती स्वतंत्र होऊं इच्छित आहे. कैक वर्षें तुरुंगांत काढावीं लागणाऱ्या माणसाचें मन बाहेरच्या जगांत रमत नाहीं असें

म्हणतात. असले कित्येक कैदी तुरुंगाचा निरोप घेतांना आपलीं ठराविक पात्रें जपून ठेवण्याविषयीं तेथील लोकांना सांगत असतात. शक्य तितक्या लवकर तुरुंगांत परत येण्याची इच्छा त्यांच्या मनांत प्रबळ असते याचेंच हें द्योतक आहे. आमची सुंदर सनातन कुटुंबसंस्था म्हणून जुन्या कुटुंबपद्धतीचे आणि तिच्या चार भिंतींत कोंडल्या गेलेल्या स्त्रीजीवनाचे गोडवे गाणारे लोक अजूनही आपल्या समाजांत आढळतात. तुरुंगाबाहेर पडायला नाखूष असलेल्या कैद्यांच्या मनोवृत्तींत आणि त्यांच्या विचारसरणींत मुळींच अंतर नाहीं. पण असल्या मंडळींनीं जुन्या कुटुंबपद्धतीचे कितीही देव्हारे माजविले व 'रांधा वाढा आणि उष्टीं काढा' या चाकोरींतून जाणारें स्त्रीजीवन व सुंदर शब्दांच्या निर्जीव कांचांनीं कितीही शृंगारलें, तरी यापुढें त्या कुटुंबपद्धतीचें आयुष्य संपुष्टांत आलें आहे, आजच्या सुशिक्षित स्त्रीचा परलोकावर काडी-इतकाही विश्वास उरला नाहीं, कर्तव्याइतकेच आपल्याला हक्कही आहेत याची जाणीव तिला अत्यंत तीव्रतेनें झाली आहे, हें त्यांनीं विसरूं नये. जागृत झालेलें राष्ट्र ज्याप्रमाणें पारतंत्र्याचें जूं झगारून देतांना प्राणाचीही पर्वा करीत नाहीं, त्याप्रमाणें जागृत झालेली स्त्रीही स्वतंत्र होतांना जे कष्ट पडतील त्यांना तोंड द्यायला यापुढें कचरणार नाहीं. धर्म, रूढी, निसर्ग, कायदे आणि पुरुषांचें मन इतक्यांच्या एकवटलेल्या विरोधाशीं तिला झुंज द्यायची आहे. दयेनें प्रेरित झाल्यामुळें असो, प्रेमानें मोहून गेल्यामुळें असो, अथवा स्वार्थानें अंध झाल्यामुळें असो, पुरुषानें पिढ्यान् पिढ्या स्त्रीला घराबाहेर पडूं दिलें नाहीं. कुटुंबासाठीं जगणें हेंच गीता सांगणाऱ्या कृष्णापासून गीतारहस्य लिहिणाऱ्या लोकमान्यांपर्यंतच्या काळांत तिचें ध्येय मानण्यांत आलें. स्त्रीनें स्वतःसाठीं जगायचें ? छेः ! किती क्षुद्र कल्पना ! स्त्री ही त्यागाची मूर्ति ! तिला असली कल्पना कशी रुचेल ! स्त्रीनें समाजासाठीं जगायचें ? छेः ! स्त्री ही भोळी, खुळी, दुबळी ! बाहेरच्या धकाधकीचा मामला तिला कधींच मानवणार नाहीं. ती धडपडेल, पडेल, फसेल, तिचा अपःपात होईल. अर्थात् तिनें कुटुंबासाठीं जगलें पाहिजे हें ओघानेंच सिद्ध झालें.

पण आजची स्त्री या फसव्या युक्तिवादाला बळी पडण्याइतकी भोळी राहिलेली नाहीं. व्यक्तित्वाच्या विकासाची संधि हा प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे हें ती जाणते. कौटुंबिक कर्तव्याइतकींच, किंबहुना त्यापेक्षांही अधिक,

सामाजिक कर्तव्यें मानवी जीवनांत महत्त्वाचीं असतात याची जाणीव तिला पुरेपूर झाली आहे. निव्वळ कुटुंबासाठीं ती आतां जगूं इच्छित नाहीं. कुटुंबा-इतकीच ती स्वतःसाठीं जगूं इच्छिते. स्वतःइतकीच ती समाजासाठीं जग-ण्याची नवी महत्त्वाकांक्षाही मनांत फुलवीत आहे.

आणि तिच्या या विशाल आकांक्षेंत अस्वाभाविक असें काय आहे? मानवी समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत जीं जीवनमूल्यें रूढ झालीं, त्यांना चिकटून राहून क्षणोक्षणीं बदलणाऱ्या या जगांत, कोणाचा घटकाभर तरी टिकाव लागेल का? मातीचें तेल सोन्याइतकें दुर्मिळ झालें आणि 'काडीइतकी किंमत' हा शब्दप्रयोग तुच्छतेनें वापरण्याऐवजीं महाग झालेल्या आगकाड्यांकडे पाहून गौरवानें उच्चारण्याची इच्छा होऊं लागली, तरी चकमकीनें विस्तव निर्माण करण्याचें तंत्र कांहीं मनुष्य पुन्हां रूढ करूं इच्छित नाहीं. अगदीं लहान-सहान गोष्टींतील हा अनुभव अत्यंत महत्त्वाच्या जीवनविषयक मूल्यांतही आज तीव्रतेनें प्रत्ययाला येत आहे. वर्तमानकाळ कितीही निराशाजनक असला, तरी भूतकाळांत धांव घेऊन कांहीं त्यांचीं शल्यें बोथट होत नाहींत. कुरूप वर्त-मानाच्या पोटीं सुंदर भविष्य जन्माला येऊं शकतें. नव्हे, भविष्याचें सौंदर्य वाढविण्याचें सामर्थ्य मानवी सद्बुद्धीच्या आणि सद्भावनांच्या अंगीं सदैव भरपूर वास करीत असतें. मात्र भविष्य घडविणाऱ्या कोठल्याही शिल्पकारानें आपल्या हातांत भूतकाळाच्या शृंखला—प्रसंगीं त्या रत्नजडित असल्या तरी—कधींही घालून घेऊं नयेत.

आजची हिंदी स्त्री याच विशिष्ट मानसिक संक्रमणांतून आणि विचारांच्या आंदोलनांतून पुढें जात आहे. तिला सीतासावित्री या संस्मरणीय सती वाटतात; पण पारलौकिक दृष्टीनें पातिव्रत्याचें स्तोम माजवायला आतां ती तयार होणार नाहीं. पतिभक्तीनें प्रेरित होऊन वनवासांत जाणाऱ्या सीतेविषयीं तिला जो आदर वाटतो, त्यांत काव्यात्मक भावनाप्रियताच अधिक आहे. देशाच्या स्वातंत्र्या-साठीं आपल्या जीवाचें दान करणारी आजची चिनी स्त्री तिला पुराणकाळांतील सीतेहून अधिक जवळची वाटते. पतीचे प्राण परत मिळविण्यासाठीं मूर्तिमंत मृत्यूशीं झगडा करणारी सावित्री तिच्या मनांत आदर निर्माण करीत नाहीं असें नाहीं. पण मानवधर्माची पायमल्ली करणाऱ्या फॅसिस्ट राक्षसांच्या पावलांनीं आपली पवित्र मातृभूमि दूषित होऊं नये म्हणून 'हे पाहा प्राण फेंकून दिले'

असे उद्गार काढीत आपलें किंवा आपल्या पतिपुत्रांचें बलिदान करणारी आजची रशियन स्त्री तिचें अंतःकरण हालवून सोडते-नवा आदर्श म्हणून तिच्यापुढें उभी राहते.

कौटुंबिक जीवन हें फक्त एक सुखाचें साधन आहे, तें मानवी जीवनाचें ध्येय होऊं शकत नाहीं या कल्पनेनें ती अस्वस्थ झाली आहे. आजपर्यंत पति-पुत्राकरितां आपण जसा त्याग केला, तसा यापुढें समाजाकरितां करणें आवश्यक आहे या भावनेनें तिचें मन रसरसूं लागलें आहे. निर्वेध, साधें, शांत, सुखी आयुष्य आतां तिला आमरण गुंग करूं शकणार नाहीं. अपत्यांच्या प्रसववेदना आनंदानें सोसणारें तिचें मन नव्या हिंदी समाजाच्या, स्वतंत्र हिंदी राष्ट्राच्या किंबहुना नव्या जगाच्या प्रसूतिवेदना सोसण्याची हिंमत बाळगीत आहे. " आम्हां साऱ्याच बायकांना अचूक नेम मारतां येईल असं नाहीं; पण आमच्यापैकीं प्रत्येकाला एका तरी फॅसिस्टाचं काळीज-निदान डोकं-आपल्या गोळीनं छिन्नभिन्न करतां येईल, यांत संशय नाहीं. " हे रशियांतील कोणा तरी शूर स्त्रीचे उद्गार वाचले कीं तिचेंही अंतःकरण तसेंच कांहीं करण्याकरितां हुरहुरूं लागतें.

आधुनिक हिंदी स्त्रीच्या मनांत घडून आलेल्या या क्रांतीला आगरकरां-पासून महात्माजींपर्यंतच्या अनेक नेत्यांच्या विचारांचा आणि चळवळींचा हात-भार लागला आहे. पोथ्या-पुराणांत आढळून येणाऱ्या आणि प्राचीन समाज-व्यवस्थेला पोषक असणाऱ्या पावित्र्यापेक्षां, फक्त जुन्या कविसंकेतांत आणि स्वप्नाळु लेखकांत प्रकट होणाऱ्या काल्पनिक संस्कृतीपेक्षां, केवळ संवयींमुळें अधिक श्रेष्ठ आणि सुखकारक वाटणाऱ्या जुन्या चाकोरींतील जीवनक्रमापेक्षां या महापुरुषांच्या मार्गदर्शनानें निर्माण होणाऱ्या नव्या जगाचें स्वागत करणें आणि त्याला अनुरूप अशीं नवीन जीवनमूल्यें निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न करणें हेंच आजच्या हिंदी स्त्रीला आपलें कर्तव्य वाटलें तर त्यांत नवल कसलें ?

मात्र हें कर्तव्य पार पाडतांना आत्मविश्वासाइतकीच तिला आत्मपरी-क्षणाचीही आवश्यकता आहे. आंधळ्या आत्मविश्वासांतून आत्मवंचना निर्माण होते, आणि आत्मवंचनेच्या पोटीं जीवनांतील विकृतींची परंपरा सुरू होते. आज हिंदी स्त्री केवळ सामाजिक.आयुष्याच्या दृष्टीनेंच नव्हे, तर आंतरिक

जीवनाच्या दृष्टीनेंही क्रांतिकालांतून जात आहे. पण क्रांतीच्या घोषणांचे पडसाद नुसते पाठ करून किंवा स्थानीं-अस्थानीं त्यांची पोपटपंची करून उद्यांची नवी स्त्री निर्माण होणार नाहीं. क्रांतीचें काव्यात्मक दर्शन प्रत्येकालाच प्रिय असतें. विशाल सागरांतून बाहेर पडणाऱ्या सुंदर लक्ष्मीप्रमाणें तें रूप मोहक भासतें. पण क्रांतीचें खरेंखुरें स्वरूप महाकालीसारखें आहे; तें महालक्ष्मीसारखें नाहीं. कुठल्याही क्रांतीची पूजा नुसत्या काव्यकल्पनांनीं साजरी होत नाहीं. त्यागाच्या ज्वाला याच तिच्या पूजनाच्या पुष्पमाला असतात. सहज सिद्ध होणारा पंचपक्वान्नांचा नैवेद्य तिला चालत नाहीं. फक्त रक्ताचाच स्वीकार ती करते. आणि त्यांतही कोणा वाटेल त्याच्या रक्तानें ती प्रसन्न होत नाहीं. भक्तानें स्वतःच्या काळजांतील रक्त अर्पण करावें तेव्हांच ती इष्ट वर देण्याइतकी संतुष्ट होते. या उग्र दैवताचे धूपदीपही फार निराळे आहेत. अन्यायाविरुद्ध, जुलमाविरुद्ध आणि विषमतेविरुद्ध अहोरात्र जळणाऱ्या मनाचा प्रकाश हाच या देवतेचा दीप आणि त्या अन्यायाचें निर्मूलन करण्याकरितां आगींत उडी घेणारें शरीर हाच तिचा धूप. क्रांतीचें हें लोकविलक्षण विक्राळ रूप आजच्या सर्वसामान्य सुशिक्षित तरुणीनें सहसा कल्पनेनें सुद्धां पाहिलेलें नसतें. तिची क्रांतीची कल्पना आईबापांच्या इच्छेविरुद्ध एखाद्या गोऱ्यागोमट्या किंवा श्रीमंत तरुणाशीं लग्न करणें आणि भरजरी लुगडें नेसून आपल्या पुस्तकी ज्ञानाचें प्रदर्शन सभासंमेलनांतून करीत सुटणें यापलीकडे फारशी जात नाहीं.

'सुखाचा शोध,' 'अर्धांगी' व 'पहिला पाळणा' या मराठी बोलपटांतून सुशिक्षित स्त्रीच्या असल्या वैगुण्यांचें गंभीर आणि विनोदी अशा दोन्ही पद्धतींनीं चित्रण झालें. पण तें चित्रण बहुतेक सुशिक्षित बायकांना विकृत व अवास्तव वाटलें. चित्रपटांत सकारण अकारण अतिरंजन केलें जातें हें खरें वाटलें. चित्रपटांत सकारण अकारण अतिरंजन केलें जातें हें खरें. पण हा आक्षेप मान्य करून सुद्धां माणिक, अरुंधती व चित्रा या नायिकांचीं चित्रें सर्वथैव खोटीं आहेत असें म्हणतां येणार नाहीं. बिचारी, अशिक्षित स्त्री म्हणजे पंख न फुटलेलें पाखरूं! ती घरांतच घरटें करून राहते. तिचा चिवचिवाट आणि फडफडाट त्या घरट्याबाहेर फारसा ऐकूं जात नाहीं; पण सुशिक्षित स्त्रियांना पंख फुटलेले असतात. साहजिकच त्या आपल्या घरट्याबाहेर पडतात.

पण घरटें सोडल्यावर निळेंनिळें पण उंचउंच आकाश गांठण्याची शक्ति पंखांत नसल्यामुळें त्या मधल्यामध्येंच गिरक्या घेऊं लागतात. जुनें भावनात्मक कौटुंबिक जीवन मागें पडलें. नवें बुद्धिनिष्ठ सामाजिक जीवन निर्माण झालें नाहीं. या दोन जगांच्या मध्यें त्या त्रिशंकूप्रमाणें लोंबत राहतात. पतीच्या जीवनांत विलीन झालेलें साधेंभोळें व्यक्तिजीवन त्यांच्या मनाचें समाधान करूं शकत नाहीं; आणि व्यक्तिविकासाची अत्युच्च पायरी गांठण्याकरितां घराबाहेरच्या अगड्यांत निर्भयपणानें उडी घालून शरीरसुखाचा–प्रसंगीं प्राणाचा–जो होम करावा लागतो, तो करायची त्यांच्या मनाची तयारी झालेली नाहीं. अशा स्थितींत जेथें विकास खुंटतो, तेथें विकृति सुरू होते. या नियमाला स्त्रीजीवन तरी कोठून अपवाद होणार ? व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे उपभोगाच्या क्षेत्राचा विस्तार नव्हे; हक्कांची जाणीव म्हणजे कर्तव्यांचें विस्मरण नव्हे; आणि नव्या जीवनाचीं विशाल स्वप्नें म्हणजे नुसता गोडगोड स्वप्नाळूपणा नव्हे हें न कळल्यामुळें किंवा कळूनही तें आचरणांत आणण्याला लागणारें संयमाचें सामर्थ्य अंगीं नसल्यामुळें सुशिक्षित स्त्री ही नकळत समाजटीकेचा–विनोद ही एक प्रकारची खेळकर टीकाच असते—विषय बनली.

बिचाऱ्या टीकाकारांनीं तरी काय करावें ? कवयित्री म्हणून मिरविणारी एखादी स्त्री घरांत तान्हें मूल आकांत करीत असतांना स्नानगृहांत घटका घटका जलसा करीत बसलेली दिसली, तर हा एक काव्याचाच सर्ग आहे असें त्यांनीं मानायचें ? खरजेनें पीडलेल्या पोटच्या पोरांना मायेनें मलम लावायचें सोडून ‘ खरजेचे फोड फोडायचं मला बाई भय वाटतं ’ असें म्हणून तें काम मोलकरणीवर सोंपवून चकाट्या पिटीत बसणाऱ्या विदुषीला काय त्यांनीं मानपत्र द्यायचें ? एकीकडून आर्थिक स्वावलंबनाशिवाय स्त्री स्वतंत्र होणार नाहीं म्हणून आक्रोश करायचा आणि सुखवस्तु नवरा मिळाला रे मिळाला कीं नोकरी सोडून आणि समाजसेवेकडे पाठ फिरवून आपल्या टुमदार घर–कुलाचा तोरा मिरविणाऱ्या पंडितेवर काय त्यांनीं पुष्पांजलि वाहायची ? विवाहविषयक जुनीं नीतिमूल्यें झुगारून देणाऱ्या आणि नवीन नीतिमूल्यें जीवनांत आणण्याचें धैर्य नसणाऱ्या सुशिक्षित स्त्रीच्या स्वैर वर्तनाला समाजानें नाक मुरडलें तर त्यांतही सारा दोष बघणाराचाच का ?

सुशिक्षित स्त्रीचे हे दोष सुशिक्षित पुरुषांच्या अंगीं नाहींत असें नाहीं. पण

स्त्रीचें व्यक्तिस्वातंत्र्य समाजानें मान्य केलें तरी केवळ पुरुषी मूल्यांनीं तिची किंमत करायला तो कधींही प्रवृत्त होणार नाहीं. स्त्रीजीवनाच्या नव्या विकसित स्वरूपाची समाज आज ना उद्यां पूजा करील. पण त्या विकासाचें मंदिर अभंग स्त्रीमनाच्या आणि त्याच्या विशिष्ट गुणांच्या आधारावर उभारलें असेल तरच त्याच्यापुढें समाजाचें मस्तक नम्र होईल. पण त्या मंदिराच्या पायांत जिवंत स्त्रीमन पुरलें गेलें आहे, तें गुदमरून निश्चेष्ट झालें आहे, असा त्याला नुसता भास झाला, तरीसुद्धां पूजेकरतां हातांत घेतलेल्या फुलांचा चोळामोळा करून टाकल्याशिवाय तो राहणार नाहीं.

स्त्रीमन ?

होय ! स्त्रीमन तें स्त्रीमन आणि पुरुषमन तें पुरुषमन ! विनायक कवीनें चित्रित केल्याइतका या दोन मनांत भेद नसेल—नव्हे, नाहींच. स्त्री तेवढी कोमल आणि पुरुष तेवढा कठोर हा यापुढें एक जुनापुराणा कविसंकेतच ठरेल हें कबूल ! स्त्रीमन आणि पुरुषमन हीं दोन्हीं जीवननाटकाला रंग आणणारीं रम्य रसाळ गीतें आहेत यांत नवल नाहीं. पण पहिलें भावगीत आहे आणि दुसरें नाट्यगीत आहे, हें आजउद्यांच्या स्त्रीनें लक्षांत ठेवलें पाहिजे.

हा फरक फार सूक्ष्म आहे असें अनेकांना वाटेल. पण शास्त्रीय संशोधना-प्रमाणें मानवी जीवनांतही सूक्ष्म फरकाचे परिणाम फार मोठे असतात. या दोन मनांतील हें नाजुक अंतर स्पष्टपणें दर्शित करणारे अनेक उत्कट प्रसंग महा-कवींच्या साहित्यांतून किंवा महापुरुषांच्या चरित्रांतून दाखवितां येतील. पण हा मुद्दा सिद्ध करायला एवढ्या मोठ्या साक्षीदारांची जरूरीच नाहीं. वेंडेल विल्कीचें 'एक जग' हें राजकारणविषयक ( कीं प्रवासवर्णनपर ) पुस्तकच घ्या. चीन-मधील विल्कीच्या प्रवासाचीं पानें सहज चाळा. चँग-के-शैक आणि विल्की या दोन मुत्सद्द्यांची अनेक विषयांवरील चर्चा वाचूं लागा. त्या चर्चेनें बुद्धीचें रंजन होईल, नाहीं असें नाहीं. पण स्वच्छ आकाशाचा नीलिमा पाहण्यांत होणारा आनंद आभाळांत उगवणारी चिमुकली चंद्रकोर पाहून होणाऱ्या आनंदापेक्षां थोडा फिक्काच वाटतो ! नाहीं का ? हा दुसऱ्या प्रकारचा आनंद त्या पुस्तकाच्या वाचकाला जनरॅलिसिमोच्या प्रश्नांत मिळत नाहीं, विल्कीच्या उत्तरांतही तो मिळत नाहीं. मॅडम-चँग-के-शैकच्या दोन साध्या वाक्यांतून तो प्रतीत होतो. स्वतः मॅडम कांहीं कमी राजकारणपटु आहे असें नाहीं. या

दोघांमधील दुभाष्याचें काम तीच करीत होती. पण तास न् तास वटवटादि खटपट करणाऱ्या या पुरुषांना ती शेवटीं म्हणाली, "दहा वाजून गेले कीं तुम्ही पुरुष एकदां बोलायला लागलां कीं तुम्हांला कशाचीच शुद्ध उरत नाहीं! कांहीं कांहीं खाल्लं नाहीं तुम्ही अजून. चला, उठा. आधीं गांवांत जाऊन चार घांस खाऊं या. ही चर्चा पुन्हां केव्हां तरी सावकाश संपवितां येईल तुम्हांला!"

स्त्री कितीही सुशिक्षित झाली तरी या भावनेचा, या भावनेचे तरंग ज्यांच्यावर नित्य विलसत असतात, त्या नैसर्गिक वात्सल्याचा तिला त्याग करतां येणार नाहीं. स्त्रीपुरुषांच्या सर्व व्यावहारिक हक्कांत समता अवश्य हवी. पण समता म्हणजे स्वैरता नव्हे. समतेचा जन्म विरोधांतून होत असला, तरी सहकार्य हेंच तिचें जीवन आहे. ही भूमिका सोडून कुठल्या तरी वैयक्तिक पुरुषाच्या भ्रामक कल्पनेच्या मागें स्त्रिया धांवत सुटतील, तर त्या निव्वळ पुरुषी होतील. आपलें स्त्रीमन गमावून त्या स्वतःलाच नव्हे, तर समाजाला दुःखाच्या गर्तेंत लोटतील. पुरुषांना लीलेनें साधणारे बुद्धीचे अनेक खेळ खेळण्यांत त्या कमी कुशल ठरतील असें नव्हे; पण उद्यांच्या नव्या जगांत सुख आणि शांतता ह्यांची स्थापना व्हायची असेल तर मानव जातीच्या बुद्धीइतकाच तिच्या हृदयाचा विकास व्हायला हवा. तो विकास पुरुषांपेक्षां स्त्रियाच अधिक सत्वर आणि अधिक सुंदर रीतीनें करूं शकतील. बुद्ध, खिस्त आणि गांधी यांच्यासारखे प्रज्ञावंत महापुरुष नव्या सात्विक मानवाचीं स्वप्नें पाहूं शकतील. पण तीं स्वप्नें, अंशतः कां होईना, खरीं करून दाखविण्याचें सामर्थ्य सामान्य पुरुषापेक्षां सामान्य स्त्रीमध्येंच अधिक आहे. भक्ति, त्याग, वात्सल्य हे गुण स्त्रीला कुणी शिकवावे लागत नाहींत. ते तिच्या रक्तांत सदैव नाचत असतात. मानवजातीच्या अज्ञानामुळें किंवा पुरुषजातीच्या स्वार्थलंपटतेमुळें या सद्गुणांचा आतांपर्यंत अनेकदां दुरुपयोग झाला असेल; पण मानवी बुद्धींतून निर्माण झालेल्या शास्त्रज्ञानाचा महायुद्धासारख्या प्रसंगीं अतिशय दुरुपयोग होतो म्हणून तें ज्ञान कोणी त्याज्य मानलें आहे काय? स्त्रीच्या भावनागुणांचेंही तसेंच आहे.

प्रस्तुत कथासंग्रहांत जुन्या व नव्या स्त्रीजीवनाचे आणि स्त्रीमनाचे असे थोडे पैलू चित्रित करण्याचा प्रयत्न मीं केला आहे. 'आक्का व कवडा पोर'

मराठी ग्रं... दा. क्र. ६६२८०

या १९२९ सालीं लिहिलेल्या गोष्टींत स्त्रीमनांत उपजत वात्सल्य, वात्सल्याच्या विषयाकरितां निस्सीम त्याग करण्याची तिची विलक्षण शक्ति, पण तो त्याग व्यक्तिनिष्ठ असल्यामुळें ती व्यक्ति दूरावूं लागतांच तिच्या मनांत निर्माण होणारा सूक्ष्म मत्सर इत्यादींचें चित्रण आढळेल. प्राचीनकाळच्या समजपद्धतीनें स्त्रीच्या विकासाला कुटुंबाची मर्यादा घातल्यामुळें प्रेमाशीं संबद्ध असलेला मत्सर हा नकळत तिच्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग बनला होता. जुन्या जमान्यांत सासूकडून होणाऱ्या सुनेच्या छळाला हा मत्सरसुद्धां थोडाफार कारणीभूत होत असे, हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे.

केवळ कौटुंबिक अशा त्या जीवनांतून आणि भावनांतून नुकतीच बाहेर पडलेली पण संक्रमणकाळानें निर्माण केलेल्या विचित्र परिस्थितीमुळें गोंधळून गेलेल्या स्त्रीमनाचें चित्र १९४२ सालीं लिहिलेल्या 'आठ जून' या गोष्टींत रेखाटलेलें दिसेल. नव्या स्त्रीला व्यक्तिविकासही हवा, नैसर्गिक असें पतिसुख आणि अपत्यसुखही हवें, आणि समाजसेवेची तिची इच्छाही—त्या इच्छेला हौस म्हणा अथवा तळमळ म्हणा—तृप्त व्हायला हवी. जीवनविषयक तिच्या आकांक्षांचे हे तीन भिन्न प्रवाह एकवटतील तरच यापुढें ती पूर्णपणें सुखी होऊं शकेल. पण या प्रवाहांचा संगम साधण्याकरितां तिला अनेक दिव्यांतून जावें लागेल. नैतिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रश्नांच्या कांटेरी कोंडींतून अंग रक्तबंबाळ करून घेत तिला आपली वाट काढावी लागेल. मात्र स्त्री ही आपली दासी किंवा भोगदासी नाहीं, ती आपली बरोबरीची, अगदीं जीवाभावाची मैत्रिण आहे या नवीन भावनेनें प्रेरित झालेल्या आज-उद्यांच्या पुरुषांकडून या कामीं आतां तिला पूर्वीसारखा-निदान पूर्वीइतका तीव्र विरोध होणार नाहीं; उलट हळूहळू त्यांचें तिला साहाय्यच मिळेल.

पण व्यक्तिस्वातंत्र्य, कुटुंबसुख आणि सामाजिक जीवन हे तीन्ही प्रवाह स्त्रीच्या आयुष्यांत एकरूप झाले तरी उद्यांची स्त्री सुखी होईल असें म्हणणें सुद्धां धाडसाचें होईल. जोंपर्यंत बॉंब फेकणारीं विमानें आकाशांत लक्षावधि निष्पाप मानवांच्या डोक्यांवर भुतासारख्या घिरट्या घालीत आहेत, जोंपर्यंत रक्ताची चटक लागलेल्या वाघाप्रमाणें वैभवाच्या नि विस्ताराच्या लालसेनें वेडावून गेलेलीं राष्ट्रें आपल्या कोट्यवधि तरुणांच्या रक्ताची किंमत तांबड्या शाईपेक्षां अधिक मानायला तयार होत नाहींत, तोंडानें शांतिपाठ म्हणणारे

राजकारणी मुत्सद्दी बगलेंत सुऱ्या लपवून त्या एकमेकांच्या पाठींत कशा खुपसाव्यात याचेंच जोंपर्यंत चिंतन करीत आहेत, काळे आणि गोरे, जित आणि जेते, सुधारलेले आणि मागसलेले इत्यादि भेदांचीं भुतें जोंपर्यंत जगाच्या पाठीवर नंगा नाच घालीत आहेत, तोंपर्यंत उद्यांची स्त्री–मग ती कुठल्याही राष्ट्रांतील असो–सुखानें जगूं शकणार नाहीं. वर्षानुवर्षें तिनें खस्ता खाऊन वाढविलेले पोटचे गोळे–एक दिवस मुत्सद्द्यांच्या नेत्रकटाक्षाबरोबर तोफेच्या तोंडीं बळी देण्याकरितांच का तिनें त्यांच्यासाठीं इतका त्याग केलेला असतो ? ज्याच्या सेवेंत तिला स्वर्गसुख लाभतें, ज्याच्या वक्षःस्थलावर क्षणभर डोकें टेकून डोळे मिटले कीं ती ब्रह्मानंद उपभोगूं शकते, तो प्रिय पति कुठल्या तरी महत्त्वाकांक्षी माणसानें सुरू केलेल्या युद्धांत मुंगीसारखा चिरडला गेलेला पाहून असलीं युद्धें निर्माण करणाऱ्या अमानुष समाजव्यवस्थेविरुद्ध ती चिडून चवताळून उठल्याशिवाय राहील काय ? कॅपेकच्या ‘ मदर ’ या नाटकाच्या आधारानें १९४२ सालीं लिहिलेल्या ‘ आईचा शब्द ’ या कथेंत स्त्रीमनाच्या या बाजूचें अंशतः चित्रण झालें आहे. सर्व स्त्रीधर्मांत मातृधर्म श्रेष्ठ आहे हें खोटें नाहीं. मग उद्यांच्या स्त्रीला आपल्या अपत्यांची मर्यादा असलेला संकुचित मातृधर्म पाळून चालणार नाहीं. नवा विशाल मातृधर्म तिला आवाहान देत आहे, साऱ्या जगांतील अनाथ नि अपंग लेंकरांनीं फोडलेला टाहो तिच्या कानांवर पडत आहे. ढोंगी मुत्सद्द्यांच्या आणि पाशवी वीरांच्या पायांखालीं चिरडली जाणारी मानवता आर्त स्वरानें तिला हांक मारीत आहे. प्रेम, दया, वात्सल्य यांचे जगांत क्षीण होत चाललेले आवाज तिला बोलावीत आहेत. हे सर्व करुणस्वर ऐकूनही उद्यांची स्त्री आपल्या घरकुलांत, आपल्याच पिलांच्या किलबिलांत रमून जाईल असें कोण म्हणेल ! मातृधर्मापेक्षांही श्रेष्ठ अशा मानवधर्माचें परिपालन करण्याकरितां ती पुढें सरसावेल ! एक दिवस–तो दिवस लवकरच उगवेल का ? ती जगन्माता होईल.

समाजांत प्राचीन स्त्री नकळत दासी झाली होती. लहरी निसर्गामुळें आंधळ्या भावनेमुळें, आणि पुरुषाच्या उपभोगप्रधान वृत्तीमुळें हें दास्य तिच्यावर पिढ्यान् पिढ्या लादलें गेलें. आजची स्त्री गुलामगिरीच्या या अवजड शृंखला तोडून बाहेर पडत आहे. राणी म्हणून समाजांत मिरविण्याचा ती आटोकाट प्रयत्न करीत आहे. पण यापुढें स्त्रीजीवनाची सफलता दासी होण्यांत

नाहीं आणि राणी होण्यांतही नाहीं. ती जगन्माता होण्यांत आहे. केवळ पुरुषाशीं स्पर्धा करण्याकरितां आणि त्याच्या तोडीनें आयुष्यांतील विविध सुखांचा उपभोग घेण्याकरितां आजची स्त्री घराबाहेर पडत असेल, तर तिची ती मोठी चूक आहे. निसर्गाच्या अनेक बंधनांतून मुक्त असल्यामुळें बुद्धिविकासाची विकट चढण तिच्या मानानें पुरुष पुष्कळच चढून गेला आहे! दूर उंचावर त्याच्या हातांत फडफडणारा विजयध्वज पाहून मागें पडलेल्या स्त्रीला तो आपली हेटाळणी करीत आहे असा भास झाला, तर त्यांत नवल नाहीं. त्या भासानें चिडून आपण एकदम धांवत सुटावें आणि पाय रक्तबंबाळ झाले तरी पर्वताच्या मध्यभागीं त्याला गांठावें, अशी तीव्र इच्छा तिच्या मनांत उत्पन्न होणेंही अस्वाभाविक नाहीं. पण केवळ वैयक्तिक प्रगतींत पुरुषांची बरोबरी करण्याकरितां आपण दुर्बल नाहीं, हें सिद्ध करण्याकरितां ती विचार न करतां लगबगीनें धांवूं लागली तर?

तर क्षणार्धांत तिचें जीवनध्येय धुळीला मिळेल. ज्या पर्वताची चढण पुरुष चढून गेला आहे आणि ती चढूं लागली आहे, त्या पर्वताच्या अत्युच्च शिखरावर एक सुंदर देवालय आहे. त्या देवालयांतील देवतेचें नांव मानवता. पुरुषाचा पराक्रम पुढें धांवत जाऊन हें दुर्गम देऊळ शोधून काढण्यांत आहे. पण त्या देवळांतील देवतेच्या पूजेचें सर्व मंगल साहित्य मात्र स्त्रीच्याच हातांत आहे. एका ध्वजाखेरीज अन्य बंधन नसलेल्या पुरुषाप्रमाणें ती या देवालयाकडे लगबगीनें जाऊं शकणार नाहीं. ती धांवूं लागेल तर तिच्या पूजासाहित्यांतील पुष्पमाला तिच्याच पायदळीं तुडविली जाईल—प्रसंगीं ती पुष्पमालाच तिची शृंखला होईल. पुरुषाच्या हातांतील ध्वज वाऱ्यानें फडफडूं लागला म्हणजे तिला त्याच्या त्या विजयपताकेचा क्षणभर हेवा वाटेल! पण पर्वतशिखरावरील देवतेच्या पूजेकरितां प्रज्वलित केलेलीं आपल्या हातांतल्या तबकांतील भावनेचीं नीरांजनें त्या वाऱ्याच्या झोतानें विझणार नाहींत ही दक्षता तिनें आधीं घ्यायला नको का? त्याकरितां सावकाश चालावें लागले, पुरुषांकडून अबला म्हणून कितीही थट्टा झाली, तरी तिनें त्याचें वैषम्य मानतां कामा नये. प्रसंगीं पदर आड करून नीरांजनांतील ज्योतींचेंच तिनें रक्षण करायला हवें. तरच दुर्गम पर्वतशिखरावरील त्या देवतेची आज ना उद्यां यथासांग पूजा होऊं शकेल.

एके काळीं सौंदर्य हेंच स्त्रीचें सामर्थ्य होतें. आतां सामर्थ्य हेंच आपलें सौंदर्य मानून नवें जग—एकच एक सुखी जग—निर्माण करण्याकरितां तिनें आपल्या जागृत बुद्धीचा आणि नैसर्गिक भावनांचा विनियोग करणें इष्ट होईल. या कामांत पुस्तकी पांडित्य करणाऱ्या विल्कीसारख्या मुत्सद्द्यापेक्षां मानवी मूल्यांच्या श्रेष्ठत्वाकरितां झगडणाऱ्या महात्मा गांधींना यश येण्याचा जसा अधिक संभव आहे, तसें या नव्या जीवनक्रांतींत पुरुषापेक्षां स्त्रीचें नेतृत्वच अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता आहे. पुरुष शूर आहे. पण कुठलीही नवी सृष्टि निव्वळ शौर्यातून आणि पांडित्यांतून निर्माण होत नाहीं. ती त्यागांतून आणि बुद्धिनिष्ठ भावनांतूनच उगम पावते.

कोल्हापूर
१५–४–४४

वि. स. खांडेकर

# आठ जून १

खण–खण–खण–खण—

शाळेच्या घंटेचा तो कर्णकटु आवाज मुलींना विलक्षण मधुर वाटला. सर्वांच्या मुद्रांवर हास्याच्या छटा चमकूं लागल्या. सर्वांनीं हातांतील पुस्तकें पटापट पिशवींत घातलीं, बाकांखालच्या वहाणा भराभर पायांत सरकविल्या, आणि—त्या साऱ्या भुर्रकन बाहेर गेल्या असत्या! पण एकदम त्यांच्या लक्षांत आलें–बाई अजून खुर्चीवरून उठल्या नव्हत्या. त्यांच्या भिरभिरत्या नजरा एकदम निश्चल झाल्या. बागेंतील असंख्य फुलपांखरांची हालचाल क्षणार्धांत थांबावी, तसें सिंधूला वाटलें.

ती खुर्चीवरून उठत हंसतमुखानें म्हणाली, "चला, आतां आपली भेट..."

एका धीट मुलीनें तिचें वाक्य पुरें केलें, "आठ जूनला!"

सिंधु हंसली. हंसतहंसत बाहेर पडणाऱ्या मुलींच्या त्या घोळक्याकडे पाहून तिच्या मनांत येत होतें—खुराड्याचें दार उघडतांच कबुतरें अशींच बाहेर पडत असतील, नाहीं? हिरव्या साड्या, काळ्याभोर वेण्या, गुलाबी फिती, निळेजांभळे फ्रॉक, जणूं कांहीं अनेक इंद्रधनुष्येंच नाचतनाचत वर्गांतून बाहेर जात होतीं.

शेवटच्या मुलीनें जातांजातां मागें वळून पाहिलें नी हंसत म्हटलें, "येतें हं बाई!"

बाई ! आज पांच वर्षें हा शब्द दररोज सिंधूच्या कानांवर पडत होता. पण आतांच्याइतका तिला तो कधींच बोंचला नव्हता.

तिनें सहज आपल्या हातांतील मनीबॅग उघडली. आंतल्या आरशांत आपलें प्रतिबिंब पाहत असतांना तिचें मन म्हणत होतें—मराठी भाषाच हेंगाडी आहे. पंचवीस वर्षांची तरुणी मास्तरीण झाली म्हणून काय तिला 'बाई' म्हणायचें ? छे: ! आतां शब्दकोशाची दुसरी आवृत्ति निघेल तेव्हां संपादकांना लिहायला हवें, कीं 'बाई' या शब्दाचा अर्थ पन्नाशी–निदान चाळिशी उलटलेली स्त्री असा स्पष्ट द्या.

सिंधु वर्गांतून बाहेर आली तेव्हां शाळेचें मोठें पटांगण मुलींनीं नुसतें फुलून गेलेलें होतें. एकमेकींशीं बोलत लगबगीनें फाटकाबाहेर पडणाऱ्या त्या मुलींकडे पाहून तिला वाटलें—आपण एवढ्या लहान होतों तेव्हां सुट्टीचा किती विलक्षण आनंद होत असे आपणाला !

पण आज सकाळीं उठल्याबरोबर कॅलेंडरची तारीख बदलण्याकरितां आपण हात पुढें केला; कांहीं केल्या बावीस एप्रिल ही तारीख फाडावीशी वाटेना. बावीस एप्रिल काय, तेवीस एप्रिल काय नी चोवीस एप्रिल काय—सारेच दिवस सारखे असें आपल्या मनांत आलें.

आपण तोंड धुवायला बाहेर आलों तेव्हां 'कुहु...कुहु' असा कोकिळेचा आवाज आपल्या कानांवर आला. आपण मान वर करून पाहिलें. पलीकडच्या आंब्यावर बसून ती गात होती नी त्या आंब्याला लागलेले किंचित् बाकदार छोटे आंबे किती सुंदर दिसत होते !

आपण म्हटलें—सारेच दिवस सारखे नसतात. आतां वसंताचें राज्य सुरू झालें !

शाळेंतून घरीं परत जातांना वरचें निरभ्र निळें आकाश एकसारखें सिंधूला म्हणत होतें—आतां वसंताचें राज्य सुरू झालें ! आणि खोलीवर येऊन ती कुलूप उघडणार इतक्यांत शेजारच्या चिमुरड्या मीनानें "शिंधूताई, कलवंदं हवींत तुम्हांना ?" असा प्रश्न जरी तिला विचारला होता, तरी सिंधूला वाटलें होतें, आतां वसंताचें राज्य सुरू झालें असेंच ती म्हणत आहे.

मीनाच्या हातांतील दोन करवंदें तोंडांत टाकून सिंधूनें खोली उघडली. समोरच कॅलेंडर होतें. तिला भास झाला—दरबारांत भालदार–चोपदार

ललकारतात त्याप्रमाणें तें कॅलेंडर मोठ्यानें ओरडत आहे—"तेवीस एप्रिल ! निगा रखो ! तेवीस एप्रिल !"

तोंडांतील करवंदाच्या बिया हातांत घेऊन त्या टाकून देण्याकरितां ती खिडकीपाशीं आली. करवंदाचा तो काळाभोर रंग, ती आंबटगोड रुचि— त्या बिया करवंदांच्या पोटांत असूनही त्यांना यांपैकीं कशाचाच लाभ झाला नव्हता ! तिचें अंतर्मन म्हणत होतें—आपलें आयुष्यही या बियांसारखेंच नाहीं का ? आपल्याभोंवतीं......

टेबलावरील पुस्तकांकडे तिची दृष्टि गेली. पांच वर्षांपूर्वी केवढ्या उत्साहानें ती टेबलाजवळच्या या खुर्चीवर बसली होती ! लहान मुलींच्या आयुष्याला वळण लावण्याचें पवित्र कार्य आपण अंगीकारिलें आहे या श्रद्धेनें तिनें आपल्या कामाला सुरुवात केली होती. पुस्तकें वाचायचीं, नोटस् काढायच्या, मोठमोठ्या स्त्रियांचीं चरित्रें मुलींना सांगायचीं, वादविवादमंडळाकरितां भाषणें तयार करायचीं—किती गडबडींत गेलें होतें तिचें पहिलें वर्ष ! पण पहिल्या वर्षाची गोडी दुसऱ्या वर्षी वाटली नाहीं ! तिसऱ्या वर्षी तिला थोडा कंटाळाच आला. चवथ्या वर्षी 'तुम्हाला कांहीं होत नाहीं' असें डॉक्टर बजावून सांगत असतांनाही ती मधून मधून टॉनिक घेऊं लागली; आणि यंदा तर......

अनेकदां वर्गांत शिकवीत असतांना तिला मध्यें भास होऊं लागला, आपण एका देवळांत बसून न दिसणाऱ्या देवाला अभिषेक करीत आहों नी ज्याचा अर्थ आपणाला कळला नाहीं असें एक स्तोत्र म्हणत आहों. संध्याकाळीं शाळा सुटल्यावर कधीं कधीं तिच्या मनांत येई, पलीकडच्या गिरणींतील बायका साताला सुटतात नी आपण पांचाला सुटतों, एवढाच काय तो फरक !

आतां पुन्हां आठ जूनला आपलें शाळेंतलें सहावें वर्ष सुरू होणार. अशीं किती वर्षें काढणार आहोंत आपण ? वर्षें मागें पडूं लागलीं कीं गुन्हेगार कैद्यांची सुटकेची आशा बळावत जाते; पण समाजांतील निरपराधी कैद्यांची स्थिति मात्र अगदीं उलट असते.

कॅलेंडरपाशीं जाऊन ती पुढील तारखा चाळूं लागली. चोवीस एप्रिल, पंचवीस एप्रिल...सात मे, नऊ मे...पांच जून, सहा जून, सात जून ! अबब ! पंचेचाळीस दिवस ! नी हे दिवस तरी काय थंडींतले आहेत ! चांगले

उन्हाळ्यांतले ! पहांटे साडेपांचलाच दिसायला लागतें मे महिन्यांत ! नी संध्याकाळीं साडेसात झाले तरी संधिप्रकाश पृथ्वीवर रेंगाळतच असतो. प्रियकर चुंबन घेऊन निघून गेला तरी प्रणयिनीच्या मनांत त्याचे मधुर तरंग जसे

सिंधु कॅलेंडरजवळून दचकून दूर झाली. आपल्याला सुचलेल्या या उपमेचें तिचें तिलाच आश्चर्य वाटलें. तिचें आंतलें मन म्हणत होतें—'त्यांत काय आहे एवढें ? असली उपमा सुचावी असेंच वय आहे तुझें. तूं मास्तरीण आहेस हें खरें ! पण मास्तरीण म्हणजे कांहीं जोगीण नव्हे.'

आणि तिचें पूर्ण समाधान व्हावें म्हणून वरचें मन म्हणत होतें, 'अग, हल्लीं खूपखूप कादंबऱ्या वाचतेस तूं ! त्यांतलीच कुठली तरी उपमा असेल ही ! परवां फडक्यांची 'अटकेपार' वाचलीस ना तूं ? त्यांत......'

तिनें खिडकीबाहेर पाहिलें. पोस्टाचा शिपाई समोरच्या चाळींत शिरत होता. दुसऱ्या मजल्यावर उभी असलेली एक तरुणी त्याला पाहतांच लगबगीनें खालीं यायला निघाली. सिंधूला आठवलें—गेल्या मासांतच तिचें लग्न झालें होतें ! तीनचार दिवस आपण समोर रस्त्यावर उभारलेल्या मांडवाखालूनच जात होतों ! नी लग्नाचा मुहूर्त अगदीं सकाळचा असूनसुद्धां आपण तें चुकविलें. शाळेचें कांहीं तरी काम उकरून काढलें आपण !

सिंधु पाहत होती—त्या तरुणीनें पोस्टमनच्या हातांतून एक पत्र जवळजवळ ओढूनच घेतलें ! लगेच तिच्या गालांवर गुलाब फुलले. तिच्या पतीचेंच पत्र असलें पाहिजे तें !

विषण्ण मनानें ती टेबलापाशीं येऊन बसली. ती स्वतःशींच म्हणत होती—महिन्यामहिन्यांत पोस्टमनला आपल्या दाराशीं उभें राहावें लागत नाही. आपल्याला पत्र पाठविणार तरी कोण ? बिचारी आई खेड्यांत असते. तिला कांहीं लिहितां येत नाहीं. दर महिन्याला दहा रुपयांची मनिऑर्डर पाठविली कीं तिची पोंच म्हणून जो एक कागदाचा तुकडा येतो, त्याच्यावरील आईचा अंगठा हाच काय तो आपला पत्रव्यवहार. कॉलेजांतल्या मैत्रिणींचीं पहिल्यापहिल्यांदा आपल्याला पत्रें येत होतीं; पण ज्यांचीं लग्नें झालीं त्या आपल्या सुखांत गढून गेल्या नी ज्यांचीं झालीं नाहींत, त्यांना आपल्यासारखी निराशा भरली. मिळून काय ? तिनें एक सुस्कारा सोडला.

तिला कॉलेजांतील दिवस आठवले. त्या वेळीं दोनचार मुलांचीं तिला प्रेमपत्रें

आलीं होतीं. त्या चावटपणाला उत्तर म्हणून त्या पत्रांचे तुकडे करून ते तिनें त्या मुलांना साभार परत केले होते. आतां तिला वाटलें, आज आपणाला तशीं पत्रें कोणीं पाठविलीं तर? आपण तीं फाडून टाकूं? छे!

एक्झरसाइज बुकें तपासणें म्हणजे कांहीं आयुष्य नव्हे. अकरा ते पांच रखन्या पोरींपुढें पोपटपंची करीत बसणें म्हणजे कांहीं जीवन नव्हे. कॉलेजांतील त्या जोगाच्या मागणीला आपण त्या वेळीं होकार दिला असता तर?

तर दर वर्षी जून ते एप्रिल एक्झरसाइज बुकें तपाशीत बसणारे आपले हात कोणाच्या तरी धोतराच्या नाजुक निऱ्या करून ठेवण्यांत नाहीं तर कोणाच्या तरी गोजिरवाण्या चेहऱ्याला तीट लावण्यांत गुंग होऊन गेले असते.

तिनें अस्वस्थपणें मागें पाहिलें. कॅलेंडरवरील तेवीस एप्रिल तारीख पुन्हां दिसली. तिला आठ जूनची आठवण झाली. पंचेचाळीस दिवस! प्रत्येक दिवसाचे चोवीस तास—प्रत्येक तासाचीं साठ मिनिटें नी प्रत्येक मिनिटाचे साठ सेकंद...कसा घालवायचा हा वेळ?

ती घड्याळाकडे पाहूं लागली. टक्टक् टक्टक् हा आवाज तिच्या कानांत घुमूं लागला. घणांच्या घावासारखा वाटला तो तिला!

तिनें टेबलाकडे पाहिलें. अगदीं मध्यभागीं तिचा फोटो होता—ती मास्तरीण झाली त्या वेळीं तिनें मुद्दाम काढवून घेतला होता तो. उजव्या हातांतील जाळीदार पिशवींतून बाहेर डोकावून पाहणारीं तीं पुस्तकें, डाव्या हातांतील घड्याळाकडे पाहण्याची ती ऐट—

त्या फोटोचा असा राग आला तिला! तिनें तो सर्रकन् ओढला नी टेबलाच्या ड्रॉवरमध्यें खुपसून ठेवला.

टक्टक्...टक्टक्...पुन्हां तिच्या कानांत आवाज घुमूं लागला. तिला वाटलें—आपलें डोकें अतिविचारानें हलकें झालें आहे. त्यामुळें घड्याळाची टिक्टिक्...

पुन्हां जोरानें टक्टक् असा आवाज झाला. आतां कुठें तिचें दाराकडे लक्ष गेलें. तिनें झटकन् पुढें होऊन दार उघडलें. पोस्टमन तिच्यापुढें उभा होता.

आपलें पत्र?

तिच्या कपाळाला आंठी पडली. पत्र बहुधा आईचें असावें, तिनें कुणाच्या तरी हातांपायां पडून तें—तिनें पत्रांत लिहिलें असेल—"या सुटींत तरी घरीं ये. दिवाळीला आली नाहींस म्हणून मला फार वाईट वाटलं."

आपली लेक पाहावी, ती आपल्याजवळ राहावी असें आईला वाटणें स्वाभाविक आहे. पण लेकीचा वेळ त्या गांवढळ गांवांत कसा जायचा बाई ! तेथें केसरीखेरीज दुसरें वर्तमानपत्र दिसायचें नाहीं, तोंडाला लावायची पावडर संपली तर पीठ लावल्याशिवाय गति नाहीं, नी आईला बरें नसलें तर फूफू करीत चुलीपाशीं बसल्याशिवाय पोटांत दोन घांससुद्धां जायचे नाहींत.

मनांत हें विचारचक्र फिरत असतांना सिंधूचे डोळे हातांतील पत्रावरून फिरत होते. तिची नजर खालच्या 'तुझी कुंदा' या शब्दांवर पोंचली मात्र—

तिच्या डोळ्यांत विलक्षण समाधान चमकूं लागलें. ती घाईघाईनें खोलींत आली नी तेवीस एप्रिलच्या तारखेला हातांतील पत्र दाखवीत म्हणाली, "आतां दीड महिना तुझंच राज्य इथं ! आठ जूनला सकाळीं येईन मी."

कुंदेकडे आल्यापासून सिंधूला कसें मोकळें मोकळें वाटत होतें. पिंजऱ्यांतून बाहेर पडलेल्या पांखरानें झाडाच्या या खांदीवर बसावें, मग त्या फांदीवर जावें, मधून उगीचच कशाला तरी टोंच मारावी असें तिचें तेथें चाललें होतें.

कॉलेजांत असतांना कुंदा तिची जीवश्चकंठश्च मैत्रीण होती. गेल्या पांच वर्षांत दोघींची गांठसुद्धां पडली नव्हती हें तर या आनंदाचें कारण होतेंच; पण त्याहूनही मोठें असें दुसरें कारण म्हणजे सिंधु एक सुखी संसार पाहत होती.

कुंदेची खोली तिच्या खोलीएवढीच होती. पण या खोलींतील टेबलावर कुंदा नी भालचंद्र यांचा एक सुंदर फोटो, सुंदर पण कागदी पुष्पगुच्छ असलेली एक फुलदाणी, काव्याचीं नी कादंबऱ्यांचीं पुस्तकें नी कुंदाचें केशभूषेचें सामान यांशिवाय दुसरें कांहीं नव्हतें. एक्झरसाइझ बुकें, नोट्सचीं पुस्तकें, चाकू, रबर तांबडी-निळी पेन्सिल, तांबड्या शाईची दौत, असली कांहीं अडगळ नव्हती तेथें ! एखाद्या जंगलांतून बागेंत यावें तसें हें टेबल पाहून सिंधूला वाटलें. ती मनांत म्हणाली, 'कुंदा मोठी भाग्यवान आहे.'

आणि सकाळपासून संध्याकाळपर्यंत कुंदा आणि भालचंद्र यांच्या सहवासांत असतांना तिनें दहादा तरी स्वतःशीं हें वाक्य उच्चारलें नाहीं असा पुढल्या सव्वा महिन्यांत एकही दिवस गेला नाहीं.

एके दिवशीं कुंदेला बरें वाटत नव्हतें म्हणून सिंधु एकटीच फिरायला गेली. चहा करण्याकरितां म्हणून ती लगबगीनें परत फिरली. भालचंद्र लवकर उठत नाहीं हें तिला ठाऊक होतें. पण ती घरीं जाऊन पाहते तों भालचंद्र

कुंदेच्या अंथरुणापाशीं बसून तिला चहा घेण्याचा आग्रह करीत आहे. कुंदा कांहीं केल्या उठत नव्हती. तेव्हां शेवटीं तो म्हणाला, "लहान मुलाला मांडीवर घेऊन बोंडल्यानं दूध पाजतात ना ? तसा चहा पाजीन हं मी तुला ! "

सिंधु याच वेळीं खोलींत गेली म्हणून भालचंद्र उठला; नाहीं तर त्यानें कुंदेवर तो नवा गोड प्रयोग करूनही पाहिला असता. भालचंद्र हसत हसत निघून गेला. कुंदा मात्र उठली रडव्या मुद्रेनेंच. सिंधूच्या मनांत आलें–मोठी नाटकी आहे ही कुंदा ! आतांच्या गमतीविषयीं आपण थट्टा करूं नये म्हणून डोकेंदुखीनें अगदीं त्रासून गेल्याचें सोंग करतेय् ती !

त्या दोघांबरोबर सिनेमाला गेल्यावरही सिंधूला हाच अनुभव येई. आणि मग समोरच्या चित्रपटापेक्षां जवळचा चित्रपट पाहण्यांतच तिला मोठी मौज वाटे. हा चित्रपट मूक असे खरा; पण लहानलहान नाजुक गमतींनीं त्यांतील गोडी वाढत असे. एकदां कुंदा थिएटरमध्यें खोकूं लागली. लगेच भालचंद्रानें आपल्या खिशांतील लवंग काढून ती तिला देत म्हटलें, " एकच लवंग आहे हं ! नी मलाही खोकला येण्याचं लक्षण दिसतंय् ! तेव्हां दातांनीं तोडून अर्धी तूं घे, उरलेली मी घेईन ! "

कुंदा हल्लीं गोल नेसूं लागलेली पाहून सिंधूला नवल वाटलें. कॉलेजांत असतांना ती नेहमीं म्हणे, "मी आपली सनातनी आहें. मला नाहीं हा सबगोलंकार आवडत ! " तिच्या त्या वाक्याची आठवण होऊन सिंधूनें जेव्हां तिला या बाबतींत प्रश्न केला, तेव्हां तिनें हसून उत्तर दिलें, " मला अजूनही गोल नेसणं आवडत नाहीं."

" तर तर ! "

" अगदीं खरं सांगतें."

" मग काय कापड–दुकानदार अभिप्रायाकरितां तुझ्याकड गोल पातळं पाठवतात वाटतं ? "

" तसं नाहीं ग ! "

" तुमच्या महिला परिषदेंत परवां ठरावबिराव पास झाला असेल बाई ! "

" कसला ? "

" साऱ्या बायकांनीं गोल नेसलंच पाहिजे म्हणून ! "

" मोठी चावट आहेस हं, तूं सिंधु ! "

" नी तूं ! मोठी लबाड झाली आहेस. गोल नेसणं मला आवडायला लागलं एवढी साधी गोष्ट कांहीं कबूल करायला तयार नाहींस तूं ! "

" खरंच मला हें आवडत नाहीं. पण–" कुंदा लाजली नी बोलतां बोलतां थांबली. त्या एका क्षणांत तिच्या गालांवर जी गुलाबी छटा येऊन गेली, ती पाहून सिंधूला वाटलें, संसार हा प्रातःकाळसारखा प्रसन्न वाटतो याचें कारण पत्नीच्या मुखावर अरुण खुलविण्याची कला पतीच्या प्रेमांत असते हेंच असलें पाहिजे.

कुंदा पुढें कांहींच बोलली नाहीं. पण भालचंद्राची आवड म्हणूनच ती गोल नेसूं लागली असावी हें उघड होतें.

एके दिवशीं सिंधूला कुंदेच्या टेबलावर ठेवलेला आपला कंगवा सांपडेना. गडबडींत कुंदेनें तो घेतला असेल नी कोठें तरी ठेवला असेल या समजुतीनें तिनें टेबलाचा एक खण उघडला. कंगवा त्यांत नव्हता. पण इतर सटरफटर वस्तूंबरोबर एक पत्रही त्यांत पडलें होतें. सिंधूची जिज्ञासा जागृत झाली. तिनें पत्राखालची सही पाहिली–'तुझाच–भालचंद्र.' तें पत्र वाचण्याचा मोह तिला अनावर झाला.

पत्र वाचून होतांच तिनें आजूबाजूला पाहिलें. मैत्रिणीला आलेलें प्रेमपत्र वाचणें हा एक प्रकारचा गुन्हा होता. पण––

सिंधु मनांत म्हणत होती–कुंदेला लहानसें बाळ झालें असतें तर त्याचे पापे घेतल्याशिवाय आपण राहिलों असतों का ? हें पत्रही तसेंच आहे. त्याच्यावर कुंदेचा हक्क असेल म्हणून कांहीं तें आपण वाचूं नये असें होत नाहीं.

चांदण्याच्या समुद्रांत तरंगावें तसें कांहीं तरी तें पत्र वाचून तिला वाटलें. त्यांतील तीं दोनतीन वाक्यें तर तिला राहून राहून आठवूं लागलीं. दोनतीन महिन्यांपूर्वीं कुंदा माहेरीं गेली होती. तेव्हां भालचंद्रानें तें पत्र तिला लिहिलें होतें. पत्रांत त्यानें एक मोठी गोड तक्रार केली होती. तो म्हणत होता, 'कुंदा, एक नी एक दोन असें लहानपणीं माझ्या मास्तरांनीं मला शिकविलें होतें; पण तें अगदीं चूक आहे. माझा हल्लींचा अनुभव असा आहे कीं एक नी एक मिळून सारें जग होतें. नी त्यांतला कुठला तरी एक उणा झाला, कीं दुसऱ्या एकाची किंमत शून्य होते !'

भालचंद कुठल्याशा बँकेंत नोकरीला होता. त्यामुळें त्यानें आपलें प्रेमसुद्धां बेरीजवजाबाकीच्या रूपानें व्यक्त केलें होतें. सिंधु मनांत म्हणाली, हें प्रेमाचें गणित किती गोड आहे ! नाहीं तर मी वर्गांत शिकवितें तीं उदाहरणें–अ आणि ब काम

करायला लागतात, व मध्येंच निघून जातो ! छीः छीः छीः ! कुंदा फार फार भाग्यवान् आहे, म्हणून तिला असला प्रेमळ पति मिळाला !

एक महिनाभर ती कुंदेचें मनांतल्या मनांत असें कौतुक करीत होती. शेवटीं तें कुंदेला बोलून दाखविल्याशिवाय आपणाला चैन पडणार नाहीं असें तिला वाटूं लागलें. एके दिवशीं बोलण्याच्या ओघांत ती म्हणाली, " कुंदा मोठी भाग्यवान् आहेस तूं !" आपले हे शब्द ऐकून कुंदा हसेल असें तिला वाटलें होतें. पण कुंदेनें तिच्याकडे विचित्र नजरेनें पाहिलें. ती उत्तरादाखल कांहीं तरी बोलणारही होती. इतक्यांत भालचंद्र एक पत्र घेऊन तेथें आला. तें पत्र कुंदेच्या मावसबहिणीचें होतें. मंजूनें कुंदेला लिहिलें होतें, 'उद्यांच्या उद्यां तुला यायलाच हवं माझ्याकडे. फार महत्त्वाचं काम आहे. भालचंद्रपंतांकडे पंधरा दिवसांची रजा माग चांगली. त्यांनीं रजा शिल्लक नाहीं म्हणून सांगितलं तर कुठल्या तरी डॉक्टरचं सर्टिफिकिट दाखीव त्यांना. सर्टिफिकिटाचे पैसे मी देईन. पण कांहीं झालं तरी तुला यायलाच हवं ! माझ्या गळ्याची शपथ आहे. नुसत्या माझ्याच गळ्याची नाहीं—तुझे दोन भाचे व एक भाची यांच्याही गळ्याची !'

कुंदा जायची तयारी करूं लागली. ती सिंधूला 'बरोबर चल' म्हणत होती; पण मंजूला सिंधूनें कधींच पाहिलें नव्हतें. परक्याच्या घरीं जाणें तिला कठीण वाटूं लागलें. ती कुंदेला म्हणाली, "नाहीं तरी पांचसहा दिवसांनीं मी जाणारच होतें परत. थोडी आधीं जाईन !"

कुंदेचा निरोप घेतांना सिंधु तिला म्हणाली, " किती आनंदांत माझा वेळ गेला इथं ! त्याची आठवण म्हणून—" किंचित् थांबून तिनें कुंदेला विचारलें, " तुझ्या टेबलावर तुमचा दोघांचा फोटो आहे ना ? त्याची आणखी एखादी प्रत आहे का ? "

कुंदेनें नकारार्थी मान हालविली. सिंधु विचारांत पडली. कुंदेच्या तें लक्षांत येतांच ती म्हणाली, " तुला हवाय् का तो फोटो ? खुशाल घेऊन जा ! तो कुठं तरी ट्रंकेंतच ठेवून देणार होतें मी !"

बिऱ्हाडीं परत आल्यावर सिंधूनें कॅलेंडरवरील तेवीस एप्रिल ही तारीख फाडली नाहीं. ती स्वतःशीं म्हणाली, 'सात जूनपर्यंत हीच तारीख राहूं दे तिथं !'

तिचें एकाकी जीवन पुन्हा सुरू झालें. कुंदेच्या घरच्या मधल्या अनुभवांमुळें तर तें अधिकच कंटाळवाणें वाटूं लागलें तिला. सकाळीं उठायचें, एकच कप

चहा करायचा, तो एकट्यानेंच प्यायचा, खाणावळींतला डबा येईल तेव्हां एकट्यानेंच जेवायचें, एकट्यानेंच फिरायला जायचें...या एकटेपणाची आग तिला असह्य झाली. तिनें नवींनवीं पुस्तकें आणून पाहिलीं; पण कुठल्याही पुस्तकाचीं पांचदहा पानें वाचलीं कीं तिला कंटाळा येई. मग पुस्तक तसेंच मिटून ती टेबलावरच्या भालचंद्र नी कुंदा यांच्या फोटोकडे पाहत राही. पाहतां पाहतां कुंदेच्या जागीं तिला आपली आकृति दिसूं लागे. पण भालचंद्राच्या जागीं मात्र—तिनें कितीही प्रयत्न केला तरी ती जागा शून्यच दिसे !

पांच जूनला तिला कुंदेचें पत्र आलें. त्यांत तिनें लिहिलें होतें—"माझी मावसबहीण मंजू तुझ्या गांवीं येत आहे. तिच्या सासरच्या नात्यांतलं एक लग्न आहे त्यासाठीं. तिला मीं तुझा पत्ता दिला आहे. फार बोलकी नी हुषार आहे ती. तुझी ओळख व्हावी अशी फार फार इच्छा आहे तिला. पांच मिनिटांत पांच वर्षांची मैत्रीण होईल ती तुझी. तुला 'अहो अहो' म्हणायचं नाहीं असं आत्तांच ठरवून ठेवलंय तिनं. तुझ्याकडे एक दिवस तरी मुद्दाम राहायला सांगितलं आहे मीं तिला. आठ जूनला ती घरीं परत येणार आहे. तेव्हां सात जून रोजीं ती तुझ्याकडे येईल. मी नी ती कांहीं दोन नाहीं हें तुला..."

"मी नी ती दोन नाहीं असं मीं लिहिलं खरं ! पण मंजूइतकी मी कुठं भाग्यवान् आहे ? सिंधु, तिचीं दोन्हीं मुलं पाहिलीं कीं माझं भान अगदीं हरपून जातं. माझ्यामागून दोनच महिन्यांनीं लग्न झालं तिचं. पण इतक्यांत तिला तीन मुलं झालीं; नी मी मात्र—

"मुलं माझ्यापाशींच ठेवून मंजू जाणार आहे. अगदीं धाकटी ब्रेत्रीसुद्धां ! काय लब्बाड पोर आहे म्हणतेस ! मी तिची आईच आहें असं तिला वाटतं कीं काय कुणाला ठाऊक ! मीं जवळ घेतलं कीं दूध प्यायसाठीं ती पदराशीं झोंबूं लागते. अशा वेळीं माझ्या मनांत काय कालवाकालव होते ती दुसऱ्याला सांगून समजायची नाहीं.

"माझ्यावर भालचंद्रपंतांचं फारफार प्रेम आहे. पण सिंधु, खरं सांगूं तुला ? पतीच्या नुसत्या प्रेमानं पत्नीचं समाधान होत नाहीं. एखाद्या वेलीला खूप-खूप सुंदर पानं असावींत; पण एकही फूल येऊं नये, तसं झालंय् माझं आयुष्य ! एके दिवशीं तूं म्हणाली होतीस, 'कुंदा, तूं मोठी भाग्यवान् आहेस !' पण मला वाटतं, मंजू खरी भाग्यवान आहे. देवानं कांहीं म्हटल्या कांहीं कमी केलं नाहीं तिला ! सात जून दिवशीं ती तुझ्या खोलींत कशी हसतहसत येईल पाहा !"

कुंदेचें लिहिणें अक्षरशः खरें होतें, याची सात जून दिवशीं संध्याकाळीं पांच मिनिटांत सिंधूला खात्री पटली. ‘ नमस्ते सिंधूताई ’ म्हणत मंजूनें तिच्या खोलींत जें पाऊल टाकलें, तें कुठेंच स्थिर होईना ! तिनें सारी जागा बघितली, सिंधूच्या खुर्चीवर बसून एका कागदावर स्वतःच्या चारपांच सह्या केल्या. टेबलावरील सारीं पुस्तकें चाळून पाहिलीं, खाटेवर बसून तिचा झोळणा झालेला नाहीं म्हणून आनंद व्यक्त केला नी शेवटीं ती कॅलेंडरपुढें येऊन उभी राहिली. तेथील तेवीस एप्रिल ही तारीख पाहतांच ती उद्गारली, “ अय्या ! तुझ्यासारख्या विदुषींनीं जगाच्या पुढं जायला हवं ! असं मागं राहून चालायचं नाहीं ! ” तिनें टराटर मधल्या तारखांचीं पानें फाडलीं. शेवटीं सात जूनची तारीख फाडीत ती म्हणाली, “ उद्यांचं काम आज करावं म्हणतात ना ? हें पाहा—!

सिंधु कॅलेंडरकडे टक लावून पाहूं लागली. आठ जून ! उद्यां शाळा सुरू होणार ! पुन्हां त्याच पिंजऱ्यांत जाऊन बसायचें, तीच हरभऱ्याची डाळ खायची नी तीच पोपटपंची करायची ! तिला त्या आठ तारखेचा असा राग आला—कॅलेंडरवर तारखा नसून वर्षें असतीं, तर तीं भराभर फाडून आपण २०४२ सालापर्यंत पोंचलों असतों असें ती स्वतःशीं म्हणत होती. हो, २०४२ सालीं सिंधु म्हणून कोणी एक मास्तरीण होती याची जगाला आठवणसुद्धां राहणार नाहीं !

सिंधु कॅलेंडरकडे टक लावून पाहत आहे हें मंजूच्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. ती तिच्यापुढें आली व तिच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली, “ सिंधुताई, तूं खरी भाग्यवान् आहेस ! ” मंजू आपली थट्टा तर करीत नाहीं ना, असा सिंधूला भास झाला. छे ! तिचे डोळे भावपूर्ण दिसत होते.

क्षणभर थांबून मंजू म्हणाली, “ कॉलेजांत असतांना मी नेहमी एक मनोराज्य करीत असें. पदवी घेतली कीं मास्तरीण व्हायचं, अगदीं पुरुष राहतात तसं राहायचं, मुलांमुलींना शिकवण्याचं पवित्र कार्य करायचं ! पण–”

मंजू मध्येंच थांबली. तिच्या टपोऱ्या डोळ्यांत आलेला उदासपणा सिंधूला पुरेपूर जाणवला. तिचें समाधान करण्याकरितां ती म्हणाली, “ चाळीस मुलींची मास्तरीण होण्यापेक्षां तीन मुलींची आई होण्यांत अधिक सुख आहे, मंजू.”

मंजू उद्गारली, “सुख ? संसार नी डोंगर दुरूनच सुंदर दिसतात, सिंधुताई.

जगाच्या दृष्टीनं मी फार सुखी आहे. पण खरं सांगू? ज्वालामुखी आंतल्या आंत पेटलेला असतो ना, तसं झालंय् माझं! पैसा आहे, पतीचं प्रेम आहे, चांगलीं तीन पोरं आहेत, पण..."

सिंधु मध्येंच कांहीं तरी बोलणार होती; पण ओढ्याला पूर आला कीं त्या पाण्यांत माणसाचें पाऊल ठरेनासें होतें. तिच्या शब्दांची अशीच स्थिति झाली. मंजूच्या बोलण्याच्या ओघापुढें ते कुठल्या कुठें नाहींसे झाले.

सिंधूचा हात हातांत घेऊन मंजू बोलूं लागली. तिच्या शब्दांपेक्षांही तिच्या स्पर्शांतून तिचें मनोगत सिंधूला अधिक स्पष्टपणें जाणवलें. ती अगदीं भावनावश होऊन बोलत होती.

"सिंधूताई, कॉलेजांत असतांना मीं वक्तृत्वांत बक्षिसं मिळवलीं होतीं, पण आतां 'चहा हवा का?' म्हणून 'त्यांना' विचारण्यापलीकडे माझ्या वक्तृत्वाचा कांहीं उपयोग नाहीं. पांच वर्षांत तीन बाळंतपणं झालीं माझीं! फिरायला जावं, सभेला जावं, कांहीं तरी करावं असं म्हटलं तर तें साधतच नाहीं कधीं! अंगावरलं मूल सभेला घेऊन जावं अन् तिथं त्यानं भोकांड पसरावं! साऱ्या सभेचा विरस होतो मग! नी तीन मुलांतलं एक ना एक कशानं तरी आजारी असतंच. कांहीं झालं तरी आईचा जीव. तो गप्प कसा बसणार? काळजी, जाग्रणं एक ना दोन! या धबडग्यांत जीव कसा मेटाकुटीला येतो बघ! मुलं म्हणजे फुलं असं कवि म्हणतात ना? वेड्यांच्या इस्पितळांत नेऊन ठेवायला हवं त्यांना! अग, एक एक मूल म्हणजे नारळाचं झाड. दहा वर्षं कष्ट काढावेत तेव्हां कुठं तें मोठं होणार नी आपलं काम..."

मंजू मध्येंच थांबली. सिंधूच्या खाटेवर बसत ती म्हणली, "तुरुंगांतून पळून गेलेल्या कैद्याला कित्ती कित्ती आनंद होत असेल! आज मी अगदीं सुखानं झोंपणार. आज शेजारीं बेबीचं रडगाणं नाहीं नी बाबूचं दात खाणंही नाहीं. कुंदा बसेल तिकडे जागत मोठ्या हौसेनं. तीन्ही मुलांचा फोटो मागून घेतलाय् तिनं माझ्याकडनं! पण म्हणावं—फोटो फसवे असतात. मुलं फोटोंतच सुंदर दिसतात."

रात्रीं झोंपेपर्यंत मंजूची याच तऱ्हेची एकसारखी बडबड चालली होती नी सिंधु पुनः पुन्हां मनांत म्हणत होती, 'हिला वक्तृत्वांत बक्षिसं मिळालीं असलीं पाहिजेत हें अगदीं उघड आहे.'

रात्रीं मंजू शांतपणानें झोंपलेली पाहून मात्र सिंधूला फार आश्चर्य वाटलें! तिनें

कल्पना केली होती-तिला मधूनच मुलांची आठवण होईल, मग ती या कुशी-वरून त्या कुशीवर तळमळायला लागेल, आपण जाग्या आहों असें पाहून मुलांच्या खोड्या नी खेळ यांच्याविषयीं ती बोलायला सुरुवात करील—

कल्पना नी सत्य यांत अनेकदा दोन ध्रुवांचें अंतर असतें अशी सिंधूची खात्री झाली.

दुसरे दिवशीं साडेदहा वाजतां सिंधु व मंजू जेवल्या. सिंधु पुस्तकांची पिशवी हातांत घेऊन शाळेला जायला तयार झाली. मंजू तिच्याजवळ जाऊन म्हणाली, "एक गंमत करूंया का ?"

" कसली ? "

" थोडा वेळ मी मास्तरीण होतें ! तुझ्या शाळेपर्यंत–"लगेच तिनें सिंधूच्या हातांतील पिशवी ओढूनही घेतली.

एखादी लहान मुलगी नवा फ्रॉक घालून ऐटीनें मिरवूं लागते ना ? मंजू रस्त्यानें तसेंच करीत होती. मध्येंच कोणीं तरी मंजूकडे पाहत सिंधूला विचारलें, "नव्या मास्तरीणबाई वाटतं ? " सिंधूनें उत्तर द्यायच्या आंतच मंजू बोलून गेली, "हो !"

शाळेसमोर सिंधूचा निरोप घेतांना मंजू म्हणाली, "अग बाई, विसरलेंच कीं !"

"काय ! "

" तुझा एक फोटो हवाय् मला ! तूं पुस्तकं घेऊन शाळेला चालली आहेस असा !"

सुट्टी सुरू झाली त्या दिवशीं टेबलाच्या खणांत रागानें फेकून दिलेल्या आपल्या फोटोची आठवण सिंधूला झाली. फोटो फसवे असतात असें मंजूला सांगायचें तिच्या मनांत आलें. पण—

मंजूनें अधीरतेनें विचारलें, "पाठवून देशील ना ? "

सिंधूनें मानेनें ' हो ' म्हटलें.

शाळेची घंटा खणखणूं लागली–खण-खण-खण ! सिंधूला वाटलें–कैद्यांची तुरुंगांत परतायची वेळ झाली कीं अशीच घंटा वाजवीत असतील, नाहीं !

सिंधूचा निरोप घेऊन मंद पावलांनीं पुढें जाणाऱ्या मंजूच्या कानांत तो खण-खणाट एकसारखा घुमत होता. तिच्या मनांत येत होतें–संसार हा यज्ञ आहे असें म्हणतात. पूर्वींच्या यज्ञांत मुक्या प्राण्याला बळी देतांना पुण्यशील ऋषि असाच घंटानाद करीत असतील, नाहीं ?

१९४२

# पहिलें प्रेम

## २

लग्न होण्यापूर्वीच एखाद्या प्रौढ कुमारिकेनें मुलांच्या खेळण्याकडे उत्सुकतेनें पाहावें त्याप्रमाणें बी. ए.चा निकाल होण्यापूर्वीच मी एम्. ए.चीं पुस्तकें पाहूं लागलों होतों.

युनिव्हर्सिटीनें नेमलेल्या कादंबऱ्यांपैकीं एकीचें नांव वाचून मी चकितच झालों—"पहिलें प्रेम !"

इंग्रजी शाळेंत गेल्यावर हरिभाऊ आपट्यांच्या आणि नाथमाधवांच्या कादंबऱ्या मीं मोठ्या आवडीनें वाचल्या होत्या. चवथी पांचवींत हडपांच्या कादंबऱ्याही कांहीं उघडपणानें व कांहीं चोरून—मीं वाचून संपविल्या होत्या. कॉलेजमध्यें आल्यावर तर फडक्यांनीं मला वेडच लावलें ! डॉ. केतकर, वामनराव जोशी, खांडेकर यांच्या कादंबऱ्यासुद्धां मीं एकएकदां वाचून हातावेगळ्या केल्या; पण त्यांच्यांत कांहीं माझें मन रमलें नाहीं. फडक्यांच्या कादंबऱ्या मात्र कितीही वेळ वाचल्या तरी माझी तृप्तिच होत नसे. काजूगर किंवा द्राक्षें खातांना माणसाला कधीं तरी कंटाळा येतो का ? 'जादूगार,' 'दौलत,' 'अटकेपार' वाचतांना माझीही तशीच स्थिति होई.

आणि म्हणूनच एम्. ए.च्या अभ्यासक्रमांत "पहिलें प्रेम" या अप्रसिद्ध कादंबरीचें नांव वाचून मला आश्चर्य वाटलें ! चिं. गो. गाडगे हें त्या कादंबरीकाराचें नांव मीं डोकें खाजवून पाहिलें; पण चिं. गो. गाडगे हें नांव कुठें

वाचलें तें सुद्धां आठवेना ! या नांवाचा कादंबरीकार मराठींत झाला असेल हेंच मला खरें वाटेना ! असल्या भयंकर नांवाच्या मनुष्यानें " पहिलें प्रेम !" ही कादंबरी लिहावी आणि वानप्रस्थाश्रमाला शोभणारीं पुस्तकेंच विद्यार्थ्यांनीं वाचणें योग्य असें मानणाऱ्या आमच्या युनिव्हर्सिटीनें तीं परीक्षेला लावावीं या दोन्हींपैकीं अधिक असंभाव्य गोष्ट कोणती, तेंच मला कळेना !

बी. ए.चा निकाल लागला त्या दिवशीं रात्रीं आनंदामुळें किती तरी वेळ मला झोंप आली नाहीं. एक वाजेपर्यंत मी उघड्या डोळ्यांनीं अनेक सुखस्वप्नें पाहत होतों.

एक वाजल्यावर हळूहळू माझे डोळे मिटूं लागले. दगडांनीं भरलेल्या जगांतून फुलांनीं सुगंधित झालेच्या दुसऱ्या जगांत आपण जात आहों असा मला भास झाला.

माझ्या अर्धजागृत मनापुढें एकदम दोन शब्द उभे राहिले–" पहिलें प्रेम ! " एम्. ए.ला नेमलेली ती कादंबरी. काय बरें असेल त्या कादंबरींत ?

पहिलें प्रेम ! माझी बालमैत्रीण मंदाकिनी माझ्या डोळ्यांपुढें उभी राहिली. तिच्या गोड आठवणींच्या झोंपाळ्यावर माझें अस्वस्थ मन केव्हां झोंपीं गेलें तें कळलेंच नाहीं मला !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं गांवांतील पुस्तकांचीं बहुतेक दुकानें मीं पालथीं घातलीं, पण "पहिलें प्रेम" या कादंबरीचें नांवसुद्धां कोणाला ठाऊक नव्हतें ! मला वाटलें–बाजारांत न मिळणारें पुस्तक लावण्यांत युनिव्हर्सिटीचा अगदीं हातखंडा आहे. विद्यार्थी नापास व्हावेत म्हणूनच असलीं अलभ्य पुस्तकें परीक्षेला लावलीं जात असावींत. "पहिलें प्रेम" ही कादंबरी जर इतकी चांगली असती, तर आज तिची दुसरी तिसरी नाहीं तर चवथी आवृत्ति बाजारांत मिळायला काय हरकत होती ?

ही कादंबरी फार भिकार असली पाहिजे अशी माझी खात्री झाली. माझ्या मतें ती एम्. ए.ला लावण्याचें कारण एकच होतें ! तिचा कर्ता अभ्यासक्रम ठरविणाऱ्या मंडळांत असावा !

छे: ! प्रोफेसर गाडगे–प्रोफेसर घाडगे व घोडगे हे ऐकून ठाऊक होते मला. पण गाडगे नांवाचा मनुष्य कुठल्याही कॉलेजांत प्रोफेसर नव्हता. पुस्तकें लावणाऱ्या माणसांपैकीं कोणाचा तरी तो सासरा असावा आणि आपल्या

बायकोला बेहद्द खूष करण्याकरितां त्या महात्म्यानें आम्हां विद्यार्थ्यांवर ही आपत्ति आणली असावी अशी मीं शेवटीं स्वतःची समजूत करून घेतली.

पुस्तकाच्या शेवटच्या दुकानांत मी निराश मनानेंच शिरलों. एक म्हातारे-बुवा खोकत खोकत एका अरुंद मळकट गादीवर बसले होते. त्यांची मुद्रा पाहतांच शिवलीलामृत आणि पांडवप्रताप यांच्याशिवाय दुसरें कुठलेंही पुस्तक या दुकानांत मिळणें शक्य नाहीं, अशी माझी खात्री झाली.

" काय हवंय् ? " म्हातारेबुवांनीं मला प्रश्न केला.

" कांहीं नको." म्हणून परत जाण्याचें माझ्या मनांत आलें होतें; पण पहिलें प्रेम असें पुस्तकाचें नांव सांगितलें कीं म्हातारेबुवा तरुण पिढीवर जो ताशेरा झोडतील तो ऐकण्याची विलक्षण इच्छा होऊन मी उद्गारलों,

" एक कादंबरी हवीय् ! "

" कुठली ? "

" पहिलें प्रेम ! "

त्या वृद्ध गृहस्थाच्या मुद्रेवर स्मिताची रेषा क्षणभर कां चमकून गेली तें मला कळेना ? हीच स्वारी दस्तुर खुद्द चिं. गो. गाडगे असावेत अशीही शंका माझ्या मनांत येऊन गेली.

माझ्याकडे निरखून पाहत म्हातारेबुवा म्हणाले,

" पंचवीस वर्षांपूर्वी या कादंबरीनं वेड लावलं होतं लोकांना ! एका वर्षात तीन आवृत्त्या निघाल्या तिच्या !"

माझ्या जन्मापूर्वी प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीच्या पहिल्या वर्षी तीन आवृत्त्या निघाल्या होत्या ! मग एवढ्या लोकप्रिय कादंबरीची आज बाजारांत विसावी आवृत्ति असायला हवी होती ! पण—

" तिची चवथी आवृत्ति मी छापणार होतों ! "

" मग ? "

" लेखकानं परवानगी दिली नाहीं ! आपल्याला ती कादंबरी छापायची इच्छा नाहीं, असं कळवलं त्यानं मला ! "

मी पाहतच राहिलों.

एवढ्या लोकप्रिय कादंबरीची पुढील आवृत्ति कां निघूं नये ? कदाचित् पैशाच्या बाबतींत कांहीं बांधा आला असेल असें वाटून मीं म्हटलें,

" लेखकाला खूप पैसे हवे होते वाटतं ! "

तो वृद्ध गृहस्थ हसून म्हणाला,

" अहो, त्या कादंबरीवर बंगला बांधला असता त्यानं ! पण आपल्याला ती पुन्हा छापायची नाहीं असं त्या गाडगेबुवानं निक्षून कळवलं ! "

मीं मनांत म्हटलें—"कलावंत मोठे विक्षिप्त असतात हेंच खरें ! "

आतां मात्र " पहिलं प्रेम ! " या कादंबरीविषयीं माझ्या मनांत मोठें कुतूहल उत्पन्न झालें. ती नाहीं तर नाहीं, त्या लेखकाची दुसरी एखादी कादंबरी मिळत असली तर ती आत्तांच्या आत्तां विकत घेऊन वाचावी अशी विलक्षण इच्छा माझ्या मनांत चमकून गेली.

मीं त्या वृद्ध गृहस्थाला तसें विचारतांच तो उत्तरला,

" त्या लेखकाचं नांवसुद्धां पुन्हा ऐकलं नाहीं मीं ! मग कादंबरीची गोष्ट कशाला हवी ? "

कुठल्याही क्षेत्रांत यश मिळालं कीं तें टिकवण्यासाठीं आणि तें टिकलें नाहीं तरी आपल्या स्थानाला चिकटून राहण्यासाठीं माणसें भयंकर धडपड करीत असतात ! मग एक वर्षांत जिच्या तीन आवृत्त्या निघाल्या त्या कादंबरीच्या लेखकानें पुढें एक अवाक्षरसुद्धां लिहूं नये ही किती आश्चर्याची गोष्ट होती ! माझ्या मनांत आलें–कीर्ति ही मेनकेसारखी आहे. तिच्या मोहांत सांपडणार नाहीं असा विश्वामित्र...मनांतील हें वाक्य पुरें व्हायच्या आधींच मला दुसरें एक वाक्य आठवलें–ऋषींत विश्वामित्र फार हें खरें असलें, तरी त्यांच्यांतही एखादा शुक मुनि असतोच !

न मिळणाऱ्या गोष्टीविषयीं मन अधिक विचार करूं लागतें कीं काय कुणाला ठाऊक ! तो सबंध दिवस "पहिलें प्रेम" या कादंबरीचें कथानक काय असावें याची कल्पना करण्यांत माझें मन गुंग होतें.

रात्रीं अंथरुणावर पडल्यावर मला वाटलें, त्या कादंबरींतील नायक माझ्यासारखा एखादा तरुण असेल, आणि नायिका—

माझ्या डोळ्यांपुढें मंदाकिनी उभी राहिली.

पांचव्या वर्षापासून चौदाव्या वर्षापर्यंत मंदाकिनी आमच्या शेजारीं राहत होती. या नऊ वर्षांतील किती तरी मधुर प्रसंग राहून राहून माझ्या डोळ्यांपुढें उभे राहूं लागले.

एकदां माझ्याजवळ एकच पेरू होता. मीं चिमणीदांतानें त्याचा तुकडा काढून मंदाला तो दिला. तिनें तो खायला सुरुवात करतांच बाकीचीं पोरें टाळ्या पिटीत आणि आम्हां दोघांकडे मिस्किलपणानें पाहत ओरडलीं,

" सुमुहूर्त सावधान ! वाजवा रे वाजवा ! "

त्या थट्टेनें आम्हां दोघांना गुदगुल्याच झाल्या. पुढें पुढें तर मंदाची आई माझ्या आईशीं बोलतांना म्हणे, " मला चार मुली असल्या, तरी लग्नाची काळजी मात्र तिघींचीच आहे ! "

एकदां मंदाला मीं "I remember, I remember" ही कविता समजावून सांगत होतों. "तूं मोठी झाल्यावर लहानपणींच्या कोणत्या गोष्टी तुला आठवतील ?" असें मीं मंदाला विचारलें. तेव्हां तिनें लाजत उत्तर दिलें, " एक पेरूचा तुकडा ! "

मंदाचे वडील फार देवभोळे होते. त्यांनीं तिला एका वहींत दररोज शंभर वेळां 'राम, राम' असें लिहायची संवय लावली होती. एकदां सहज ती वही मीं चाळून पाहिली. त्या रामाच्या पलटणींत मध्येंच मला तिनें उभें केलें होतें !

मी मॅट्रिकमध्यें असतांना तिच्या वडिलांची बदली झाली. ती मंडळी रात्रीच्या गाडीनें जायची होती. पण सकाळपासून मला कसें उदास वाटूं लागलें होतें. दुपारीं मी नीट जेवलों नाहीं असें पाहून आई मला म्हणाली,

" उद्यां बायको माहेरीं जायला निघाल्यावर काय करशील रे ? " तें ऐकून मी अगदीं मनापासून हंसलों होतों.

काळोख पडल्यावर मंदा माझा निरोप घेण्याकरितां आली. आम्हां दोघांना कांहींच बोलवेना. तिच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलेलें पाहून मीं म्हटलें, " आतां लहान आहेस का ग तूं रडायला ? "

पण माझ्या तोंडांतून हे शब्द आणि डोळ्यांतून अश्रू बरोबरच बाहेर पडल्यामुळें मंदा हंसत म्हणाली, "तूं तर माझ्याहूनही लहान झाला आहेस !"

मंदाच्या असल्या मधुर आठवणी एम. ए.चे वर्ग सुरू होईपर्यंत माझ्या मनांत वारंवार येत होत्या.

पण लवकरच मी माझा अभ्यास आणि शोभेचा सहवास यांत रंगून गेलों. शोभेचे वडील सबजज्ज होते. त्यांची येथें बदली झाल्यामुळें तिलाही आपलें कॉलेज बदलावें लागलें होतें. पण एकदोन महिन्यांतच आमची इतकी गट्टी

जमली, कीं परक्या मनुष्याला आमची अगदीं एफ्. वाय्. पासून ओळख असावी असेंच वाटलें असतें.

तिची माझी ओळख झाली ती पहिलें प्रेम या कादंबरीवरूनच! ती कादंबरी बाजारांत, लायब्ररीयांत कुठेंच मिळत नव्हती. तिनें आपल्या वडिलांना सांगून ती मुंबईच्या कुठल्याशा ग्रंथसंग्रहालयांतून आणविली. व्हरांड्यांत ती कादंबरी उघडून वाचीत शोभा उभी होती. एकदम सोसाट्याचा वारा आला आणि त्या पुस्तकाच्या पत्रावळी पतंगासारख्या उडूं लागल्या. मी चपळाई करून धांवलों आणि तीं पानें पकडलीं. माझ्या हातांतून तीं घेतांना शोभा असें गोड हंसली! तिचें हास्य म्हणत होतें—जुन्या काळांत नायक वाघाची शिकार करून नायिकेचें मन जिंकीत असे! आतां काळ बदलला असला तरी पुरुषाच्या पराक्रमावर स्त्री लुब्ध होते हा सिद्धांत कांहीं बदलला नाहीं!

प्रीति आणि नदी यांच्यावर एखाद्या कवीनें कविता लिहिली आहे कीं काय तें मला माहित नाहीं; पण दोन्हींचेंही मूळ माणसानें शोधूं नये हेंच खरें. माझी आणि शोभेची ओळख अगदीं साध्या प्रसंगांतून झाली; पण किती लवकर तिचें प्रेमांत रूपांत झालें!

आमचें एकमेकांवर प्रेम आहे हें आम्हीं तोंडानें कधींच कबूल करीत नव्हतों. पण एक दिवस मी टेनिसकोर्टवर गेलों नाहीं किंवा एखाद्या रविवारीं ती सिनेमाला जाण्याकरितां वेळेवर आली नाहीं, तर तिच्या किंवा माझ्या मनाची जी तडफड होई, ती आम्हां दोघांनाच ठाऊक!

तिचा खेळकरपणा आणि माझा कोटिबाजपणा यांच्यापैकीं कोण कुणाला आपल्याकडे ओढीत होतें हें सांगणें कठीण आहे. सिनेमांतील सूचक गोष्टींविषयीं तीनचार मित्रांचा एकदां वादविवाद चालला असतांना आपल्या डोक्यांतील फूल काढून तें माझ्या बटन-होलला लावीत तिनें सर्वांना विचारलें,

"याचा अर्थ तुम्ही काय कराल?"

"प्रेम." एकजण हळूच पुटपुटला.

ती हसून म्हणाली,

"छे:! यांचा कोट फार जुना झालाय्. तो बरा दिसावा म्हणून हें फूल लावलं मीं तिथं!"

एके दिवशीं रात्रीं चांदण्यांत खूप वेळ बोलत बसलों होतों आम्ही. शेवटीं उठतां उठतां ती म्हणाली,

" फार उशीर झाला ! आतां आई तुमची चांगली शोभा करील ! "

" मग त्यांत काय बिघडलं !" मी उद्गारलों.

ती आश्चर्यानें माझ्याकडे पाहूं लागली.

मीं प्रत्येक शब्दावर जोर देत म्हटलें,

" शोभा माझी झाली तर त्यांत आनंदच आहे मला ! "

" पहिलें प्रेम " ही कादंबरी परीक्षेकरितां वाचतांना कांहीं माझ्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले नव्हते. पण एम्. ए.च्या निकालादिवशीं मी पास झाल्याची तार आली, तेव्हां त्या कादंबरींतील खरें कारुण्य मला कळलें. आतां शोभेची नी माझी ताटातूट होणार हें उघड होतें.

त्या कादंबरींतील नायक आणि नायिका यांचें कॉलेजांत एकमेकांवर प्रेम बसतें; पण पुढें प्रवाहपतित होऊन दोघांना दूर जावें लागतें. दोघांनाही आई-बापांच्या इच्छेसाठीं मनाविरुद्ध लग्न करावें लागतें. पण पहिल्या प्रेमाच्या स्मृतीमुळें सुखानें संसार करणें त्यांना अशक्य होऊन जातें. शेवटीं नायक एके रात्रीं घराबाहेर पडून संन्यासी होतो. नायिका पहिलें प्रेम हेंच खरें प्रेम, तें हरपलें म्हणून आपण विधवा झालें असें मानून घराबाहेर पडते आणि नर्स होते. पुढें एका लहान मुलाचा प्राण वांचवितांना संन्याशाला अपघात होतो. इस्पितळांत शुद्धीवर येतांच त्याला जी मूर्ति दिसते ती आपल्या प्रियतमेची !

हें कथानक एकसारखें माझ्या मनांत घोळूं लागलें. पहिलें प्रेम–शोभा–तो संन्यासी–ती नर्स. चांगल्या रीतीनें एम्. ए. होऊनही ती सारी रात्र मीं अस्वस्थपणानें काढली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शोभा माझा निरोप घेण्याकरितां आली. तिच्या वडिलांनीं तिला विलायतेला पाठवायचें ठरविलें होतें. अश्रुपूर्ण डोळ्यांनीं एकमेकांचा निरोप घेतांना "पहिलें प्रेम" या कादंबरींतील किती तरी वाक्यें आम्हां दोघांना आठवत होतीं.

" मनुष्य सर्व कांहीं विसरेल, पण पहिलें प्रेम विसरणार नाहीं."

" मनुष्य एकदांच जन्माला येतो आणि एकदांच प्रेम करतो !"

" पहिलें फूल, पहिलें मूल, पहिलें प्रेम–पहिल्याची गोडी दुसऱ्याला नाहीं."

पाठमोऱ्या शोभेकडे पाहत माझें मन म्हणत होतें—नाहीं, मी शोभेला कधींही विसरणार नाहीं.

काकांच्या ओळखीमुळें मुंबईच्या एका सिनेमाकंपनींत मला लवकरच नोकरी मिळाली. मास्तरकी करून पन्नास एके पन्नास करीत बसण्यापेक्षां कांहीं तरी नवीन करावें अशी मलाही फार इच्छा होती. आलेल्या संधीचा फायदा घेण्याचें मीं ठरविलें.

मात्र स्टुडिओंतील कामांत माझें लक्ष कितपत लागेल याविषयीं मी साशंक होतों. शोभेच्या आठवणीनें घटकेघटकेला व्याकुळ होणारें माझें मन ? छे: ! स्टुडिओंतील नटी पाहून त्याला शोभेची अधिकच आठवण होईल आणि मग—

पण माझी ही शंका अगदीं निराधार होती असा मला अनुभव आला. दिग्दर्शकाला वाङ्मय दृष्ट्या शक्य तेवढी मदत करणें हें माझें मुख्य काम असल्यामुळें त्यांत माझा बराच वेळ जाई. शिवाय स्टुडिओंत चालू असलेल्या चित्रपटांत सुनेत्रा नांवाची सुशिक्षित नटी काम करीत होती. तिनें आपणहून माझ्याशीं ओळख करून घेतली. तिची लायब्ररी फार चांगली होती. सिनेमा पाहण्याचें तर अगदीं वेड होतें तिला. पण चित्राला एकटें जायचा मात्र तिला कंटाळा येई. तिची वृद्ध आई तिच्याबरोबर सिनेमाला जायला मुळीं तयार नसे. त्यामुळें तिचा माझा परिचय वाढत गेला.

सुनेत्राच्या सहवासांत मी शोभेला विसरून गेलों असें मात्र नाहीं. कपड्यांच्या कपाटांत ठेवलेल्या केवड्याचा मंद मधुर सुगंध तो तेथून काढल्यावरही अनेक दिवस तेथें जाणवतो. प्रिय माणसाची स्मृतिही अशीच असते.

पण दूर गेलेल्या केवड्याच्या मागें रेंगाळत राहिलेल्या सुगंधापेक्षां पुढ्यांत असलेल्या गुलाबाचा सुवास अधिक मोहक वाटल्यावांचून राहत नाहीं. सुनेत्रेच्या बाबतींत माझी तशीच स्थिति झाली. आला दिवस माझ्या मनांतल्या शोभेच्या चित्राचे रंग फिक्के करीत होता. इतकेंच नव्हे, तर त्याच रंगानें तो सुनेत्रेचें चित्र रंगवीत होता.

चालू असलेलें चित्र पुरें होतांच कंपनींत पुढच्या कथेचा प्रश्न निघाला. ‘ देवदासा ’ची लोकप्रियता डोळ्यांपुढें असल्यामुळें दिग्दर्शकांनीं तसलें कथानक हवें अशी मागणी केली. असलें कथानक कोणत्या कथालेखकाकडून चांगलें लिहून होईल याचा मी वाङ्मयदृष्ट्या विचार करूं लागलों, तोंच—

मला एकदम "पहिलें प्रेम" या कादंबरीची आठवण झाली. मीं कथानकाचा सारांश सांगतांच डायरेक्टर आनंदानें नाचूं लागले. त्या कादंबरीचे चित्रपटाचे हक्क मिळविण्याच्या कामावर माझीच योजना झाली.

माझ्यापुढें दोन संकटें उभीं राहिलीं. एक श्री. चिं. गो. गाडगे या व्यक्तिशः कुणालाही ठाऊक नसलेल्या गृहस्थाचा पत्ता कसा शोधून काढायचा! आणि नशिबानें तो मिळाला तर आपल्या कादंबरीची पुढील आवृत्ति काढायला बंदी करणाऱ्या या विक्षिप्त वल्लीकडून चित्रपटकथेचे हक्क कसे मिळवायचे?

पण दैवाचा वारा अनुकूल असला, कीं कोठल्याही वादळांतून मनुष्य सुखरूप पार पडतो यांत शंका नाहीं. याच वेळीं डॉ. केतकरांची रस्त्यांत सहजासहजीं गांठ पडली. मीं गाडग्यांची गोष्ट काढतांच खिशांतले शेंगदाणें तोंडांत टाकीत टाकीत त्यांनीं मला गाडग्यांचा माहीमचा पत्ता, अगदीं त्यांचा खोलीनंबरसुद्धां सांगितला.

खोलींतील सामानसुमानावरून गाडग्यांची स्थिति गरिबीची आहे हें उघड दिसत होतें. मला मोठा आनंद झाला. मोबदल्याची रक्कम थोडीफार वाढविली कीं आपलें काम फत्ते होईल अशी माझी खात्री झाली.

माझ्याकडे पाहत गाडगे उद्गारले.

" एक मिनिटभर थांबा हं! आत्तां संपतील हीं प्रुफं! "

प्रुफें?

स्वारी पंचवीस वर्षांनीं दुसरी कादंबरी लिहीत असावी! मीं मनांत विचार केला. या दुसऱ्या कादंबरीविषयीं सुद्धां आपण बोलून ठेवूं.

प्रुफांचा शेवटला कागद संपतांच चिं. गो.नीं मान वर केली.

" काय हवंय आपणांला? "

" मी एका सिनेमा कंपनीकडून आलों आहें. "

त्यांची आश्चर्यचकित मुद्रा पाहतांच मला हसूं कोसळलें. पण तें शक्य तेवढें आवरून मीं म्हटलें,

" आपणांला दोन हजार रुपयें मिळायची संधि आली आहे! "

" दोन हजार! "

स्वरावरून स्वारीच्या तोंडाला चांगलें पाणी सुटलें आहे असें दिसत होतें. मीं मान हलवून म्हटलें, " हो! "

" आपल्या 'पहिलें प्रेम !' या कादंबरीचा चित्रपट काढणार आहों आम्ही !"

"शक्य नाहीं !" त्यांच्या स्वरांतील कठोरपणा मला अगदीं विलक्षण वाटला.

मी गोंधळून गेलों. आपली कथा पडद्यावर यावी अशी मोठमोठ्या लेखकांची सुद्धां इच्छा असते. मग हा अप्रसिद्ध मनुष्य दारांत चालून आलेल्या कीर्तीकडे पाठ कां फिरवीत आहे ? हा दरिद्री मनुष्य सुखासुखी दोन हजार रुपयांवर लाथ कां मारीत आहे ? कांहीं केल्या हें कोडें मला उलगडेना !

माझ्या मनांतील गोंधळ माझ्या मुद्रेवर प्रतिबिंबित झाला असावा. किंचित् हसून तो गृहस्थ म्हणाला,

" ही कादंबरी प्रसिद्ध झाली त्या वर्षी हिच्या तीन आवृत्त्या निघाल्या !"

" आणि चवथी काढायला तुम्हीं परवानगी दिली नाहीं !"

तो नुसता हसला.

मीं म्हटलें, " लोकप्रियतेचा एकदम इतका कंटाळा कां आला तुम्हांला !"

" मला असत्यावर आधारलेली लोकप्रियता नकोय् !"

" असत्य ?" मी आश्चर्यानें उद्गारलों.

तो गृहस्थ शांतपणानें म्हणाला, "काव्य आणि सत्य हीं दुर्दैवानं भिन्न आहेत. 'पहिलें प्रेम' ही कादंबरी मीं लिहिली, तेव्हां मला काव्याची कावीळ झाली होती. कॉलेजांत ज्या मुलीशीं माझी मैत्री होती, तिचं दुसऱ्याशीं लग्न होतांच माझ्या हृदयावर कुणीं तरी भयंकर घात घातला असं मला वाटलं. हळव्या मनाच्या त्या विचित्र वेदनांत अगदीं तिरीमिरीनं मीं ती कादंबरी लिहिली. पण पुढं लग्न झाल्यावर मला पक्कं कळून चुकलं—"

" काय ?"

" पहिलं प्रेम काव्याच्या दृष्टीनं कितीही सुंदर असलं, तरी जीवनाच्या दृष्टीनं कुठलंही प्रेम सरस असतं !"

लग्नाचा अनुभव कांहीं एका वर्षातच पुरा होत नाहीं हें लक्षांत येऊन मीं विचारलें,

" पण कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर एका वर्षातच ती छापायची नाहीं असं तुम्हीं कां ठरवलं ? "

" माझी कादंबरी वाचून प्रेमभंग झालेल्या माझ्या एका मित्रानं आत्महत्या केली !"

" आत्महत्या ?"

तो गृहस्थ हसून म्हणाला, "प्रेमाच्या खोट्या कल्पनेनं जगांत किती आत्म-हत्या होत आहेत, जीवंतपणीं किती माणसं मरण भोगीत आहेत हें त्या वेळीं माझ्या लक्षांत आलं. मीं या भावनेचं सामाजिक संशोधन करायचं ठरवलं. वीस वर्षं मी खेड्यांत, शहरांत, श्रीमंतांत, गरिबांत जिथं संधि मिळेल तिथं तिथं वावरलों, प्रेमाचे सर्व तऱ्हांचे नमुने पाहिले, शेंकडों व्यक्तींच्या जीवन-कथा ऐकल्या आणि त्या सर्वांचा पांच वर्षं शास्त्रीय दृष्टीनं विचार करून—"

हा गृहस्थ 'प्रेम बिम सब झूट आहे !' असलें तत्त्व आतां मला सांगतो कीं काय, या विचारांत मी पडलों. पण समोर पडलेलीं प्रुफें उचलून घेऊन त्यांतलें शेवटचें पान पुढें करीत तो म्हणाला,

" हें एवढं वाचा !"

" प्रेम आणि जीवन " या त्याच्या ग्रंथांतील मजकूर होता तो ! मी वाचूं लागलों—

" प्रेम ही मानवी जीवनाला आधारभूत असलेली भावना आहे यांत शंका नाहीं. पण कवींनीं तिच्यावर अद्भुतरम्यतेचे रंग चढवितां चढवितां तिचें स्वरूप अतिशय विकृत करून ठेवलें आहे. एक म्हणतो, 'प्रेम स्वर्गीय आहे !' दुसरा म्हणतो, 'तें दिव्य आहे !' तिसरा उद्गारतो, 'पहिलें प्रेम हेंच खरें प्रेम !' चवथा सांगतो 'प्रेमभंगाची जखम इतकी जबर असते, कीं ती कधींच भरून येत नाहीं.'

" हे सगळे लोक खरे आहेत आणि खोटेही आहेत. जीवन हें नुसतें काव्य असतें तर त्यांचें म्हणणें पूर्णपणें खरें ठरलें असतें. पण काव्य हें जीवनाचें शरीर आहे, शास्त्र हा त्याचा आत्मा आहे.

" या शास्त्रीय दृष्टीनें पाहिलें तर आपल्या बाळपणच्या किंवा कॉलेजांतील मैत्रिणींविषयीं तरुणांच्या मनाला जें स्वाभाविक आकर्षण वाटतें, त्याला प्रेम म्हणणें अत्यंत कठीण आहे. तें प्रेम आहे असें मानलें तरी त्या बाबतींतील निराशा मनुष्याच्या आयुष्याचा नाश करण्याइतकी मोठी असूं शकत नाहीं. तसें पाहिलें तर असल्या प्रेमभंगाच्या जखमेचा वण तेवढा मागें राहतो. ज्या मनाची असली जखम भरून येत नाहीं तें फाजील हळवें किंवा विकृत झालेलें असतें. 'पहिल्या प्रेमा'ची आठवण न विसरण्याच्या मुळाशीं अनेकदां

अतृप्त अहंकार अथवा दुखावलेला अभिमान असतो. ज्या मनोवृत्तीमुळें मानवजातीला वर्तमानकाळापेक्षां भूतकाळ चांगला होता असें अकारण वाटतें, त्याच मनोवृत्तीमुळें मनुष्य पहिल्या प्रेमाची सर कुणालाही येणार नाहीं असें म्हणत असतो ! पण अनुभव पाहिले तर पहिलें प्रेम हें अनेकदां स्वप्नाळु अथवा क्षणभंगुर ठरल्याचीं उदाहरणें दिसतात."

माझ्या डोळ्यांपुढें एकामागून एक तीन मूर्ति उभ्या राहिल्या–मंदा, शोभा व नेत्रा ! प्रत्येकीवर मीं प्रेम केलें होतें. त्या त्या वेळीं आपल्या प्रेमाइतकें उत्कट प्रेम जगांत असणें शक्य नाहीं असेंही मला वाटलें होतें. पण...

मीं हातांतल्या कागदाकडे पाहिलें, प्रुफाचें शेवटचें पान मीं वाचलेल्या वाक्यापाशींच संपलें होतें याची फार चुटपुट लागली मला !

१९४०

## आका



" जांवई म्हणजे सवाई शनि ! शनीनें स्वतःच्या बापाला त्रास दिला; पण ह्या शनि बायकोच्याही बापाला छळायला मागेंपुढें पाहत नाहीं." तात्या चडफडत म्हणाले.

सुधा दारांत गोरामोरा चेहरा करून तात्यांचें भाषण ऐकत होती ! काय करणार बिचारी ? बाप आणि नवरा यांच्या कात्रींत हिंदु मुलीच्या आयुष्याच्या नेहमींच चिंधड्या होत असतात. हातांतील पत्राकडे तिरसटपणानें पाहत तात्या पुढें बोलूं लागले, " दिवे ओंवाळा या जांवयाच्या अकलेवरून ! म्हणे तीन हजार रुपये कर्ज झालें आहे ! काय बायकोला सोन्यानें मढविली तीन हजार रुपये कर्ज व्हायला ? मिशीला लावायला तूप नाहीं घरांत आणि म्हणे तूपपोळी वाढा पानांत ! बाजीरावाचा बेटाच कीं नाहीं ! तो बाजीराव जसा देशोधडीला लागला, तशी ही स्वारीही आतां लागणार !"

" पण असें आहे तरी काय पत्रांत, तात्या ?" सुनेनें सासूला विचारावें त्याप्रमाणें सुधेनें भीतभीत प्रश्न केला.

" आहे माझें फुटकें कपाळ ! आतां तुला गोमांतकी आंबे मनमुराद खायला मिळतील. तुझे हे पतिराज चालले ना गोव्यांत !"

" नोकरीबिकरी मिळाली वाटतें तिकडे ?" आशेचा एक किरण मनांत चमकून गेल्यामुळें किंचित् उल्हसित स्वरानें सुधेनें प्रश्न केला.

दा. क. ... आक्र

" सावकारांच्या हातावर पैसे नाहींत, निदान कुठें तरी द्यावी असा विचार केलेला दिसतो जांवईबुवांनीं. सुधे, कुठून ग तुला मी या संसाराच्या [illegible] बांधली ? विहिरींत लोटून दिली असती तर एकदांच पाण्यांत बुडाली असतीस; पण आतां रात्रंदिवस डोळ्यांतून वाहणाऱ्या पाण्यांत तुझा जीव गुदमरून जाणार. तुला खाइंत लोटली असती तर एकदांच अंगाला चटका बसून तुझी राखरांगोळी झाली असती; पण आतां दररोज अंगाची आग नि संसाराची राख होत असतांना तुला हूं कीं चूं देखील करतां येणार नाहीं."

तात्यांच्या या कळवळ्याच्या भाषणानें सुधा अगदीं गहिंवरून गेली. ती त्यांच्याजवळ जाऊन म्हणाली, "तात्या, असें काय वरें वेड्यासारखें बोलतां ? मागील जन्मीं मी हरताळका मनोभावानें पुजली नसेल म्हणून तिकडून असें वागणें चाललें आहे. एरवीं स्वभाव वाईट का आहे ? पण करायचें काय ? म्हणतात ना, ग्रहण पौर्णिमेलाच चंद्राला लागतें."

" मींच काय असें पूर्वजन्मीं पाप केलें होतें म्हणून मला असला जांवई आणि तसलाच भाऊ मिळाला आहे. पाहा. मिरजेला कसा खोऱ्यानें पैसा ओढतोय्. पण आम्हांला इकडे खोऱ्यानें माती खणून तीच पोटांत भरावी लागतेय् ! चांगला पाठीला पाठ लावून आलेला भाऊ ! पण वर्षाच्या शेंदोनशेंवर एक पै देईल तर शपथ ! नाहीं म्हणायला इथें गांवांत हजार दीड हजाराचें उत्पन्न करून ठेवलें आहे ! पण—जाऊं दे तें ! कोणी कोणाचा भाऊ नाहीं न् कोणीं कोणाचा जांवई नाहीं ! "

" पण मी तरी तुमची मुलगी आहें ना ?"

" काळाबरोबर पोटचीं पोरं देखील फिरतात. तुझा तरी काय नेम सांगावा ?" तात्यांच्या या उद्गारानें सुधेच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. त्यांच्या आजारांत आपण रात्रीचा दिवस केला असतांही त्यांना आपलें प्रेम दिसूं नये काय ? ते संध्याकाळीं फिरून आले म्हणजे दारांत ऊन पाणी ठेवणें, वृद्धाच्या चेहऱ्याप्रमाणें सुरकुतलेलें त्यांचें अंथरूण नाजुक हातानें बालकाच्या चेहऱ्याप्रमाणें निर्मळ व हंसरें करून ठेवणें, त्यांना झोंप येईपर्यंत त्यांचे पाय चेपणें, सकाळीं उठून अगदीं लांबून त्यांच्या गणपतीकरितां जास्वंदीचीं आणि शंकराकरितां तुळ्याचीं फुलें आणणें, त्यांच्या पूजेसाठीं गंध उगाळून ठेवणें, एक न् दोन—अनेक गोष्टी आपण काडीचीही कसूर न करितां करीत असतांना वडिलांच्या

तोंडून असे शब्द कां यावे ? सुधेचें हृदय भरून आलें. ती सद्गदित स्वरानें म्हणाली, "तात्या, मुलीच्या जातीला तोंड नसलें तरी मन असतें."

"सुधे, माणूस मोठें झालें कीं त्याचें मन मरतें. हा तुझा काका–मिरजेचा माझा भाऊ ! लहानपणीं त्याच्या पायाला कांटा लागला कीं माझ्या डोळ्यांतून पाणी निघे; पण आज मला सुळावर जायची पाळी आली तरी याला सुई टोंचल्यासारखी देखील वाटणार नाहीं. तसाच हा तुझा नवरा ! लग्नाच्या वेळीं काय गरीब दिसत होता ! गोगलगाय न् पोटांत पाय !"

"जाऊं दे तें बाबा ! ललाटीं आलें न् पवित्र झालें ! देव्हाऱ्यांतल्या देवाला दगड म्हणून कसें चालेल ? शिवाय माझें दुःख मी गिळतेंच आहें ना ?"

"पण आतां हा दुःखाचा डोंगर पुढें येऊन उभा राहिला आहे त्याची काय वाट ? तुझा नवरा जुगाराच्या पायीं हें तीन हजारांचें कर्ज करून गोव्यांत पळून गेलाय् ! हे तीन हजार द्यायचे कुठून ? माझ्याजवळ तीन हजार तांब्याचे पैसे सांपडतांना मारामार ! नाहीं पैसे दिले तर तुझ्या जन्माचा सत्यानाश होतो. बाळ सुधे, तुझ्यासारख्या गाईला या कसायाच्या पदरांत घालून—"

"राहूं दे तें बाबा ! कर्मभोग सीताद्रौपदींनादेखील चुकला नाहीं. मी जोंपर्यंत देवाला विसरलें नाहीं, तोंपर्यंत मला कशाची म्हटल्या कशाची भीति वाटत नाहीं." सुधेचे हे आत्मविश्वासाचे बोल ऐकून तिचे वडील देखील मनांतल्या मनांत चरकले. त्यांच्या मनांत या वेळीं काय विचार घोळत होते ते त्यांचे त्यांनाच माहीत ! पण साधें पान सळसळलें असतांनाही चोर कसा दचकून आजूबाजूला पाहूं लागतो, तसें त्यांचें झालें. देवाला न आवडणारा एक विचार एक राक्षसी विचार त्यांच्या मनाच्या तळघरांत, बिळांत दडून बसणाऱ्या कृष्णसर्पाप्रमाणें, कित्येक दिवस वावरत होता. तो विचार म्हणजे मिरजेला असलेल्या आपल्या आजारी भावाचा मृत्यु. आपल्या भावाला एकच मुलगा व तोही मातृहीन आणि सातआठ वर्षांचा असल्यामुळें आपला भाऊ याच वेळीं मेला तर किती बरें होईल, हा दुष्ट विचार या वेळीं त्यांच्या मनांत पुनः डोकें वर काढीत होता. जांवयाचें तीन हजारांचें कर्ज फेडून आपल्या मुलीला सुखी करतां येईल, ह्या कल्पनेच्या पोटींच त्याचा जन्म झाला आहे, अशी त्यांनीं आतां आपली समजूत करून घेतली.

ते पुढें कांहीं बोलणार तोंच सुधा म्हणाली, 'पाहूं दे मला तें पत्र.'

तात्यांनीं जांवईबोवांना निर्वाणीचा खलिता तिच्या हवालीं केला. सुधा पत्र घेऊन आंत जाणार तोंच पोस्टाचा शिपाई एक तार घेऊन दारांत आला. तात्यांनीं तार घेऊन फोडली आणि त्यांचा चेहरा एकदम पाहण्यासारखा झाला. भयाण गुहेंत चमकणाऱ्या श्वापदांच्या डोळ्याप्रमाणें त्यांच्या डोळ्यांत एक प्रकारचें भयानक तेज चमकलें. दुसऱ्याच क्षणीं क्रूर आनंदाची ही लाट ओसरून तिची जागा स्वाभाविक अशा शोकानें घेतली.

" काय झालें तात्या ? " सुधा घाबरून म्हणाली. आपल्या पतीनें वैतागून आत्महत्या तर केली नसेल ना, असा संशय तिच्या मनांत आला.

" तुझे काका एकदम वारले !" तात्यांनीं शोकपूर्ण चेहऱ्यानें पण विजयाची छटा असलेल्या स्वरानें उत्तर दिलें. त्यांच्या डोळ्यांपुढें आपल्या पाठीला पाठ लावून आलेलें भावाचें जळतें शरीर नव्हतें ! त्यानें मिळविलेली हिरवीगार मिळकत होती.

" काका वारले ! " सुधेनें विव्हळ स्वरानें विचारलें. तिच्या डोळ्यांपुढें " बाबा, बाबा " म्हणून ओरडणारा काकांचा मुलगा चंद्रकांत होता.

ॐ ॐ ॐ ॐ

तात्यांना मिरजेला जाऊन पांच सहा दिवस झाले होते. ते गेल्यानंतर सुधेनें पतीच्या पत्राचीं पारायणावर पारायणें केलीं. त्यांतील प्रत्येक शब्द म्हणजे तिच्या फुलासारख्या मनावर ठेवलेला रखरखीत निखाराच होता. पत्रांत तिच्याविषयीं मुळींच उल्लेख नव्हता. तिच्या मनांत येत होतें—एवढ्या लांबलचक पत्रांत बायकोविषयीं एक अवाक्षरदेखील लिहायला त्यांना फावलें नाहीं ना ? लग्न होऊन तीन वर्षे झालीं. या तीन वर्षांत आपण कुठेंही असलों तरी आपल्याला नवऱ्याचीच आठवण होते. जेवायच्या वेळीं त्यांचें जेवण झालें असेल का, चहाच्या वेळीं त्यांना मनासारखा चहा मिळत असेल का, तापाची सांथ कुठें तरी सुरू झालेली ऐकली म्हणजे त्यांना ताप आला असेल की काय, एक ना दोन, हजार शंकाकुशंकांनीं आपलें मन नेहमीं व्याकुळ होऊन जातें ! आणि त्यांना मात्र बायको जिवंत आहे का मेली आहे, याची चौकशी देखील करावीशी वाटत नाहीं.

नेहमींप्रमाणें मावशी पोतेरें घालून नंदादीपांतील वात मागें सारून अंथरुणावर जाऊन पडल्या व हां हां म्हणतां घोरूं लागल्या. पण सुधा मात्र या कुशीवरून

त्या कुशीवर एकसारखी होत होती. पाण्याबाहेर काढलेला मासा जसा तडफडतो, पंख कापलेला पक्षी जसा फडफडतो, त्याप्रमाणें सुधेच्या जीवाची स्थिति होत होती. मावशीचें घोरणें ऐकून तिला कसेंसेंच वाटलें.

ती मनांत म्हणत होती—आपल्यापेक्षां जगांतील उन्हाळे-पावसाळे हिनें अधिक पाहिलेले ! हिला गाढ झोंप येते आणि आपल्याला कां येऊं नये ? आपलें असें म्हणायला हिला कोणीदेखील जगांत नाहीं—चूल हीच मूल, आणि घरचें कामकाज हेच पतिराज ! हिच्याप्रमाणें आपल्यालाही समाधानानें कां राहतां येऊं नये ? पण पोटभर अन्न व अंगभर वस्त्र एवढ्यानें मनुष्याचें समाधान होतें का ? तें होत असतें तर मुलासाठीं नवस करणाऱ्या बायका जगांत कुठून दिसल्या असत्या ? हृदयाची तहान अन्नपाण्यानें भागत नाहीं, त्याला प्रेमच लागतें ! असें प्रेम आपल्याला मिळत नाहीं म्हणूनच तर आपल्याला झोंप येत नाहीं ! वनवासांत कांटे पायांत रुतले आहेत, चालूनचालून पायांचे तुकडे पडतात कीं काय असें वाटत आहे, अशा स्थितींत सीतामाईला जशी आनंदाची झोंप आली, तशी अशोकवनांत सोन्याची लंका सभोंवर पसरली असतांना कां आली नाहीं ? तिच्या प्रेमाची मूर्ति तिच्याजवळ नव्हती म्हणून.

प्रेम ! पुरुषांना प्रेम करतांच येत नाहीं का ? छेः तसें म्हणणें म्हणजे वृक्षवेलींना 'सीता कुठें आहे', 'माझी सीता कुठं आहे ?' म्हणून विचारणाऱ्या प्रभु रामचंद्राचा अपमान करण्यासारखें आहे. मग हें प्रेम आपल्याच वांट्याला कां येऊं नये ? तात्या आपले जन्मदाते वडील ! पण त्यांच्याजवळ अंतःकरण उघडें करून आपल्याला कां बोलवत नाहीं ! मागच्या वर्षी तिकडून मारणें झालें त्या वेळीं तात्यांनीं आपल्याला जवळ ओढावें, आपल्याला कुरवाळावें, असें आपल्याला फार फार वाटलें ! पण तात्यांनीं स्वारीला चार शिव्या हांसडल्या आणि ते आपल्या उद्योगाला निघून गेले. आपण रात्रभर रडलों, सारें उसें आंसवांनीं ओलेंचिंब केलें; पण मनाला जाळणारी आग थोडीदेखील विझली नाहीं. तात्यांचें आपल्यावर प्रेम आहे खरें ! पण तें आकाशांतला चद्र समुद्राच्या लाटेवर करतो तसलें आहे. तिचें हृदय कितीही उचंबळून आलें, चंद्राकडे बाहु पसरून धांवतां धांवतां खडकावर आपटून तिच्या कितीही ठिकऱ्या उडाल्या, तरी चंद्र आकाशांत जागच्या जागीं हंसतच राहणार. तो कांहीं खळकन् तुटून त्या फुटलेल्या लाटेला कवटाळणार नाहीं.

वडिलांचें प्रेम नाहीं तर नाहीं, पण स्वारीनें तरी आपल्यावर प्रेम कां करूं नये? अंतरपाट दूर होऊन स्वारी दृष्टीला पडण्याआधींच आपण त्यांच्यावर प्रेम करायला लागलों होतों. कुणा मैत्रिणीनें नवरा काळा आहे म्हणून थट्टा केली, तर कृष्ण देखील काळाच होता असें आपण उत्तर द्यावें. कोणी कांहीं म्हटलें तरी स्वारीला आपण सर्वगुणसंपन्न मानलें. तिकडून नुसतें आपल्याकडे पाहून हंसणें झालें तर आपल्याला स्वर्गसुख मिळाल्यासारखें होई. तिकडचा एक प्रेमाचा शब्द म्हणजे साऱ्या पृथ्वीचें राज्य वाटे आपल्याला! स्वारीच्या कपाळावर आंठी दिसली तर तिनेंसुद्धां आपलें हृदय दुभंगून जाई. स्वारीच्या चेहऱ्यावर खिन्नपणाची छाया दिसली, कीं सूर्याला ग्रहण लागल्यागत जग दिसूं लागे. तिकडच्या पायाला वहाण लागलेली पाहून आपल्या हृदयाला जखम झाल्याइतक्या वेदना होत! पण हें स्वारीच्या गांवींदेखील नव्हतें. पत्त्याच्या राणीच्यापुढें घरच्या राणीची, बाईच्या गाण्यापुढें पत्नीच्या गोड शब्दांची आणि जुगारांच्या फांशापुढें आपल्या प्रेमळ स्पर्शाची तिकडे किंमतच वाटली नाहीं. तीन हजार रुपयांची व्यवस्था कराल तरच मी तिकडे येईन, म्हणून मोठ्या दिमाखानें तात्यांना लिहितांना माझी आठवण म्हणून एक शब्द तरी त्यांनीं लिहायचा होता! पुरुषावर प्रेम करायचें म्हणजे पालथ्या घागरीवर पाणी ओतायचें! छे:! जेवायचें न् जगायचें असलें जिणें काय कामाचें? कावळीं–कुत्रीं नाहीं का अशींच जगत? काका वारले त्याच्यापेक्षां मीच मेलें असतें तर किती बरें झालें असतें?

काकांची आठवण होतांच पोरक्या झालेल्या चंद्रकांताची मूर्ति तिच्या डोळ्यांपुढें उभी राहिली. चंद्रकांत आतां किती तरी मोठा झाला असेल. दोन तीन वर्षांपूर्वी काका त्याला घेऊन आले होते तेव्हां गुलाम कसा एकसारखा दंगा करीत असे. “हिला सुधा नाहीं म्हणायचें, आक्का म्हणायचें” असें काकांनीं सांगितल्याबरोबर लबाडानें गाल फुगवून “आम्ही नाहीं जा आक्का म्हणणार” असें उत्तर दिलें होतें. तो तीन वर्षांपूर्वीचा काळ सुधेच्या डोळ्यांपुढें उभा राहिला. धांवतां धांवतां पडायला झालें म्हणजे इकडे तिकडे कोणी नाहीं असें पाहून त्यानें हंसऱ्या चेहऱ्यानें उठावें; पण आपण त्याला पडतांना पाहिलें म्हणजे त्यानें एकदम चेहरा रडवा करावा! जेवतांना काकांजवळून उठून एकदम आपल्या पानापाशीं येऊन त्यानें बसावें आणि “हें पाहिजे,

तें पाहिजे " म्हणून हट्टानें सांगून आपल्याकडून भरवून घ्यावें! आपण हळदी-कुंकवाला निघालों म्हणजे " मी येणार तुझ्याबरोबर " म्हणून रडत बसावें आणि " बायकांत पुरुष लांडोत्रा, भाजून खातो कोंबडा " असें म्हटल्यावर " कोंबडा खाल्ला तर खाल्ला; तुझें काय जातें त्यांत?" असें म्हणावें. एक ना दोन, वात्सल्याच्या रसानें रंगलेलीं अनेक जुनीं मधुर दृश्यें सुधेला दिसूं लागलीं. शेवटच्या दृश्यानें तर तिचें हृदय आनंदानें भरून आलें. काका कुठें गांवाला जायचे होते. चंद्रकांत बरोबर जाण्याचा हट्ट धरून बसला. कांहीं केल्या तो ऐकेना. शेवटीं आपले सगळे दागिने घेऊन आपल्याजवळ राहायचें कबूल केलें. त्या दिवशीं आपल्याला किती आनंद झाला. तो मांडीवर डोकें ठेऊन निजला आणि आपण त्याला एक कहाणी सांगूं लागलों. एक होता राजा न् एक होती राणी, असें आपण सांगतांच ' राणी तुझ्यासारखीच होती ना?' असें गुलामानें एकदम विचारलें. गोष्ट पुरी व्हायच्या आधींच त्याला झोंप लागली होती. मग त्याला हळूच उचलून आपण अंथरुणावर निजविलें. त्या वेळच्या त्या हंसऱ्या चेहऱ्याकडे पाहून त्याचा मुका घेण्याचा मोह कांहीं आपल्याला आवरला नाहीं. तो जागा होईल म्हणून आपण हळूच एक मुका घेतला; पण एकानें समाधान न होतां उलट भूक वाढली. किती मुके घेतले तरी पुरेच होईनात. ' अति तिथें माती ' असें लोक म्हणतात! पण प्रत्येक मुका आपल्याला अधिकाधिकच गोड लागत होता. शेवटीं हें कधीं संपायचें नाहीं म्हणून त्याच्या ओंठाशीं ओंठ लावून आपण त्याला पोटाशीं धरून निजलों. चंद्रकांताच्या त्या मुक्यांच्या स्मरणानें सुधेचे ओंठ पुन्हां स्फुरण पावूं लागले. वडिलांच्या आठवणींनीं व पतीच्या स्मृतिचित्रांनीं तिला ज्या आनंदाचा लवलेशदेखील लाभला नव्हता, तो आतां तिला लाभला. आपण मेलों असतों तर बरें झालें असतें, असें थोड्या वेळापूर्वी तिला वाटलें होतें. आतां तिला जगावेंसें वाटूं लागलें. दोनतीन वर्षांपूर्वीची ती रात्र-चंद्रकांताचा तो मुका-त्या रात्रीच्या शतांशानें कां होईना, पुढें सुख मिळणार असेल तर त्याकरितां आपण वाटेल तीं संकटें सोसूं असें तिचें आशावादी मन म्हणूं लागलें. उशाशेजारच्या खिडकींतून सुधेनें बाहेर पाहिलें-वद्य षष्ठीचा चंद्र नुकताच उगवला होता. आतांपर्यंत अंधारांत असणारी चराचर सृष्टि त्याच्या नुसत्या दर्शनानें हंसूं लागली होती. आपली हृदयसृष्टिही कधीं तरी अशीच

हंसेल का, हा विचार तिच्या मनांत येतो न येतो तोंच ‘ आक्का ’ अशी वत्सल हांक तिच्या कानांवर पडली. दोन तीन वर्षांपूर्वीच्या आपल्या हृदयांतील चंद्रकांताच्या मूर्तीनें तर ही हांक मारली नाहीं ना, असें तिला वाटूं लागलें. पुन्हां ‘ आक्का ’ ही हांक ऐकूं आली. त्या दोन अक्षरी शब्दानें सुधेचे पंचप्राण आनंदित झाले. ती कान देऊन ऐकूं लागली—‘आक्का’ ‘आक्का.’

सुधेनें दार उघडलें आणि बाहेर पाहिलें. हांक मारणारा मुलगा चंद्रकांत नव्हे असें तिला क्षणभर वाटलें. पूर्वीपेक्षां तो आतां किती तरी मोठा झाला होता. पूर्वीची कमळाची नाजुक कळी आतां अर्धविकसित झाली होती. सुधा दारांत घुटमळत उभी असलेली पाहून चंद्रकांतानें पुन्हां ‘ आक्का ’ अशी लडिवाळपणानें हांक मारली. सुधेनें त्याच्याकडे पाहिलें तों त्याचे डोळे भरून आले होते. आतां तिच्यानें राहवेना. वांसराचें हंबरणें ऐकून गाय जशी दावें तोडून त्याच्याकडे धांवत जाते, त्याप्रमाणें सुतकाचा विचार दूर झुगारून तिने त्याला जवळ ओढलें. चंद्रकांतानें तिच्या कुशींत डोकें खुपसलें व तोही स्फुंदस्फुंदून रडूं लागला. सुधाही रडूं लागली. प्रेमळ आंसवांच्या संगमांतच हृदयाची आग विझत असते.

चंद्रकांत किती तरी वेळ आक्काच्या कुशींत तसाच डोकें खुपसून राहिला असता. पण त्याचा हा निर्मळ व निर्भय आनंद फार वेळ टिकला नाहीं. तात्या तावातावानेंच अंगणाच्या पायऱ्या चढून आले व स्वतःशींच म्हणाले, ‘ गेला तरी कुठें हा कार्टा–काय आहे रत्न पण रत्न ! ’ थोडेंसें पुढें येतांच भ्यालेल्या सशाप्रमाणें चंद्रकांत सुधेला बिलगून दारांतच बसलेला त्यांना दिसला. ते तात्काळ ओरडले, ‘ पुढें आला ना कारटा हा ?’ ‘कारटा’ हा शब्द ऐकतांच सुधेच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. ती तापट स्वरानें म्हणाली, ‘तात्या, माणसाच्या जिभेला कांहीं हाड असलेलें बरें. चांगलें सोन्यासारखें नांव असतांना—’

‘ लागलीस वाटतें इतक्यांतच भावाचा कैवार घ्यायला ? पण भाऊ काय दिवटा आहे. अगदीं ओंवाळून टाकावा जगावरून ! ’ सुधेला दारांत पाऊल टाकल्याबरोबर तात्यांनीं सुरू केलेल्या या भडिमाराचा अर्थच कळेना. उन्हानें करपलेल्या वेलीच्या मुळांत पाणी नेऊन घालायचें कीं धगधगीत निखारे ? आईबापावेगळया पोराला थोपटायचें कीं धोपटायचें ? तिनें चंद्रकांताच्या

पाठीवरून प्रेमानें हात फिरविला. तात्या पुन: संतापानें म्हणाले, ' शिवलीस ना त्याला, कार्टे ? मोठी निघाली प्रेम दाखवायला–चल, कर त्याला दूर. ' सुधेचें मन द्विधा होऊन तिनें किंचित् अंग हालविलें. चंद्रकांताला वाटलें कीं आक्का आतां आपल्याला सोडून जाते. दुष्काळांत सांपडलेल्या माणसाच्या करुण मुद्रेनें त्यानें आक्काकडे पाहिलें. त्याच्या आक्कानें तात्यांना मुळींच उत्तर न देतां त्याला पोटाशीं धरलें. तात्यांचा संताप आतां अनावर झाला. ते खेंकसून म्हणाले, " उद्यां नवऱ्यानें टाकून दिली म्हणजे भाऊ नाहीं पोसणार तुला, बापच पोशील. काय पण आली आहे मायेची बहीण ! खालीं तळापाशीं गाडी उभी केली नि सामान उतरलें. तेवढ्यांत या स्वारीनें केला पोबारा. तरी बरें ! घर अचूक सांपडलें ! एका रात्रीकरितां कांहीं तुझीं अंथरुणें पांघरुणें शिवाशिवींत द्यायचीं नाहींत. भाऊ पाहिजे ना तुला ? बैस थंडींत त्याला पोटाशीं घेऊन ! "

❦ ❦ ❦ ❦

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चंद्रकांताला बरोबर घेऊन सुधा बकुळीखालचीं फुलें वेंचीत होती. हातांतील बकुळाचें फूल आणि समोर उभा असलेला चंद्रकांत यांच्याकडे एकदम दृष्टि जातांच तिच्या मनांत नानातऱ्हेचे तरंग उसळूं लागले. ' बकुळाचें फूल जितकें लहान तितकेंच सुगंधी. लहान मूल देखील जितकें लहान तितकेंच पवित्र असत नाहीं का ? वेंचलेलें फूल देवाच्या मूर्तीवर जाऊन बसतें; पण न वेंचलेलें ? न वेंचलेलें पायदळीं तुडविलें जातें ! सुंदर फुलाविषयीं केवढी ही अनास्था ! फुलें राहोत मेलीं, पण सोन्यासारख्या मुलांविषयीं जगांत केवढी बेपर्वाई असते ! रात्रीं तात्या असें एकदम मला टाकून कां बरें बोलले ? मी चंद्रकांताला जवळ घेतला तर त्यांत काय बिघडलें ? एकमेकांनीं एकमेकांवर माया करावी म्हणूनच ना माणसांना देवानें जन्म दिला आहे ? '

चंद्रकांतानें एक प्रश्न करून तिचें विचारयंत्र एकदम थांबवलें. " आक्का, हें खालीं पडलेलें फूल पुन्हां झाडावर जाईल का ग ? "

" नाहीं, बाळ."

" मग त्या झाडावरल्या फुलाची नि या खालच्या फुलाची गांठ केव्हां ग पडेल ? तें बघ झाडावरलें फूल कसें हळूच डोळे मिचकावून त्याला ये ये म्हणतें आहे. कधीं ग गांठ पडेल आक्का यांची ? "

" कधीं तें देव जागे ! "

" देवाला सगळें सगळें ठाऊक असतें ना ग ? "

" हो. "

" मग बाबा कुठें आहेत हें त्याला कसें ग माहीत नाहीं ? "

डोळ्यांत उभे राहिलेले अश्रु आवरीत सुधेनें म्हटलें, " कुणी सांगितलें तुला त्याला माहीत नाहीं म्हणून ? "

" त्यानेंच. बाबा गेले त्या दिवशीं रात्रीं मी दचकून जागा झालों. दुपारचें सगळें आठवलें न् रडें यायला लागलें. मग हळूच देवघरांत गेलों, देवाच्यापुढें नाक घांसलें आणि त्याला विचारलें, ' माझे बाबा कुठें आहेत ? ' पण देव माझ्याशीं बोलला देखील नाहीं ग ! त्याला माहीतच नसावें बाबा कुठें आहेत ते."

सुधेनें चंद्रकांताला जवळ ओढलें व आपल्या पदरानें त्याचे भरून आलेले डोळे पुसले. पितृहीन झालेल्या त्या पोराचें सांत्वन कसें करावें हेंच तिला कळेना. चंद्र पुढें बोलूं लागला, "आक्का, बाबा पुन्हां कद्धीं कद्धीं येणार नाहींत का ग ? एकदां देखील नाहीं ? बाबांच्यासारखा मनुष्य दिसला म्हणजे कसेंसेंच होतें ग आक्का." सुधेनें त्याला घट्ट-अगदीं घट्ट-पोटाशीं धरलें. वेदांताच्या शंभर ग्रंथांनीं जें काम झालें नसतें, तें या एका कृतीनें झालें. आक्का रडत असलेली पाहून चंद्र म्हणाला, "तूं नाहीं ना मला बाबांच्यासारखी सोडून जाणार ? "

" नाहीं बरें, बाळ."

" अगदीं कद्धीं कद्धीं ? "

" कद्धीं नाहीं. " सुधेनें तोंडानें नाहीं म्हटलें; पण उद्यां नवरा आपल्याला बोलवायला आला कीं चंद्राला इथल्या इथें टाकून आपल्याला गेलें पाहिजे हें ती जाणून होती.

" मी देखील तुला सोडून जाणार नाहीं हो. "

" मोठा झालास तरी ? "

" अगदीं कित्ती कित्ती मोठा झालों तरी. "

" मोठा झाल्यावर तुला शिकायला नको का लांब जायला ! "

" आम्हांला तें शिकणेंच नको. तूं बरोबर नसलीस तर मी खेळायलादेखील जाणार नाहीं; मग तर झालें ! "

चंद्राच्या या भाषणाचें सुधेला हंसूं आल्यावांचून राहिलें नाहीं. गवताच्या काडीनें समुद्राच्या किनाऱ्यावर बसून 'मी अमक्या दिशेनें जाईन, मी तमक्या काडीबरोबर जाईन,' असे बेत करण्यापैकींच त्याचें मनोराज्य होतें. प्रत्यक्ष लाटांच्या चक्रांत सांपडल्यावर लाट नेईल तिकडे काडीला जावें लागतें. आक्का हंसत असलेली पाहून तिचा आपल्या बोलण्यावर भरंवसा दिसत नाहीं असें चंद्रकान्ताला वाटलें. तो म्हणाला, "मी तुला सोडून जाईन असें तुला वाटतें होय ! काल रात्रीं गाडी तळापाशीं थांबतांच मी पुढें धांवत कां आलों हें माहित आहे का ?"

" रस्ता सांपडला कीं [illegible] पाहायला ?"

" छट् ! तुला पा[illegible] मागचें अगदीं पक्कें ध्यानांत आहे बघ माझ्या. इथें मी आक्का म्हणत नाहीं म्हटलें, पण मिरजेला घरीं गेल्यावर सारखा 'आक्का' 'आक्का' म्हणूं लागलों–स्वप्नांत बघावें तों तूं मला जवळ घेऊन कहाणी सांगते आहेस न् जागें झाल्यावर पाहावें तों तूं कुठेंच नाहींस. मग मीं काय केलें, आहे माहित ? विनयत्तेत होतों तेव्हां मी ! एक मोठी वही घेतली बाबांकडून मागून, न् त्यांत "आक्का," "आक्का," दररोज लिहूं लागलों. ती वही आणली आहे मीं माझ्याबरोबर, आणि तिच्यांतच तो कागद ठेवला आहे—"

" कसला कागद ?"

" बाबांचा कागद आहे तो ! ते कुणाला तरी बोलावून–बाबांना आणखी खूप बोलायचें होतें; पण बोलतांच येईना. तात्यांना कागद मुळींच–असें कायसें ते म्हणाले ! पण आक्का, मीं तो तुला दाखवला म्हणून कांहीं बाबा माझ्यावर रागावणार नाहींत."

कागदाचें कोडें सुधेला मुळींच उलगडेना. ती आणखी कांहीं विचारणार होती. पण तितक्यांत तात्या तेथें आल्यामुळें ती गप्प राहिली.

" चंद्रा, तूं जरा विहिरीकडे खेळ जा," तात्यांनीं हुकूम सोडला.

" विहिरीकडे नको कांहीं ! पायबिय निसरेल एखाद वेळीं. जा बाळ, तूं झोंपाळ्यावर झोंके घेत बैस जा. मात्र झोंका मोठा घेऊं नको हं."

आक्काची आज्ञा शिरसामान्य असल्यामुळें चंद्रकांत तेथून निघून गेला. तो दूर गेलासा पाहून तात्या म्हणाले,

" कुणाचा तरी लळा लागायलाच पाहिजे होता त्याला. तुझा लागला हें बरें

झालें. आईबाप नसलेलें मूल म्हणजे कण्हेरीचें फूल. ना रूप, ना गंध. आक्काला भाऊ मिळाला आणि भावाला आक्का मिळाली. ठीक झालें." तात्यांच्या या प्रस्तावनेचा अर्थ सुधेला कांहीं केल्या उमगेना. ती त्यांच्या तोंडाकडे टकमक पाहतच राहिली. "तुला समजलें नाहीं, पोरी. भाजींत अळण घालावें लागतें कीं नाहीं? तसें हें प्रेम आहे. तुझी माया आहेच त्या पोरावर! तेव्हां बापानें मरतांना एखादा कागदविगद त्याच्याकडे देऊन ठेवला आहे कीं काय हें जरा नाजुकपणानें काढ त्याच्याकडून."

"कशाला हवा तो कागद?" सुधेनें साशंक स्वरानें विचारलें.

"मेल्यानंतर धार्मिक दृष्टीनें जसे दिवस करावे लागतात, तशी व्यवहाराच्या दृष्टीनें जिंदगीची व्यवस्था करणेंही जरूर असतें. शिवाय तुला सांगायला हरकत नाहीं. तुझेंच हित आहे त्यांत. मृत्युपत्र मुळींच नसलें तर अर्धी जिंदगी आपल्याकडे येणार. मग कांहीं जांवईबुवांचे तीन हजार रुपये देणें जड जाणार नाहीं आपल्याला. मिरजेला मीं खूब चौकशी केली.पूर्वी एकदां मृत्युपत्र केलें होतें असें कित्येकांनीं सांगितलें म्हणून सारें घर धुंडाळलें; पण त्याचा कुठेंच पत्ता लागला नाहीं. कदाचित् दुसरें करायचें म्हणून पहिलें आयत्या वेळीं फाडूनही टाकलें असेल. सरकारांत कांहीं नोंदलेलें नाहीं एवढें खास! घरांतील महत्त्वाचे कागदपत्र मीं आणलेच आहेत! पण मृत्युपत्र एखाद्या स्नेह्याबिह्याकडे देऊन टाकलें असेल तर मागाहून पंचाईत नको. या पोरापाशीं तर नाहींच नाहीं म्हणा! त्याचीं पुस्तकें पाहिलीं होतीं मीं. 'बालभारतन्' 'बालरामायण'! याच्या बापाचें मृत्युपत्र असल्या रामायणांत कुठून सांपडणार? तेव्हां हें काम मनावर घे! म्हणजे आठ दिवसांत पतिराजांची गांठ पडते कीं नाहीं बघ. अरे, हंसली रे हंसली!"

खरोखर सुधा त्या वेळीं हंसत नव्हती! पण मृत्युपत्र खास मिळणार नाहीं, सुखासुखी आपण अर्ध्या जिंदगीचे मालक होणार, या कल्पनेनें तात्यांचें डोकें इतकें फिरून गेलें होतें कीं सुधेच्या चेहऱ्यावरील तिरस्काराची छाया त्यांना दिसलीच नाहीं. ती कांहीं बोलत नाहीं असें पाहून तात्या तिला मृत्युपत्र न सांपडल्याचे फायदे रसाळपणानें वर्णन करून सांगण्याच्या विचारांत होते. इतक्यांत एकदम "आक्का" अशी भीतियुक्त हांक ऐकूं आली. सुधेनें वळून पाहिलें, तों चंद्रकांत तिच्याकडे धांवत येत होता. "आक्का, आक्का, केवढा

ग साप आला आहे" तो अडखळत म्हणाला. त्यानें येऊन एकदम सुधेला मिठीच मारली. चाहुलीनें दचकणारी खार झाडावर चढून मग जशी निर्भय मुद्रेनें पाहूं लागते, त्याप्रमाणें त्यानें आक्काकडे पाहिलें. सुधेला अगदीं राहवेना. तिनें चटकन् वांकून त्याचा मुका घेतला. तीन वर्षोपूर्वीच्या रात्रीची तिला आठवण झाली.

चंद्रानें उगीचच हांक मारली "आक्का !" त्याला कांहींच सांगायचें नव्हतें.

ॐ ॐ ॐ ॐ

तात्यांची मृत्युपत्राची गोष्ट सुधा विसरली नाहीं. तात्या अर्ध्या जिंदगीचे मालक झाले कीं तीन हजार रुपये हां हां म्हणतां मिळतील व परागंदा झालेला नवरा परत येईल ही कल्पना तिच्या डोळ्यांपुढें हंसत नाचूं लागली. लग्नाचा दिवस तिला आठवला. गौरीहरापाशीं बसून तांदळाच्या मुठी वाहत असतांना आपल्या डोळ्यांपुढें अर्धनारीनटेश्वराचें चित्र कसें उभें राहिलें, त्या चित्रांतील पार्वतीनें सुधेचें रूप कसें धारण केलें, आपल्या शंकराच्या अंगाभोंवतीं साप नाहींत हें पाहून आपल्याला कसा अभिमान वाटला, हें तिला आठवलें. बोहल्यावर उभें राहिल्यावर तर आपण साऱ्या जगाला विसरून गेलों. अंतरपाटाआड साऱ्या विश्वांतील सौंदर्य सांठलेलें आहे असें वाटून आपली तंद्री लागली ! तीं सारीं मनोराज्यें आज कुठें आहेत ? झाडाला आलेला मोहर अकालीं आलेल्या आभाळानें जळून जावा, त्याप्रमाणें तिच्या विवाहाच्या वेळच्या मनोरथांची आज स्थिति झाली होती. चंद्रकांताच्या हक्काची निम्मी मिळकत तात्यांनीं घ्यायची, त्यांतून तीन हजार रुपये घेऊन आपल्या नवऱ्याचें कर्ज फेडायचें आणि हें कर्ज फिटल्यानंतर आपला संसार सुखाचा व्हायचा. एकाच्या होळीवर दुसऱ्यानें पोळी भाजून घेणें माणुसकीला शोभतें का ? पण आपला संसार ! तीन हजार रुपये नाहीं तर नवरा कधींही परत येणार नाहीं. आणि नवरा नाहीं म्हणजे......

पुढील कल्पनाच सुधेला सहन होईना. आपण मुलाला खेळवीत असून तिकडून हळूच मागून येऊन आपले डोळे झांकणें होत आहे, आपण मुलाच्या एका गालाचा मुका घेत असतांना स्वारी दुसऱ्या गालाचा मुका घेत आहे व तो गुलाम डोकें खालींवर करीत आहे, इत्यादि कल्पनाचित्रें तिनें अनेक वेळां स्वप्नसृष्टींत पाहिलीं होतीं. अवघ्या तीन हजार रुपयांनीं या स्वप्नसृष्टीची

सत्यसृष्टि होणार असतांना खऱ्याखोट्याचा सूक्ष्म विचार करीत बसण्यांत हंशील काय ! चंद्रकांताचे हे तीन हजार रुपये उद्यां आपण फेडून देखील टाकूं.

सुधा अशी विचारमग्न असतांना चंद्रकांत 'आक्का, आक्का' करीत धांवतच आला. त्याचें तोंड अगदीं गोरेंमोरें झालें होतें. सुधा त्याला जवळ ओढून म्हणाली, " काय झालें, बाळ ? "

" आक्का, तूं मला सोडून जाणार होय ? "

" कुणी सांगितलें तुला ?"

" तात्या म्हणाले. रस्त्यानें किनई एक मुलगी रडत चालली होती. तिच्याबरोबर एक माणूस होता न् त्याच्या हातांत पांच नारळ होते. मीं तात्यांना विचारलें, 'तात्या, ही मुलगी शाळेंत जावें लागतें म्हणून रडते आहे काय ?' तात्या म्हणाले, 'शाळेंत नाहीं, सासरीं जाते आहे. तुझ्या आक्कालादेखील उद्यां सासरीं जावें लागेल.' खरें का आक्का ? मग मलाही नेशील ना तुझ्या सासरीं ?"

" नेईन बरें ! पण तूं ती 'आक्का' 'आक्का' असें लिहिलेली वही मला दाखवशील तर. "

चंद्रकांत लगेच तिला आपल्या ट्रंकेकडे घेऊन गेला. त्यानें ती लपवून ठेवलेली वही काढून तिच्या हातांत दिली. " आंत बाबांनीं दिलेला कागद आहे हं ! " तो हळूच म्हणाला ! सुधेनें वही उघडली–" आका " अशीं कित्त्यासारखीं मोठीं अक्षरें तिनें पहिल्या पानावर पाहिलीं. नेत्रपरीक्षेकरितां लावलेलीं अक्षरें जशीं क्रमाक्रमानें लहान होत जातात, त्याप्रमाणें त्या वहींतील " आका " ह्या शब्दानेंही पुढें पुढें भव्य देह टाकून सामान्य शरीर धारण केलें होतें. शुद्ध बाल्यांतील लेखनांत " आका " हा जो अशुद्ध शब्द दिसत होता, तो पुढें "आक्का" असा झाला होता. पुढची सारी वही " आक्का"नें भरून गेली होती. सुधेनें वात्सल्यानें चंद्रकांताकडे पाहिलें–"माझें सारें जगच आक्कानें भरून गेलें आहे; मग वहीची काय कथा ? " असेंच जणूं काय त्याची दृष्टि सांगत होती.

" बाळ, माझें लुगडें वाळलें का बघून ये जा." सुधेनें चंद्रकांताला सांगितलें. त्याची पाठ फिरतांच तिनें तो कागद वहींतून काढला व धडधडणाऱ्या अंतःकरणानें वाचला. तें चंद्राच्या वडिलांचें केव्हां तरी केलेलें मृत्युपत्र होतें. त्यांत आपली सर्व मिळकत स्वकष्टार्जित आहे असें स्पष्ट लिहिलें होतें.

मुलगा भावाच्या घरीं राहिला तरी मिळकतीची व्यवस्था सरकारनें पाहावी, मिळकतीवर कोणत्याही कारणासाठीं कर्ज काढूं नये, असेंही त्यांत लिहिलें होतें. या कागदानें तात्यांच्या मनोरथाचा पुरा चक्काचूर होणार होता. सुधेपुढें स्वत:चें भविष्य उभें राहिलें. मृत्युपत्राप्रमाणें सर्व व्यवस्था झाल्यास जन्मभर आपणाला नवऱ्यापासून दूर राहावें लागेल. हातांतील कागद फाडून टाकला तर कसें होईल हा विचार अर्धवट तिच्या मनांत डोकावतो न डोकावतो तोंच तिनें मनोनिग्रहानें तो बाजूला सारला. "पापाच्या तूपपोळीपेक्षां सचोटीची मीठभाकरी बरी" हा विचार तिच्या मनांत प्रभावी झाला! पण लगेच पतीवांचून या जगांत आपल्या जिव्हाळयाचें कोणी नाहीं, ही कल्पना डोकें वर काढूं लागली. ती तिच्या मनांत उत्पन्न होते न होते तोंच चंद्राची हांक तिला ऐकूं आली, "आक्का!"

ॐ ॐ ॐ ॐ

मृत्युपत्राचा कागद चंद्राला सांगून सुधेनें आपल्याकडेच ठेवला. तो तात्यांना दाखवला तर ते रागानें फाडून टाकतील अशी तिला भीति वाटूं लागली. तात्यांना मात्र चंद्राला मृत्युपत्राविषयीं कांहीं माहिती नाहीं असें तिनें सांगितलें. या बातमीनें सख्ख्या भावाच्या सुतकांतदेखील तात्यांना पुत्रजन्माचा आनंद झाला. कसलेंही मृत्युपत्र नसल्यामुळें आपला मार्ग अगदीं निष्कंटक झाला असें त्यांना वाटलें. आल्यापासून दोन दिवस त्यांनीं चंद्राला थोडें तरी गोंजारलें होतें; पण आतां ते त्याला हिडिसफिडिस करूं लागले. प्रेमावर जगणारें चंद्राचें बालमन या परकेपणामुळें व्याकुळ होऊं लागलें. एका आक्काशिवाय त्याच्या भोंवतालचें सर्व जग त्याला परकें होतें. घरदार परकें, माणसें परकीं, त्यांचीं भाषणें तर अगदींच परकीं! पायांत बेडी नसतांना त्याला जागचें हालवेना! तोंडाला कुलुप घातलें नसतांही त्याला बोलवेना! तो आक्काला पळभरही विसंबेना. दहाव्या दिवशीं स्मशानांत जायच्या वेळीं देखील "आक्का बरोबर पाहिजे" म्हणून तो हट्ट धरून बसला. तात्यांनीं दरडावलें, सुधेनें समजावलें, पण तो स्मशानांत आक्कावांचून जायला तयार होईना. शेवटीं चंद्राला रडत रडत तात्यांबरोबर एकटेंच जावें लागलें. दुपारीं एक वाजतां एकटे तात्याच घरीं परत आले. पायरी चढतांच त्यांनीं तणतणायला सुरुवात केली "जिवंत असतांना छळलें तें छळलें—कधीं मला दोन घांस मिळतात कीं नाहीं तेंही पाहिलें नाहीं! पण मेल्यावरदेखील हीं माणसें पिच्छा सोडीत नाहींत."

" झालें काय असें तात्या ? न् चंद्रा कुठें आहे ? "

" त्याला ठेवला आहे बापाच्या पिंडापाशीं. सगळें सांगून झालें ! तुझ्या मुलाचें पोटच्या पोराप्रमाणें पालन करीन म्हणून आणभाकदेखील दिली ! पण कावळा कांहीं पिंडाला शिवला नाहीं. आमच्या पोटांत कावळे ओरडूं लागले, म्हणून ठेवलें त्या पोरट्याला उपाध्याबरोबर न् आलों निघून झालें."

" पण चंद्राच्या पोटांत कांहींच नाहीं. उन्हानें न् उपासानें त्याचें पित्त अगदीं तापून जाईल. "

" तुझें वागणें बघून माझेंच पित्त आधीं खवळून गेलें आहे. घोड्याएवढ्या वाढलेल्या या कारट्याचे मुके काय घेतेस ? त्याला एवढें कांहीं दुखलें खुपलें कीं डोळ्यांतून पाणी काय काढतेस ? तुझें तुला म्हणून शोभतें." सुधा मुकाट्यानें आंत गेली आणि दुधानें भरलेला चंबू केळीच्या लहानशा पानानें झांकून घेऊन घराबाहेर पडली. तात्या स्तंभित झाले. "कुठें चाललीस हें घेऊन, कारटे ?" सुधेनें मागें वळूनदेखील पाहिलें नाहीं. त्यांचा 'कारटे' हा शब्द तिला ऐकूंच आला नाहीं. स्मशानांतील चंद्रकांताची 'आक्का' ही मूक हांक जणूं कांहीं तिला ऐकूं येत होती.

ॐ ॐ ॐ ॐ

कावळा पिंडाला शिवला नाहीं ही गोष्ट सुधेलाही अनिष्टच वाटत होती. काकांचा कांहीं तरी हेतु राहून गेला असावा अशी तिनें आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली. आपल्या मुलाचा प्रतिपाळ व्हावा याखेरीज त्यांचा दुसरा कोणता हेतु असणार ? मग तात्यांनीं सांगितलें असतांनाही कावळा कां बरें शिवूं नये ? तात्यांवर काकांचा विश्वास नाहीं काय ? हो, असेंच असेल. त्याशिवाय का मृत्युपत्र तात्यांना दाखवूं नये म्हणून त्यांनीं चंद्राला बजावलें असेल ?

मग काकांची इच्छा तृप्त कशी करायची ? आपलें मन काकांना कळत असेलच. आपणच चंद्राचा प्रतिपाळ करण्याचें कबूल केलें तर कावळा पिंडाला खास शिवेल ! हा विचार मनांत येतांच तिनें आकाशाकडे डोळे लावले व ईश्वराला स्मरून कुडींत प्राण असेपर्यंत चंद्राचा प्रतिपाळ करण्याची मूकप्रतिज्ञा केली. ती थोडीशी पुढें जाते तोंच घरीं परत यायला निघालेला चंद्रा तिला दिसला. कावळा नुकताच पिंडाला शिवला होता. घामानें डबडबलेल्या व तांबड्या लाल झालेल्या चंद्राच्या तोंडची 'आक्का' ही हांक ऐकून सुधेला गहिंवर आला. आपली प्रतिज्ञा काकांच्या आत्म्यानें मान्य केली असेंच तिला वाटलें.

दिवस करण्याकरितां दोन तीन दिवस उन्हातान्हांतून जाणें, तहान लागली म्हणून वेळींअवेळीं पाणी पिणें वगैरे गोष्टी चंद्राला बाधल्या. दुसऱ्या कीं तिसऱ्याच दिवशीं त्याला फणफणून ताप भरला. सुधा चंद्राची शुश्रूषा करूं लागली. त्याच्या तापलेल्या मस्तकाला तिच्या हाताचा स्पर्श कोलनवॉटरच्या घडीसारखा वाटे. तो एकसारखा पाणी मागूं लागला म्हणजे सुधा मधून मधून त्याचा मुका घेई व तेवढ्यावर त्याचा 'पाणी,' 'पाणी' हा आक्रोश थोडा वेळ तरी थांबे. तापामुळें त्याला अधिक बोलवत नव्हतें, तरी "आक्का" ही त्याची जपमाळ कांहीं सुटली नव्हती. ताप येऊन दोन दिवस झाले होते. सुधा चंद्राचें समाधान करण्यासाठीं त्याचा मुका घ्यायला थोडीशी ओणवली होती. कोणाचेंसें पाऊल वाजलें म्हणून एकदम चपापून तिनें वर पाहिलें. माजघरांतील त्या अंधुक उजेडांत तिनें पाहिलें, तों पतिराजांची स्वारी समोर उभी. चंद्राच्या वडिलांचें भूत पाहून तिला जितकी भीति वाटली नसती, तितकी रंगरावांना पाहून वाटली. चटकन् तिच्या मनांत काय विचार आला कुणाला माहित. ती आंतल्या खोलींत गेली व चंदूचा तो सुरक्षित ठेवलेला कागद घेऊन तिनें आपल्या पदरांत घट्ट गुंडाळला. तिच्या पाठोपाठ रंगराव खोलींत येऊन दाखल झालेच होते. त्यांनीं खोलीचें दार लोटलें व दाराला पाठ लावून ते तिरप्या दृष्टीनें सुधेकडे पाहूं लागले.

" बायका हुषार म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. मी घाईनें परत जाणार हें ओळखूनच तूं खोलींत आलीस ना ?" सुधा कांहींच बोलली नाहीं. "धरा बुवा अबोला! तोंडापेक्षां हाताचें प्रेमच आपल्याला जास्ती आवडतें. काय, राणी-सरकारांचा काय हुकुम आहे ? "

" तोंडापुरती राणी न् पाठ फिरली कीं नाहीं कोणी ! पत्रांत चकार शब्द तरी लिहिला होता का माझ्याविषयीं ? "

" हो ! हो हो ! त्याचा घुस्सा आहे वाटतें ? आपलें काय गेलें दररोज पत्र लिहायला ? पण महिन्याला तीस निम्मे पंधरा आणे लागतील. ते मात्र तुमच्याकडून मिळाले पाहिजेत; शाईचा खर्च आम्ही आपल्या पदरचा करूं ! मग तर झालें ? "

सुधेचा राग अनावर झाला. ती उद्गारली, " महिन्याला पंधरा आणे मिळत नाहींत, तर तीन हजार रुपये कुठून फेडणार ? "

"कुठून ? व्यवहारांत 'तूं नाहीं तुझा काका फेडील' असें म्हणतात तेंच उत्तर मी तुला देतों. तूं नाहीं, तुझा काका तीन हजार रुपये देईल !"

" काका वारले हें माहित नाहीं वाटतें ?"

" ते वारले म्हणूनंच आम्हाला तीन हजार रुपये मिळणार. जिवंतपणीं दुसऱ्याला मदत करणारे महात्मे खूप असतात; पण मरून दुसऱ्याला मदत करणारे असे लोक विरळा."

" काकांनीं मृत्युपत्रांत आपणांला तीन हजार रुपये दिले आहेत वाटतं ?"

" तुला कांहींच माहीत नाहींसं दिसतं ! बायको माणूसच तूं ! अग, तुझ्या काकांचें मृत्युपत्रच नाहीं म्हणे मुळीं; त्यामुळें अर्धी मिळकत तात्यांची झाली. तात्या आतां आपल्या मिळकतींतले तीन हजार रुपये मला देणार ! समजलें ? आतां तुझें काम एवढेंच कीं तीन हजारांऐवजीं सहा हजार मला द्यायला त्यांना सांगायचें !"

" पैसे झाडाला लागतात कीं काय ? "

" झाडाला न लागेनात; जांवयाच्या पायधुळीसाठीं ते असतील नसतील तेथून बाहेर येतात. मी गोव्यांतल्या एक दोन देखण्या बाया मिळविल्या आहेत. त्यांची नाटक मंडळी काढायची आहे. एवढे सहा हजार रुपये मिळवून दे बघ, कीं मग 'कोरगांवनिवासी भूतनाथ प्रासादिक स्त्रीसंगीत मंडळी'ची तूं मालकीण होशील !"

" मीं नाहीं तात्यांना सांगणार ! "

" न सांगेनास. पुन्हां तुझें तोंड बघणार नाहीं. रात्रीं जेवण झाल्यावर सुदाम सावकार त्या जमिनीबद्दल बोलणें करण्यासाठींच येणार आहेत. " सुधेचें डोकें फिरूं लागलें. तात्यांनीं जांवयाला बोलावून चंद्राच्या जमिनींची विल्हेवाट लावायलाही इतक्यांत सुरुवात केली ? ती रागानें म्हणाली, " चंद्रा एकटा आहे. जाऊं द्या मला. "

" जाऊं देईन; पण आधीं दक्षिणा दिली पाहिजे ! "

सुधेनें त्याच्या बोलण्याचा भावार्थ ताडला. क्षणभर कां होईना, तिला आनंद झाला. पतीच्या स्पर्शाच्या कल्पनेनें ती पुलकित झाली. ती बोलत नाहींसें पाहून रंगराव म्हणाले, " मघाशीं मी आलों त्या वेळीं त्या मुलाचा चांगला आनंदानें मुका घेत होतीस ? नि आतां ? "

सुधेचें आनंदमंदिर या शब्दांनीं ढांसळून पडलें.

" चला, जाऊं द्या मला, " ती दाराकडे वळून म्हणाली.

" जाऊं देईन, पण केव्हां ? शाकुंतल वाचलें आहे का ? दुष्यंत काय म्हणतो-"

" वाटेल तें म्हणूं दे. चंद्राची काहिली होत असेल ? "

" आणि आमची होत नाहीं वाटतें ? " रंगरावांनीं तिचा हात धरला. सुधेच्या पतिप्रेमाच्या भावनेला क्षणभर भरती आली. तिला तो हात झिड-कारण्याचें धैर्य झालें नाहीं; पण रंगरावांचें तोंड जवळ येतांच तिला दारूची वसकन् घाण आली. आतां मात्र तिच्यानें राहवेना. तिनें ताडकन् आपला हात त्यांच्या हातांतून सोडवून घेतला आणि दार उघडून ती बाहेर आली. चंद्रकांताची घोकणी चाललीच होती—' आक्का ! ' ' आक्का ! '

* * * *

माजघरांत चंद्राच्या अंगावर हात फिरवीत सुधा सोप्यावरील संवाद ऐकत होती. चंद्राला मघाशीं आक्का आपल्याला सोडून गेली असें स्वप्न पडलें होतें. ' माझ्या बाळाला मी कधीं सोडायची नाहीं' असें सांगून त्याला आपल्या बाहुपाशांत गुरफटून सुधेनें त्याची समजूत केली होती. बाहेरच्या संभाषणावरून सुदाम सावकारांना मिळकत लिहून देऊन तात्या पैसे काढणार व ते ती रक्कम आपल्या नवऱ्याला देणार हें चटकन् तिच्या लक्षांत आलें. आपल्या नवऱ्याचा खिसा म्हणजे डोक्यावरचा फुटका रांजण हें ती पक्कें ओळखून चुकली होती. जुगारापायीं तीन हजारांच्या खड्डयांत पडलेल्या माणसानें तो खड्डा बुजविण्या-ऐवजीं अधिक खणण्याचा उद्योग सुरू केलेला पाहून त्याच्याविषयीं कोणाला कसा विश्वास उत्पन्न व्हावा ? आपल्या नवऱ्याला बायकांची भूतनाथ प्रासादिक नाटक मंडळी काढायला मदत करणें म्हणजे भुताच्या हातांत कोलीत देणें हें तिला पक्कें कळत होतें. चंद्राला अन्नाला महाग करून आपला नवरा तात्यांकडून पैसे काढणार व एखादी बाई घरांत आणून तिचीं धुणीं आप-ल्याला धुवायला लावणार, हें कटु पण सत्य चित्र तिच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. काकांच्या आत्म्याला शांति मिळण्याकरितां आपण चंद्राचा प्रतिपाळ करण्याचें वचन दिलें आहे, तें आपण पाळलेंच पाहिजे, असा तिनें मनाशीं निश्चय केला. यःकश्चित् मांजरी आपल्या पिलाचें रक्षण करण्याकरितां वाघीण होऊन कुत्र्यावर धांवते, मग भावाचें जन्माचें नुकसान होत असतांना आपण मुळींच गप्प बसतां कामा नये ! आपण जर मूग गिळून बसलों, तर चंद्रानें

कोणाच्या तोंडाकडे पाहावें ? तिच्या मनांत हा शेवटचा विचार यायला व चंद्रानें तिच्याकडे डोळे उघडून पाहावयाला एकच गांठ पडली.

" पण मृत्युपत्र वगैरे कांहीं नाहीं ना ? " सुदाम सावकार संशयित वृत्तीनें विचारीत होते.

" नाहीं हो, काहीं नाहीं. असतें तर मला मिळाल्यावांचून राहिलें असतें का ? " तात्यांचें उत्तर ऐकूं आलें.

" पण मला सहा हजार उद्यां उजडण्याच्या आंत मिळाले पाहिजेत." रंगराव जणूं काय बायकोच्या काकाची मिळकत आपल्या बापाचीच असें समजून बोलत होते !

" सहा हजार मिळतील; पण ही गोष्ट या कानाची त्या कानाला कळतां उपयोग नाहीं ! शिवाय सुधेला नेऊन कुठें तरी बिऱ्हाडही केलें पाहिजे. " तात्या म्हणाले.

" त्याला माझी एका पायावर तयारी आहे. "

पुढें कांहींच बोलणें ऐकूं येईना. थोड्या वेळानें लेखणीचा कुरकुर आवाज ऐकूं आला. तात्या सावकारांना कागद लिहून देत आहेत हें सुधेनें ताडलें. तिच्यापुढें ब्रह्मांड उभें राहिलें. स्वार्थी बाप व व्यसनी नवरा बाहेर संगनमत करून निष्पाप भावाचा गळा कापीत होते. तिचें मन तात्यांविरुद्ध जळफळूं लागलें. ती चंद्राजवळून उठून तत्काळ बाहेर गेली व एकदम कठोर स्वरानें म्हणाली,

" तात्या, लिहूं नका तो कागद. त्याचा कांहीं उपयोग नाहीं ! "

तात्यांनीं चमकून वर पाहिलें.

" आंत बैस जा पोरी. पुरुषांच्या कामांत बायकांनीं तोंड घालूं नये. इथें कांहीं तापावर औषध देत बसयचें नाहीं."

" तापावर नाहीं, पापावर द्यायचें आहे ! " सुधा फणकाऱ्यानें म्हणाली.

" नवऱ्यापुढें बायकोनें असें बोलणें म्हणजे नवऱ्याचा उपमर्द आहे." रंगराव गुरगुरले.

" बायकोला टांकून जुगार खेळण्यानें बायकोचा सन्मान होतो वाटतें ? "

" कारटे, अधिक बोलशील तर एका तोंडाचीं दोन तोंडें करीन." तात्या ओरडले !

" खुशाल करा. त्या दोन्ही तोंडांनीं मी खरें मृत्युपत्रच मरेपर्यंत मोठमोठ्यानें वाचीन."

" मृत्युपत्र ?" सर्व आश्चर्यानें उद्गारले.

" होय, मृत्युपत्र ! काकांचें मृत्युपत्र ! तुमचा त्या मिळकतींतल्या काडीवरदेखील हक्क नाहीं." सुधेनें रागारागानें तें मृत्युपत्र काढलें व घडाघड वाचून दाखविलें.

" अग, अग," रंगराव उठून तिच्या हातांतील कागद घेण्याच्या हेतूनें किंचित् जवळ येऊन म्हणाले.

" कांहीं नको जवळ यायला. जुगार खेळतांना झाली होती का बायकोची आठवण ?"

" पण सुधे–माझ्यासाठीं–मी तर तुझा बाप आहें ना ?"

" सत्याला कुणाचीच पर्वा नसते."

" बाप नको ! आणि नवरा नको ! मग तूं जगणार कुणाच्या जीवावर ?"

" कुणाच्या ?" सुधा उत्तर देणार तोंच आंतून "आक्का" ही चंद्रकांताची हांक स्पष्ट ऐकूं आली. जाळींतून ओरडणाऱ्या आपल्या बच्चाकडे धांवत जाणाऱ्या वाघिणीप्रमाणें ती आंत गेली व तिनें चंद्रकांताला एकदम उचलून खांद्यावर घेतलें. या वेळीं तिला विलक्षण अवसान आलें होतें.

" आक्का, कुठें जायचें ?" चंद्रकांत म्हणाला.

" जिथें माणुसकी आढळेल, माया लाभेल, तिथें !" सुधा म्हणाली.

बाहेर येऊन सुधा पायऱ्या उतरूं लागली. समोर भयाण अंधार पसरला होता; पण नवऱ्याच्या हृदयांतील काळोखाच्या मानानें तो कमी भीतिप्रद होता. बाहेर रातकिड्यांची किरकिर एकूं येत होती; पण तात्यांच्या मनांतील पापी विचारांपेक्षां ती कमी कर्णकटु होती. सुधेनें वर पाहिलें, मेघांच्या पदराआड एका ताऱ्याला पोटाशीं घेऊन रजनी त्याचें कौतुक करीत होती. तात्या रागानें बेफाम होऊन ओरडले, " मूर्ख मुलगी !" रंगराव पिसाळून गर्जले, " बेफाम बायको !" चंद्रकांतानें कण्हत हांक मारली, " आक्का, आक्का !"

१९२९

## कवडा पोर ४

कैलासनाथाच्या डोंगरीपुढें अथांग सागर पसरला होता; पण सीताताईचें लक्ष मेघनाथाच्या डोळ्यांतील पाण्याकडे होतें. वर निळसर आकाशांत चांदण्य चमचम चमकूं लागल्या होत्या; पण तिचें मन भावाच्या चेहऱ्यावर चमकणाऱ्या तेजांत गुंग होऊन गेलें होतें. एखाद्या बालदेवानें खेळण्याकरितां तयार केलेल्या चिमुकल्या नावेपुढें शुद्ध द्वितीयेची चंद्रकोर दिसत होती! मात्र बहिणीचा हृदयसागर त्या कोमल चंद्रिकेपेक्षां भावाच्या मुखावरील मृदु हास्य पाहूनच उचंबळत होता. आपल्या आवडत्या गाण्यांत रंगून जाणाऱ्या गवयाप्रमाणें सीताताईची भावाला बघतां बघतां प्रेमसमाधि लागली होती. मेघनाथही तटस्थ बसला होता. समोर पसरलेल्या समुद्राच्या अंतरंगांतील खळबळ त्याच्या पृष्ठभागावर पाठशिवणीचा खेळ खेळणाऱ्या लहरींवरून जशी मुळींच कळत नव्हती, त्याप्रमाणें मेघनाथाच्या हृदयांत चाललेल्या विचारांचा मागमूस त्याच्या चेहऱ्यावरील स्मितलहरींवरून मुळींच लागण्यासारखा नव्हता. साऱ्या जगांत आपण दोनच माणसें आहोंत, त्या दोन माणसांचीं मनें दिव्य प्रेमानें भरून गेलीं आहेत, चराचर सृष्टि प्रेमसंगीताचे सूर काढीत आहे, असा त्या दोघांना भास होत होता. त्या प्रेमसमाधीचा भंग कसल्याशा पांखराच्या ओरडण्यानें झाला. त्या आवाजांत हृदय पिळवटून टाकणारा करुणरस भरला होता असें दोघांनाही वाटलें. भरून आलेल्या गळ्यानें मेघनाथानें विचारलें,

"ताई, कसलें ग पांखरूं आहे हें?"

" खुशाल करा. त्या दोन्ही तोंडांनीं मी खरें मृत्युपत्रच मरेपर्यंत मोठमोठ्यानें वाचीन. "

" मृत्युपत्र ? " सर्व आश्चर्यानें उद्गारले.

" होय, मृत्युपत्र ! काकांचें मृत्युपत्र ! तुमचा त्या मिळकतींतल्या काडीवरदेखील हक्क नाहीं. " सुधेनें रागारागानें तें मृत्युपत्र काढलें व घडाघड वाचून दाखविलें.

" अग, अग, " रंगराव उठून तिच्या हातांतील कागद घेण्याच्या हेतूनें किंचित् जवळ येऊन म्हणाले.

" कांहीं नको जवळ यायला. जुगार खेळतांना झाली होती का बायकोची आठवण ?"

" पण सुधे–माझ्यासाठीं–मी तर तुझा बाप आहें ना ?"

" सत्याला कुणाचीच पर्वा नसते."

" बाप नको ! आणि नवरा नको ! मग तूं जगणार कुणाच्या जीवावर ?"

" कुणाच्या ?" सुधा उत्तर देणार तोंच आंतून "आक्का" ही चंद्रकांताची हांक स्पष्ट ऐकूं आली. जाळींतून ओरडणाऱ्या आपल्या बच्चाकडे धांवत जाणाऱ्या वाघिणीप्रमाणें ती आंत गेली व तिनें चंद्रकांताला एकदम उचलून खांद्यावर घेतलें. या वेळीं तिला विलक्षण अवसान आलें होतें.

" आक्का, कुठें जायचें ?" चंद्रकांत म्हणाला.

" जिथें माणुसकी आढळेल, माया लाभेल, तिथें !" सुधा म्हणाली.

बाहेर येऊन सुधा पायऱ्या उतरूं लागली. समोर भयाण अंधार पसरला होता; पण नवऱ्याच्या हृदयांतील काळोखाच्या मानानें तो कमी भीतिप्रद होता. बाहेर रातकिड्यांची किरकिर ऐकूं येत होती; पण तात्यांच्या मनांतील पापी विचारांपेक्षां ती कमी कर्णकटु होती. सुधेनें वर पाहिलें, मेघांच्या पदराआड एका ताऱ्याला पोटाशीं घेऊन रजनी त्याचें कौतुक करीत होती. तात्या रागानें बेफाम होऊन ओरडले, " मूर्ख मुलगी !" रंगराव पिसाळून गर्जले, " बेफाम बायको !" चंद्रकांतानें कण्हत हांक मारली, " आक्का, आक्का !"

१९२९

## कवडा पोर

४

कैलासनाथाच्या डोंगरीपुढें अथांग सागर पसरला होता; पण सीताताईचें लक्ष मेघनाथाच्या डोळ्यांतील पाण्याकडे होतें. वर निळसर आकाशांत चांदण्य चमचम चमकूं लागल्या होत्या; पण तिचें मन भावाच्या चेहऱ्यावर चमकणाऱ्या तेजांत गुंग होऊन गेलें होतें. एखाद्या बालदेवानें खेळण्याकरितां तयार केलेल्या चिमुकल्या नावेपुढें शुद्ध द्वितीयेची चंद्रकोर दिसत होती! मात्र बहिणीचा हृदयसागर त्या कोमल चंद्रिकेपेक्षां भावाच्या मुखावरील मृदु हास्य पाहूनच उचंबळत होता. आपल्या आवडत्या गाण्यांत रंगून जाणाऱ्या गवयाप्रमाणें सीताताईची भावाला बघतां बघतां प्रेमसमाधि लागली होती. मेघनाथही तटस्थ बसला होता. समोर पसरलेल्या समुद्राच्या अंतरंगांतील खळबळ त्याच्या पृष्ठभागावर पाठशिवणीचा खेळ खेळणाऱ्या लहरींवरून जशी मुळींच कळत नव्हती, त्याप्रमाणें मेघनाथाच्या हृदयांत चाललेल्या विचारांचा मागमूस त्याच्या चेहऱ्यावरील स्मितलहरींवरून मुळींच लागण्यासारखा नव्हता. साऱ्या जगांत आपण दोनच माणसें आहोंत, त्या दोन माणसांचीं मनें दिव्य प्रेमानें भरून गेलीं आहेत, चराचर सृष्टि प्रेमसंगीताचे सूर काढीत आहे, असा त्या दोघांना भास होत होता. त्या प्रेमसमाधीचा भंग कसल्याशा पांखराच्या ओरडण्यानें झाला. त्या आवाजांत हृदय पिळवटून टाकणारा करुणरस भरला होता असें दोघांनाही वाटलें. भरून आलेल्या गळ्यानें मेघनाथानें विचारलें,

"ताई, कसलें ग पांखरूं आहे हें?"

"कवडा आहे तो."

"ह्याच्या ओरडण्यानें डोळ्यांत आंसवें कां बरें येतात?"

"लोक म्हणतात, तो सारखा 'उठ ग सीते, कवडा पोर पोर' असें म्हणत असतो."

"खरेंच, त्याचें हें करुणगीत सारखें ऐकत राहावेंसें वाटतें."

"हंसेल कोणी तरी तुला भाऊसाहेब. गाण्यांतला एवढा मोठा दर्दी तूं. दूरदूरचे गवई आपलें गाणें तुला ऐकवण्याकरतां मुद्दाम आपल्या संस्थानांत येतात. तुझ्या नुसत्या मान डोलवण्याची किंमत इतर संस्थानांतल्या वंशपरंपरागत जाहागिरीपेक्षां गवयांना अधिक वाटते!"

"कळतें कळतें आम्हांला सारें हं, ताईसाहेब. आपण मला हरभऱ्याच्या झाडावर कां चढवितां आहां हें न कळण्याइतका कांहीं मी आतां कुक्कुबाळ नाहीं!"

"भाऊसाहेब, तूं आतां कुक्कुबाळ नाहींस म्हणूनच मला तुला कांहीं सांगायचें आहे. तूं लहान होतास तेव्हांच्या भाऊबीजांना तुझ्याकडून 'विद्या संपादन करीन' अशा शब्दाची ओवाळणी मीं घेतली, विद्या झाल्यावर 'कीर्ति मिळवीन' ही ओवाळणी घेतली. आतां गादीवर येऊन चार पांच वर्षें झालीं. लहान मुलें खाऊ नि खेळणीं सोडून तिला पाहण्यासाठीं दरवाजाकडे धांवतात; राज्यांतील तरुण पुरुष पत्नीचा बाहुपाश सोडवून तुझ्याकरतां काळपाशांत आपली मान द्यायला एका पायावर तयार असतात; वृद्ध ध्यानाला बसले कीं त्यांना आराध्यदेवतेच्या जागीं-तुझीच मूर्ति दिसूं लागते."

मेघनाथ खो खो करून हंसत म्हणाला, सीताताईच का ग तूं? का दुसरीच कुणी आहेस? मला वाटलें, आमच्या दरबारांतला जुन्या काळचा कुणी भाटच बोलतो आहे. ताई, माया आंधळी असते म्हणूनच तुला इतका बोलकेपणा शोभतो बरें! मीं राज्य चांगलें चालविलें इतकेंच ना तुझें म्हणणें? तुझ्यासारख्या मायाळू बहिणीचें छत्र डोक्यावर होतें म्हणूनच लोकांचा दुवा मला मिळवितां आला हें मात्र तूं विसरूं नकोस म्हणजे झालें. सेतुबंधनाच्या वेळीं पाषाण समुद्रावर तरले! पण तो गुण पाषाणांचा नव्हता; रामनामाचा होता!"

"अशी स्तुतीनें स्तुति वाढवायची आणि शब्दांच्या पुरांत मुद्द्याची नाव बुडवून टाकायची हा तर तुझा स्वभावच आहे. पण आज मी या जाळ्यांत सांपडायची नाहीं हं. आजच्या भाऊबीजेची मी मागेन ती ओंवाळणी तूं मला घालायला हवी!"

" एका गोष्टीशिवाय मागशील ती. राज्य पाहिजे तर राज्य देतों—"

" तुझ्या प्रेमाचें राज्य मला पुरे आहे."

" तुला दानधर्म करायचा असला तर त्याच्यासाठीं माझ्या खासगींतलीं सगळीं रत्नें देतों. "

" तुझीं रत्नें मला नकोत. मीच तुला एक रत्न देणार आहें. तें मात्र तूं घेतलेंच पाहिजेस."

" चवदावें वाटतें ? त्याला आपली मुळींच हरकत नाहीं. वडील बहिणीच्या हातचा मार मिळायलादेखील भाग्यच लागतें."

" उठल्यासुटल्या कसली रे तुझी थट्टा, भाऊसाहेब ? मी तुला अगदीं, खरेपणानें सांगतें कीं मी देणार तें रत्न तूं घेतलेंच पाहिजे—"

" पण चौदा रत्नांपैकीं तें कोणतें आहे हें कळल्यावांचून मीं तें घ्यावें वाटतें ? खासा न्याय ! म्हणजे चंद्र असेल म्हणून गळ्यांत गळा घालायला जावें न् शंखच गळ्यांत पडावा असें व्हायचें !"

" तुझ्या तोंडाला लागायला मी तुझ्याइतकी थोडीच शिकलें आहें ! भाऊसाहेब, आजपर्यंत तूं माझ्या शब्दाबाहेर कधींही गेला नाहींस. आजही जाणार नाहींस असें वचन दे. "

" आधीं वचन देऊन बसलें कीं दशरथाप्रमाणें मुलाला वनवासाला धाडायची पाळी येते, नाहीं तर चांगुणेप्रमाणें त्याला उखळांत कांडावें तरी लागतें. तेव्हां आधीं नाहीं बुवा आपण वचन देणार !"

" लग्नाचा नाहीं थांग न् म्हणे मुलाचें नांव सांग. आधीं दोन हाताचे चार हात होऊं देत ! मग खुशाल मुलाला वनवासाला पाठविण्याच्या गोष्टी कर."

" भावांना, मुलांना, पुतण्यांना, भाच्यांना चतुर्भुज करण्याची तुम्हां बायकांची धडपड पाहिली म्हणजे जग हा मोठा तुरुंग असून तो भरून टाकण्याची कामगिरी देवानें बायकांकडे दिली आहे, असें मला वाटूं लागतें."

" तुला काय वाटेल तें वाटो. तूं मला आतां वहिनी आणून देणारा ना ? "

" सीताताई, वहिनीलाच असें काय ग सोनें लागलें आहे ? तूं प्रेमानें माझ्या पाठीवरून हात फिरविलास म्हणजे पाठीशीं लक्षावधि शूर शिपायांचें खडें सैन्य उभें असल्याइतका धीर मला येतो. तूं मायेनें माझ्याकडे पाहिलेंस म्हणजे अमृताची वृष्टि माझ्यावर झाल्यासारखी मला वाटते."

"पण बहीण मायाळू असली म्हणून बायको करूं नये असें कुठें सांगितलेंआहे ?"

" सीताताई, एका म्यानांत दोन तरवारी राहत नाहींत ! "

" तुझें आपलें नेहमीं हें असेंच. आतां तुझें लग्न केलें नाहीं तर लोक मला बाहेर तोंड काढूं देणार नाहींत. सारंगी तयार करणारानें ती नेहमींच आपल्या-पाशीं ठेवून चालत नाहीं. गोड गळ्याची तिनें सांथ करायला नको का ?"

" सीताताई, नाहीं नाहीं त्या कल्पना माझ्या मनांत येतात. उद्यां माझें लग्न झाल्यावर भावजयीपासून तुला सुख होईलच याचा काय नेम आहे ? "

" सगळ्याच नणंदाभावजया भांडतात कीं काय रे ? तुम्ही दोघें सुखानें नांदलांत कीं माझ्या डोळ्यांचें पारणें फिटेल. देवानें माझ्या भाऊरायाला नि माझ्या वहिनीला उदंड औक्षवंत करावें म्हणजे झालें."

" तसें नव्हे ग ताई. उद्यां तुला वाटेल, भावाचें आपल्यावरलें प्रेम कमी झालें."

कवड्याचा करुण स्वर पुन्हां त्यांच्या कानांवर पडला. "उठ ग सीते, कवडा पोर पोर" हे शब्द नकळत मेघनाथाच्या मुखांतून बाहेर पडले. तो सद्गदित स्वरानें सीताताईजवळ जाऊन म्हणाला, "ताई, तो कवडा म्हणतो त्याप्रमाणें मी पोरच आहें. मला पोरच राहूं दे. मला थोर करण्याचा हट्ट कां बरें धरतेस?"

" तुझें लग्न झालें नाहीं तर उद्यां गादीवर कोण बरें बसेल ? असें वेड्यासारखें काय करावें ? लग्न झालें म्हणून कांहीं सगळ्यांचीच बहिणीवरची माया कमी होत नाहीं. रुक्मिणीला पट्टराणी करून द्रौपदीवर कृष्णाचें प्रेम कायम राहिलेंच ना ? माझा भाऊरायाही कृष्णच आहे. तुला गाणें फार फार आवडतें म्हणून अप्सरेपेक्षांही गोड गळ्याची एक मुलगी मीं मुद्दाम पाहून ठेवली आहे."

" अप्सरेपेक्षां गोड गळ्याची नको. या कवड्यापेक्षांही करुण सूर काढणारी हवी ! पाहा तो एकसारखा आक्रोश करतो आहे—'उठ ग सीते, कवडा पोर पोर' "

" असें पोरासारखें करायचें नाहीं बरें आतां. साऱ्या प्रजेचे डोळे तुझ्या लग्नाकडे लागले आहेत."

" मी नाहीं लग्नाला कबूल झालों तर—"

" तर—" सीताताई डोंगरीवरील अगदीं टोंकाच्या कड्याकडे गेली. खालीं खडकावर समुद्राच्या लाटा जोरजोरानें आपटत होत्या.

" ताई, मागें फिर. मागें फिर. तोलबिल जाईल चुकून ! " मेघनाथ सीतेच्या मागोमाग धांवत जाऊन म्हणाला.

"तूं लग्न केलें नाहींस तर काय करायचें हें या डोंगरीवरील कैलासनाथ मला सांगेल. यःकश्चित् लाटांना जर खडकावर उडी टाकतांना भीति वाटत नाहीं—"

तिचा हात घट्ट धरून तिला मागें ओढीत मेघनाथ म्हणाला, " मीं लग्न केलें नाहीं तर तूं जीव देणार ? "

मेघनाथाच्या अंगावर कांटा व डोळ्यांत अश्रु उभे राहिले. " ताई, मी लग्न करतों ! " तो रुद्ध कंठानें म्हणाला.

" या भाऊबीजेची ओंवाळणी मला पोंचली. आतां पुढल्या भाऊबीजेला भाचा पाहिला कीं—"

" तुम्ही बायका म्हणजे सदा असंतुष्ट न् अधिऱ्या. वहिनी पदरांत पडली नाहीं तोंच भाच्याची मागणी सुरू झाली. सृष्टीनेंच नऊ महिन्यांची मुदत ठेवली आहे म्हणून बरें ! नाहीं तर पुढच्या भाऊबीजेचीही ओंवाळणी याच भाऊबीजेला मागून घेतली असतीस. "

" पुढल्या भाऊबीजेला या कैलासनाथाच्या डोंगरीवरील कोणकोण येणार हें या समुद्राला आधीं सांगायचें नाहीं हं भाऊसाहेब. त्याच्या सर्व रत्नांना निस्तेज ठरवील असें एक रत्न त्या वेळीं इथें दिसणार आहे. त्या दिवशीं ही चंद्राची कोर माझ्या भाचाच्या गळ्यांतला ताईत होईल; या साऱ्या नक्षत्रांचा घुंगुरवाळा मी त्याच्या पायांत घालीन; समुद्रांतल्या मोत्यांच्या पाण्यानें मी त्याला न्हाऊं घालीन; आणि माझ्या छोट्या भाऊसाहेबाला दृष्ट लागूं नये म्हणून माझ्या पंचप्राणांची त्याला तीट लावीन. पुढल्या भाऊबीजेला मध्यें मूल घेतलेली वहिनी आणि दोन्ही बाजूंनीं आम्हीं दोघें अशीं इथें उभीं राहूं ! नाहीं ? "

सीतेचे हे वेड्यासारखे उद्गार ऐकून मेघनाथाच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रु वाहूं लागले. तीं दोघेंही देवळाकडे वळलीं. कैलासनाथाच्या मंदिराचा पहारेकरी हळूच गुणगुणत असलेले खालील चरण याच वेळीं त्यांच्या कानांवर पडले.

लक्षुमीच्या मुठीं । सांपडला जगजेठी ।
जिवाभावाची बहीण । गेला तिला विसरून ।
यज्ञकुंडीं उभा पडे । नाहिं तुम्हांला सांकडें ।
झोप क्षीरसागरांत । कशी येते दीनानाथ ? ।

त्यांच्या पाठोपाठ कवड्याचा करुण स्वर घुमूं लागला. नकळत बहीणभावांच्या तोंडून शब्द निघाले. ' उठ ग सीते, कवडा पोर पोर.'

ॐ ॐ ॐ ॐ

मेघनाथ आणि चपला यांना मांडीवर घेऊन त्यांच्या तोंडांत साखर घालतांना सीतेला विलक्षण आनंद झाला. आजपर्यंत जें सुखस्वप्न तिनें कल्पना-

चक्षूंनीं पाहिलें होतें, तें कैलासनाथाच्या कृपेनें आतां सत्यसृष्टींत उतरलें होतें. लहानपणींच आकाशींची कुऱ्हाड कोसळल्यामुळें तिच्या संसाराचा वृक्ष छिन्न-भिन्न होऊन गेला होता; पण त्या वृक्षाला घालायचें सर्व प्रेमजल तिनें आपल्या पोरक्या भावाच्या आयुष्यवेलीला घातलें होतें. भावजयीच्या तोंडांत साखर घालतांना ती म्हणाली,

" वहिनी, साखरेचें खाणार त्याला देव देणार असें म्हणतात. आतां तुला देव काय देणार, सांग पाहूं ? "

" देवानें द्यायचें तें दिलें, तेव्हांच साखरेचें खायला मिळालें, " चपलेनें उत्तर दिलें.

जोडप्यानें सीतेला नमस्कार केला तेव्हां ' कैलासनाथा, माझें सारें आयुष्य देऊन या जोडप्यावर तूं आपल्या कृपेची पाखर घाल ' अशी तिनें देवाची मूक प्रार्थना केली. तिच्या प्रार्थनेचें उत्तर म्हणूनच कीं काय आकाशवाणी व्हावी त्याप्रमाणें कुठूनसा कवड्याचा करुण व उत्कंठित स्वर आला, 'उठ ग सीते, कवडा पोर पोर.'

दिसतें तसें नसतें हा अनुभव संसाराच्या बाबतींत सीतेला लवकरच येऊं लागला. मेघनाथाला आजपर्यंत तिनें जीव कीं प्राण केलें होतें. पण तिचा हा जीव आतां पूर्वीप्रमाणें तिच्याजवळ नसल्यामुळें तिच्या दिनक्रमाला एक प्रकारची प्रेतकळा आली. सीताताई पूजेला बसली कीं मेघनाथाची स्वारी तेथें येऊन थट्टामस्करी करायला बसलीच, असा आजपर्यंतचा क्रम होता. तिनें शंकराच्या पिंडीवर बेल वाहायला सुरुवात केली, कीं मेघनाथ म्हणे, " ताई, या बाईलवेड्या देवाची पूजा करण्यांत काय ग अर्थ आहे ? मोठा लबाड देव आहे हं हा. कुणाला मोठा सांब वाटतो, तर कुणाला रुद्रावतार वाटतो. अंगाला राख फांसून स्मशानांत जायची याची तयारी ! पण पार्वतीला मात्र क्षणभर-देखील विसंबत नाहीं स्वारी ! इतरांनीं अर्धनारीनटेश्वर म्हटलें, तरी त्याची त्याला लाज नाहीं. अग, असल्या देवाची पूजा करणें म्हणजे माझ्यासारख्यानें बायकोला डोक्यावर घेऊन नाचावें असा उपदेश करण्यासारखेंच नाहीं का ? उद्यां लग्न झाल्यावर मीही जर अर्धनारीनटेश्वर झालों, तर तें तुला आवडेल का ? " सीताताई या थट्टेला हंसून छोटेंसेंच उत्तर देई, ' अर्धनारीनटेश्वर होण्याकरतां का होईना, तूं लग्न कर म्हणजे झालें ! ' देव्हाऱ्यांतील लंगडा बाळकृष्ण पाहून मेघनाथाला विनोद करण्याची लहर येई, ' ताई हा बाळकृष्ण

लंगडा कां झाला तुला माहीत आहे का? तुला वाटत असेल दूध, दहीं चोरण्याकरतां कुणा तरी गवळ्याच्या घरा शिरला असेल नि खिडकींतून उडी टाकतांना त्याचा पाय मोडला असेल! पण हें कांहीं खरें कारण नाहीं हो. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात तसे याचेही यशोदेला दिसले होते. तिनें पाहिलें कीं स्वारी पुढें बायकोला घेऊन 'नवरा राजा न् नवरी राणी' असा संसार करण्याकरतां मथुरेहून पळून जाणार. तेव्हां तिनें लहानपणींच त्याचा पाय मोडून ठेवला. सीताताई, तूंही माझा पाय तसाच मोडून ठेव; म्हणजे लग्न झाल्यावर मी बायकोच्या नादीं लागून तुला टाकून कुठें जाणार नाहीं!"

"पाय मोडला तरी बाळकृष्ण द्वारकेला जायचा तो गेलाच कीं" सीताताई मेघनाथाला उत्तर देई.

सीताताईची पूजेची व चपलेची वेणीफणीची वेळ एकच असल्यामुळें लग्न झाल्यानंतर पूजेच्या वेळची मेघनाथाची ही हजिरी चुकूं लागली. देव्हाऱ्यांतील निर्जीव देवांपेक्षां प्रसाधनमंदिरांतील सजीव देवतेकडे पाहत बसण्यांत अधिक आनंद आहे असें त्याला आढळून येऊं लागलें. आरशापुढें उभी राहून चपला भांग काढूं लागली कीं मेघमंडळांतून चमकत जाणाऱ्या विजेप्रमाणें तें दृश्य त्याला मनोहर वाटे. आकाशांतील वीज डोळ्यांना आनंद पण कानांना त्रास देते. परंतु चपलेच्या केशकलापांतील वीज प्रगट होत असतांना तिला तिच्या गोड गळ्याची जोड मिळत असल्यामुळें मेघनाथाला ईश्वरी सृष्टींतील न मिळणारा आनंद लाभत असे. शंकराला पांढरीचीं फुलें वाहावयाचीं असल्यामुळें सीताताईच्या पूजेंत गुलाबाचें डौलदार फूल वाटोळ्या पिंडीवर पाहण्याचा योग मेघनाथाला कधींच आला नव्हता. पण चपलेनें अंबाड्यावर गुलाबाचें फूल खोवलें कीं देव्हाऱ्यांत कधींही न दिसणारा देखावा त्याला दिसूं लागे व उदयगिरीवर आरूढ झालेल्या सूर्यबिंबाप्रमाणें तें फूल आपल्यावर तेजाची व उत्साहाची वृष्टि करीत आहे असा त्याला भास होई. देवाला लावायचें गंध व चपला लावीत असलेलें कुंकू यांतही सौंदर्याच्या दृष्टीनें जमीन अस्मानाचें अंतर होतें. पहिलें भसाड्या आवाजाच्या मनुष्यानें स्वच्छंद म्हटलेल्या गाण्याप्रमाणें वाटे, तर दुसरें उत्कृष्ट गवयाच्या तालबद्ध चिजेप्रमाणें भासे. सीताताईच्या पूजेंत मेघनाथाला देवाला शिवण्याची बंदी होती व उत्तमांतील उत्तम प्रसाद म्हणजे दूध अगर साखर हा मिळे. चपलेच्या प्रसाधनपूजेंत देवतेला शिवलें असतांना हरकत नव्हती; एवढेंच नव्हे, तर भक्तानें

स्पर्श केल्याशिवाय देवता प्रसन्न झाल्यासारखी दिसतच नसे. या पूजेंत पूजा होण्यापूर्वीच अमृताचा नैवेद्य मिळण्यालाही कधीं अडचण पडत नसे. शंकरावर वाहिलेल्या कमळापेक्षां चपलेचे डोळे, देव्हाऱ्यांतील जाईजुईपेक्षां चपलेनें मंदस्मित केलें कीं तिचे अर्धस्फुट दिसणारे दांत, बेलाच्या तिकट्यापेक्षां तिच्या डोक्यावरील पिंपळपान, दूर्वांकुरापेक्षां तिचे काळे कुरळे केंस आणि घंटानादापेक्षां तिचा मधुर स्वर मेघनाथाला अधिकाधिक आकर्षूं लागला.

भाऊ या जादूनें भारला गेल्यामुळें बहिणीचें पूजेकडे लक्ष लागेनासें झालें. जणूं काय तिच्या पूजेचें आराध्यदैवतच नाहींसें झालें होतें. मेघनाथ जिथें बसत असे ती जागा रिकामी राहिलेली पाहून नकळत सीतेच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागत व त्या गंगायमुनांनींच देवांचें स्नान घडत असे. देवांवरील कोमेजलेलें निर्माल्य काढतांना ताज्या फुलांनीं भरलेल्या परडीकडे तिचें लक्ष जात असे आणि या निर्माल्याला हीं ताजीं फुलें ज्याप्रमाणें हंसत आहेत, त्याप्रमाणें आपली भावजयही या वेळीं आपणांला हंसत असेल असा विचार मनांत येऊन तिचें अंतःकरण पिळवटून जाई. बेल म्हणून शंकराला ती तुळशीपत्रें वाही नि ही चूक मागून लक्षांत आली म्हणजे हरिहर एकच आहेत या वेदांतानें आपल्या मनाचें समाधान करून घेई.

जी स्थिति पूजेची, तीच स्नानाची, जेवणाची व उठण्यावसण्याची होऊं लागली.

लग्न होण्यापूर्वी मंदाकिनीवर प्रातःकाळीं सीताताई व मेघनाथ जात असत. मेघनाथ एकदम खोल पाण्यांत उडी टाकून भराभर पोहूं लागे व पाण्याबाहेर दिसणारें त्याचें तेजस्वी मुख पाहून आकाशांत पोहणाऱ्या सूर्याची आठवण सीताताईला होई. तोंडानें स्तोत्रें म्हणत पण मनानें मेघनाथाचें कौतुक करीत त्याचें पोहणें होईपर्यंत ती घांटाच्या पहिल्या पायरीवर पाण्यांत पाय बुडवून राही. मेघनाथ मधून मधून दम कोंडून पाण्यांत बुडत असे. तो पाण्यांत जाऊन दिसेनासा झाला कीं सीताताईचा जीव खालींवर होऊं लागे. आंतील एखाद्या विचित्र खडकांत तो अडकणार तर नाहीं ना, अशी तिच्या प्रेमळ मनाला शंका येई. वरून शांत दिसणाऱ्या अथांग जलाशयांतून कवीच्या स्फूर्तीप्रमाणें मेघनाथ एकदम वर उसळून आला कीं तिच्या सर्व कुशंकांचें धुकें वितळून जाई. पोहतां पोहतां मेघनाथ गाऊं लागला कीं जणूं काय सत्यलोकांतील सरोवरांत पोहणारा हंसच आपण पाहत आहों आणि त्यावर

अदृश्य स्वरूपानें विराजमान झालेल्या ब्रह्मदेवाचें गंभीर वेदपठणच आपल्या कानांवर पडत आहे असा तिला भास होई.

पण आतां सकाळीं लवकर स्नान केल्यामुळें चपलेला थंडी होईल म्हणून मेघनाथानेंही प्रातःस्नान सोडून दिलें. परलोकाचा मुशाफर मृत्यूच्या दरवाजांतून जसा एकटाच जड अंतःकरणानें जात असतो, त्याप्रमाणें सीताताई स्नानाला जाऊं लागली.

चपलेला लवकरच डोहाळे लागल्यामुळें तिचें जेवण शयनमंदिरांतच होऊं लागलें. तिच्या डोळ्यांतील पाण्यानें तहान व ओठांतील अमृतानें भूक शमत असल्यामुळेंच कीं काय मेघनाथही सीताताईच्या पंक्तीला नियमानें येईनासा झाला. पूर्वी भावाच्या थट्टामस्करीच्या बोलण्यांत सीताताईला जेवण सुखाच्या क्षणाप्रमाणें भराभर जात असे. पण आतां दुःखाच्या पळाप्रमाणें तिच्या हातांत प्रत्येक घांस रेंगाळूं लागला.

उठण्याबसण्याच्या बाबतींतही तोच अनुभव ! मेघनाथाला गाण्याची आवड असल्यामुळें व चपला सीतावन्संसारख्या वडील माणसांच्या पुढ्यांत गायला लाजत असल्यामुळें कैलासनाथाच्या डोंगरीवर फिरायला असो अगर वाड्यानजीकच्या रमणीय बागेंत बसायला असो, नवराबायको दोघेंच जाऊं लागलीं. मेघनाथ व चपला एखाद्या कुंजांत जाऊन बसलीं कीं सीताताई आपल्या महालाच्या खिडकींत उजव्या हाताच्या तळव्यावर डोकें टेकून आकाशाकडे उदास मुद्रेनें पाहत राही. एखाद्या मिश्ररागाप्रमाणें भासणारा नवराबायकोच्या हास्याचा मधुर स्वर तिच्या कानांना मात्र तापलेल्या तेलासारखा वाटे. चपलेची तान तर सुरीप्रमाणे तिचें हृदय भेदून जात असे. ती स्फुंदस्फुंदून आकाशाकडे पाहत राही व आपल्या मनाशींच म्हणे, "कैलासनाथा, या जगांत एकाला दुःख झाल्यावांचून दुसऱ्याला सुख मिळतच नाहीं का रे ?"

तिच्या क्षुब्ध हृदयांत तुमुल रणकंदन सुरू होई. एक मन सांगे, 'बाई, कुठेंही गेलें तरी पळसाला पानें तीनच. साऱ्या जगांत हेंच चाललें आहे. माया ही नदीप्रमाणें अधोवाहिनीच असावयाची. चपलेनें कांहीं मेघनाथाला जादूटोणा केला नाहीं. मेघनाथही कांहीं मुद्दाम तुझा अपमान करीत नाहीं. पण आम्रवृक्ष व लतिका यांचा संगम घडवून आणणाऱ्या वायुलहरींची लुडबुड नंतर त्या दोघांनाही त्रासदायकच वाटते ना ?' दुसरें मन म्हणे, 'तें कांहीं नाहीं. तूं आजपर्यंत मेघनाथाला तळहातावरच्या फोडाप्रमाणें वागविलें आहेस. मेघनाथ

कांहीं आतां लहान नाहीं. बायकोप्रमाणें बहिणीचीही त्यानें काळजी करायला नको का ? बायकोच्या तोंडाचा प्रत्येक शब्द झेलायला एका पायावर उभें असणारानें बहिणीशीं तोंडदेखलें तरी गोड बोलूं नये का ? पूर्वींचा तो मेघनाथ कुठें गेला ? पुरुषाचें प्रेम तेरड्याच्या रंगाप्रमाणें असतें हेंच खरें !'

या दोन्ही मनांचा झगडा सुरू झाला कीं न्यायाधीशाप्रमाणें त्यांच्या भांडणाचा निकाल करण्यासाठीं एक तिसरेंच मन उत्पन्न होई. आणि मोठ्या गंभीरपणानें उपदेश करूं लागे, 'समुद्राच्या दोन्ही किनाऱ्यांना भरती कधीं लाभत नाहीं. पृथ्वीच्या दोन्ही गोलार्धांना सूर्य एकदमच प्रकाशित करूं शकत नाहीं. मग बहीण व बायको यांच्यावर सारखेंच प्रेम एखाद्याला कसें करतां येईल ? बहीण आपल्या नवऱ्याला सोडून भावाच्या भजनीं लागेल का ? सूर्य उगवला म्हणजे चंद्र जसा निस्तेज दिसूं लागतो, त्याप्रमाणें संसारांतील जोडीदाराच्या प्रेमापुढें इतरांचें प्रेम फिक्कें पडतें. याला कोणी मदनाचा प्रभाव म्हणो अथवा निसर्गाचें आकर्षण म्हणो. मातेचें अगर बहिणीचें प्रेम पुरुषाला अपुरेंच वाटतें. आजपर्यंत मेघनाथानें तुझ्यावर प्रेम केलें तें खोटें नव्हतें. पण तुझ्या प्रेमापेक्षां निराळें असें उन्मादक प्रेम मिळाल्यावर त्याला पूर्वींसारखी तुझी आठवण होणार नाहीं. कांहीं झालें तरी 'बायकोचें प्रेम म्हणजे मद्य. बहिणीचें प्रेम म्हणजे पाणी.'

या तीन्ही मनांच्या युद्धांत सीताताईची पदोपदीं त्रेधा होऊं लागली. मेघनाथानें चपलेवर प्रेम करूं नये असें तिला मुळींच वाटत नव्हतें. मेघनाथानें चपलेशीं अबोला धरला असता तर आपल्या गळ्याची शपथ घालून ताईनें त्याला तिच्याशीं बोलायला लावलें असतें. मेघनाथानें बायकोला दूर लोटलें असतें, तर बहिणीनें मोठ्या प्रेमानें तिला जवळ ओढलें असतें. भावाचें भावजयीवर प्रेम असावें, अगदीं समुद्राप्रमाणें अथांग प्रेम असावें, पण त्या प्रेमांत आपल्यावरील प्रेमाची दर्यामें खसखस अशी स्थिति होऊं नये, एवढीच सीताताईची इच्छा होती. स्वतःभोंवतीं घिरट्या घालणारा चंद्र मिळाला म्हणून कांहीं पृथ्वी सूर्याला प्रदक्षिणा घालण्याचें आपलें व्रत टाकून देत नाहीं. आपल्या भावानेंही तसेंच करायला पाहिजे होतें, हा विचार पदोपदीं तिच्या मनांत उत्पन्न होई. बाहेर जायला दुसरा मार्गच नसल्यामुळें कारंजाचें पाणी जसें वर उचंबळून उडूं लागतें, त्याप्रमाणें आई, बाप, भाऊ वगैरे कोणीच नसल्यामुळें मेघनाथाची प्रेम करण्याची सर्व

शक्ति लग्न होईपर्यंत वहिणीच्याच दिशेनें जात होती. त्या प्रेमप्रवाहाला फांटा फुटल्यामुळें त्याचा उत्कटपणा आतां मंदावला. शिवाय चपलेचा स्वभाव तिच्या गळ्याहूनही गोड होता. तिचें हृदय तिच्या करुणगीतांमध्यें व्यक्त होणाऱ्या कोमल सुरांहूनही मृदु होतें. आपल्या गाण्याप्रमाणें रूपानेंही मनुष्याला तल्लीन करून सोडण्याचें सामर्थ्य देवानें तिला दिलें होतें. उत्तम नवें खेळणें मिळालें म्हणजे त्या नादांत बालक आईचीही आठवण जशी विसरून जातें, रसाळ काव्य हातांत पडलें कीं रसिकाची भूकतहान जशी हरपते, सुखस्वप्न पडूं लागलें कीं जागृतींतील सर्व गोष्टींचें स्मरण जसें बुडून जातें, त्याप्रमाणें चपलेच्या सहवासांत मेघनाथाची स्थिति झाली होती. प्रणयाच्या मदिरेनें तो इतका धुंद होऊन जात असे कीं त्याला इतर सर्व गोष्टींची विस्मृति पडे. सीताताईचें एकाकी हृदय किती व्याकुळ होऊन काळ कंठित असेल याची त्याला प्रिय हृदयाच्या सहवासांत मुळींच कल्पना येईनाशी झाली. बिचाऱ्या चपलेला तर नणंदेच्या हृदयांतील वादळाची यत्किंचितही जाणीव नव्हती. तिचें नवें जग तिच्या पतीच्या विविध मूर्तींनीं भरून गेलें होतें. त्या जगांतील सारी पुष्पसृष्टि त्याच्या बाहूंत अवतरली होती. पृथ्वीवरील साऱ्या नद्या त्याच्या वाणीच्या रूपानें तिला मंगल स्नान घालीत होत्या. तिचें स्वतःचें हृदयमंदिर द्वारकेप्रमाणें सुंदर व सोन्यानें सजलेलें असें होतें. पण ही सजावट सीताताईचें हृदयमंदिर भग्न करून आणली होती, हें मात्र तिच्या स्वप्नींही नव्हतें.

रामनवमीचा दिवस होता. राजवाड्यांत कोणीसें एक नव्या तऱ्हेचें फूल आणलें. तें फूल महिनेच्या महिने टवटवीत राहतें अशी त्याची ख्याति होती. मेघनाथानें तें फूल आरशासमोर अंबाडा बांधून कुंकू लावीत बसलेल्या चपलेच्या केसांत नेऊन खोंवलें. आरशांत फुलाचें प्रतिबिंब पडलेलें पाहून दचकून चपलेनें मागें वळून पाहिलें. मेघनाथाचे ओंठ व तिचे ओंठ यांचा तिच्या खांद्यावर संगम झाला. असलें न कोमेजणारें फूल आपल्या देवाला पाहिजे असा इतक्यांत सीताताईचा निरोप आला. केसांत घातलेलें फूल देवाला वाहणें योग्य नाहीं म्हणून मेघनाथानें फूल देवाला वाहायला योग्य नाहीं असें उत्तर धाडलें. नदीप्रमाणें निरोपही वाढतां वाढतां गढूळ होऊन जातो. 'फूल मिळणार नाहीं, तें देवाला वाहणें योग्य नाहीं,' वगैरे शब्द सीताताईच्या कानांवर गेले. सारा राजवाडा ज्या फुलाची वाखाणणी करतो, तें

आपल्या देवाला वाहण्याच्या लायकीचें नाहीं असें भावानें सांगून पाठविल्याबद्दल सीताताईला फार वाईट वाटलें. त्या दिवशीं तिच्या देवाची पूजा नव्या फुलाऐवजीं अश्रूंच्या फुलांनीं झाली व इच्छा नसतांही तिच्या हातून उपवास घडला. त्या नव्या फुलाबद्दल बक्षीस म्हणून चपलेनें मेघनाथाला एक नवें गाणें म्हणून दाखविलें. त्या गाण्याच्या रंगांत सीताताई जेवली कीं नाहीं याची चौकशी करण्याचें भानही मेघनाथाला राहिलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं एक उत्कृष्ट कारागिरीची अंगठी मेघनाथाला कोणीशी नजर केली. चपलेला हा सातवा महिना असल्यामुळें तिचें मन शक्य तितकें आनंदी ठेवण्याचा मेघनाथ प्रयत्न करी. त्यानें तत्काळ ती अंगठी नेऊन तिच्या बोटांत घातली. साऱ्या राजवाड्यांत त्या अंगठीच्या गोष्टी सुरू झाल्या तेव्हां कोठें सीताताईला तिची दाद लागली ! पूर्वी लहानसहान प्रत्येक गोष्ट आपणाला दाखविणाऱ्या मेघनाथानें एवढी सुंदर अंगठी आपणाला दाखवूं देखील नये याचें सीताताईला फार वाईट वाटलें. ती रात्र अश्रूंनीं आपली उशी ओलीचिंब करण्यांत तिनें घालविली.

दसऱ्याचें सोनें म्हणून एका कवीनें चपलाराणीसाहेबांना अतिशय आवडणाऱ्या एका चालीवर एक गीत रचून तें मेघनाथाला नजर केलें. दुसऱ्या दिवशीं पहांटे चपलेनें तें आपल्या गोड गळ्यानें पतीला म्हणून दाखविलें. त्या काव्याचा अर्थ वर गद्यांत कवीनें दिलेल्या प्रास्ताविक टीपेवरून ताडणें भाग होतें. यंत्राच्या नादीं लागून शेतीकडे दुर्लक्ष केलें कीं देश रसातळाला जातो, हा त्या गीताचा विषय होता. यंत्रें विजेनें चालत असल्यामुळें व राजकुटुंबांतील माणसांचीं काव्यांत जितकीं जास्त नांवें घालतां येतील तितकें मोठें बक्षीस मिळण्याची आशा असल्यामुळें या यांत्रिक शक्तीला कवीनें चपला म्हटलें होतें. मेघनाथ चपलेच्या मागून आकाशांत धांवत आहे व इकडे सीता ( सीता म्हणजे शेती अशी कवींनीं खालीं टीप दिली होती. तिचा खरेखोटेपणा कोशावरून कोणालाही कळून येईल. ) वाळून चालली आहे असें शेतीच्या हलाखीच्या स्थितीचें या गीतांत वर्णन केलें होतें. ‘ मेघनाथ चपलेच्या मागून धांवत आहे व सीता वाळून चालली आहे ’ या वाक्यांतील शेतीसंबंधींचा खोल अर्थ मेघनाथाला मुळींच कळला नाहीं. पण त्याच्या हृदयांत पश्चात्तापाची प्रचंड अग्निज्वाळा एकदम उफाळली व चपलेचें गाणें संपण्याच्या आधींच

तो सीताताईला भेटायला गेला. ताईच्या पायांवर डोकें ठेवायचें व तें अश्रूंनीं न्हाणून आतांपर्यंत तिच्याकडे झालेल्या दुर्लक्षाबद्दल क्षमा मागायची असा त्यानें विचार केला. तिच्या खोलीच्या दारांत जाऊन त्यानें हांक मारली 'ताई.'

खोलींतून उत्तर आलें नाहीं. आंत जाऊन तो मोठ्यानें म्हणाला, 'सीताताई.' दरवाजाकडे असलेलें आपलें तोंड सीताताईनें भिंतीकडे फिरविलें. ती एकही शब्द बोलली नाहीं. चपलेच्या गाण्याचे सूर मेघनाथाला परत महालांत बोल-वीत होते. सीताताई त्याच्याशीं एकही शब्द बोलायला तयार नव्हती. प्रेमानें प्रेम, त्याप्रमाणें अभिमानानें अभिमान वाढतो. सीतेप्रमाणें मेघनाथाच्याही मनावर अहंकाराचा पगडा बसला. ताई बोलत नाहीं तर आपल्याला तरी इथें राहून काय करायचें आहे, असा विचार करून तो परत जाण्याकरितां दरवाजा-कडे वळला. इतक्यांत कुठूनसा कवड्याचा करुण स्वर त्याच्या कानांवर पडला. 'उठ ग सीते, कवडा पोर पोर.' ते सूर मेघनाथाच्या हृदयांत घुमूं लागले. अहंकारावर प्रीतीनें विजय मिळविला. मेघनाथानें तोंड फिरवून सद्गदित कंठानें हांक मारली, 'ताई, सीताताई, ताई उठ.' उत्तरादाखल शब्द नाहीं, हात हालला नाहीं, निःश्वास देखील नाहीं. अहंकाराला क्रोधाची सांथ मिळाली. मेघनाथ झटक्यानें खोलींतून निघून गेला. कवडा बाहेर ओरडतच होता 'उठ ग सीते, कवडा पोर पोर.'

त्या दिवसापासून बहीणभाऊ एकमेकांशीं मुळींच बोललीं नाहींत. शब्द ओंठापर्यंत येत, अश्रु डोळ्यांपर्यंत येत, पण अभिमान त्यांना मागें खेंचून नेत असे. मेघनाथ कांहीं झालें तरी आपला धाकटा भाऊ, त्याची चूक आपण पोटांत घालायला पाहिजे असें अंथरुणावर विचार करतां करतां सीताताईला वाटे व ती त्याच्या महालाकडे जायला निघे; पण लगेच या वेळीं तो त्या तालेवार पोरीची पूजा करीत बसला असेल, त्या कवटाळिणीपुढें त्याला आपली कवडीचीही किंमत वाटणार नाहीं, असा विचार मनांत येऊन ती आपलें पाऊल मागें घेई. सीताताई कांहीं झालें तरी आपली वडील बहीण, तिनें आजपर्यंत आपल्याला पोटच्या मुलाप्रमाणें वागविलें आहे, तिच्यापुढें कसला अभिमान धरायचा, असें वाटून मेघनाथ तिची क्षमा मागण्याचा निश्चय करी. पण अहंकाराचें पिशाच्च तत्काळ जागें होऊन तो निश्चय ढांसळून टाकी.

'तूं कुणाची' म्हणून त्यानें चपलेला विचारलें कीं ती त्याच्या खांद्यावर मान टाकी व बालक मातेकडे ज्या विश्वस्त व प्रेमळ दृष्टीनें पाहतें त्या दृष्टीनें त्याच्याकडे पाहत राही. 'मी कोणाचा' म्हणून मेघनाथानें चपलेला विचारलें, कीं ती त्याचें मस्तक आपल्या स्कंधावर घेई व त्याला अशी घट्ट मिठी मारी, कीं प्रत्यक्ष काळालादेखील तिच्या बाहुपाशाच्या दृढतेचा हेवा वाटला असता. चपलेचा हा लाडकेपणा, ही एकनिष्ठा, हें गोड परावलंबन सीताताईंत मेघनाथाला कधींही आढळलें नव्हतें. त्याच्या पुरुषी अहंकाराचें समाधान चपलेच्या आत्मसमर्पणानें झालें होतें. बहिणीवरील प्रेम त्याला पुढें ओढूं लागलें कीं हा अहंकार त्याला पायबंद घाली. शेवटीं मध्येंच शरण जाण्यापेक्षां भाऊबीजेच्या दिवशीं द्यायची ओंवाळणी ताईला क्षमायाचनेच्या अश्रूंत भिजवून द्यावी असें त्यानें ठरविलें. भाऊबीजेला मेघनाथ आपल्याकडे आला कीं 'गेलें तें गंगेला मिळालें' असें सांगून मेघनाथाच्या पाठीवरून हात फिरवायचा नि चपलेला मायेनें जवळ घ्यायची असें सीताताईनेंही आपल्या संतप्त मनाला बजावलें.

वीस युगांप्रमाणें भासणारे वीस दिवस संपून एकदांची भाऊबीज उगवली. आज संध्याकाळीं ताई आपल्याशीं पूर्वीप्रमाणें प्रेमानें बोलणार, भाऊ आपली पूर्वीप्रमाणें मायेनें थट्टा करणार म्हणून मेघनाथ व सीताताई मनांतल्या मनांत आनंदित झालीं होतीं. त्या आनंदाच्या सागरांत मेघनाथाचें मन पोहत असतांना चपला त्याला हळूच म्हणाली,

"माझी एक हौस पुरविणें होईल का?"

"मला सोडून जाण्याखेरीज दुसरे कोणतेही डोहाळे लागले असले, तरी मी ते पुरवीन."

"मला गडे होडींत बसून फिरावेंसें वाटतें आहे आज."

"सीतेला गंगेंत स्नान करण्याचे डोहाळे आठवले न् त्याचा परिणाम रामानें तिला टाकून देण्यांत झाला, हें आठवतें आहे ना?"

"पण रामापेक्षांही अधिक मायेचें माणूस मला मिळालें असलें तर?"

"समुद्रावर फिरण्याचे डोहाळे कांहीं वाईट नाहींत म्हणा. तुला होणारा मुलगा उद्यां समुद्रावर स्वामित्व गाजविणार असाच याचा अर्थ होतो."

अर्ध्या घटकेंत सर्व तयारी होऊन कैलासनाथाच्या डोंगरीलगतच्या समुद्राकडे खाशा स्वाऱ्या निघून गेल्या. सीताताईनें आज भावासाठीं मुद्दाम स्वतः

स्वयंपाक केला होता. अकरा झाले, बारा झाले तरी मेघनाथाचा पत्ता नाहीं. चौकशीअंतीं मेघनाथ नि चपला कैलासनाथाच्या डोंगरीवरच राहिलीं आहेत व संध्याकाळपर्यंत परत येणार नाहींत असें तिला कळलें. भावासाठीं मुद्दाम केलेले पदार्थ बाजूला सारून सीताताई तोंडांत पाण्याचा थेंबही न घालतां आपल्या खोलींत जाऊन रडत बसली.

मेघनाथ दुपारीं जेवायला राजवाड्यांत परत जायचें अशा बेतानें गेला होता खरा; पण होडींत बसल्यानंतर चपला गाऊं लागली तेव्हां वेळ किती झरझर गेला याचें त्याला भानही राहिलें नाहीं. चपलेची हौस तृप्त न झाल्यामुळें दुपारचा मुक्काम कैलासनाथाच्या देवळांतच करण्याचें त्यानें ठरविलें. पुन्हां संध्याकाळीं होडींतून फिरण्याचा कार्यक्रम सुरू झाला. एका बाजूला डोंगरीवर कैलासनाथाच्या देवळाचें सोन्याचें शिखर व दुसऱ्या बाजूला मावळणाऱ्या सूर्यामुळें सोनेरी झालेली पश्चिम दिशा यांच्याकडे पाहत आणि समुद्राच्या लाटांच्या तालावर चाललेलें गाणें ऐकत मेघनाथ होडी वल्हवीत होता. आकाशांत समुद्राच्या लहरींकडून ओंवळणी घेण्याकरितां द्वितीयेचा चंद्र उगवला. तरीही मेघनाथ व चपला यांना नौकाविहार पुरा करावासा वाटला नाहीं. शेवटीं दूर उभ्या असणाऱ्या हुजऱ्यानें पाण्यांत भिजत येऊन अंधार पडूं लागला असें भीतभीत सांगितलें तेव्हां मेघनाथानें होडी किनाऱ्याला लावली. आकाशांतील चंद्रकोर पाहण्याकरितां नवराबायकोनीं सहज वर पाहिलें तों कैलासनाथाच्या डोंगरीवर कोणी तरी माणूस उभें असल्याचा त्यांना भास झाला. निसर्गाकडून ओंवाळून घेण्याकरितां देवी पवित्रता तर त्या सुंदर जागीं येऊन उभी राहिली नाहीं ना, असा विचार मेघनाथाच्या मनांत आला. त्याच वेळीं कवड्याचा तो चिरपरिचित करुण स्वर त्याच्या कानांवर पडला. 'उठ ग सीते, कवडा पोर पोर.'

चपलेनें त्याचे हे शब्द ऐकले. 'याचा अर्थ काय ?' तिनें हंसत हंसत विचारलें.

"अर्थ त्या कवड्याला माहीत. तो पाहा सारखा कसा ओरडत आहे. तो म्हणे नेहमीं 'उठ ग सीते, कवडा पोर पोर' असें म्हणतो."

"पण ही सीता कोण ?" चपलेनें विचारलें.

मेघनाथ स्तब्ध राहिला. सीता या शब्दानें त्याला बहिणीची आठवण

झाली. आज दुपारीं आपण गेलों नाहीं म्हणून तिला फार वाईट वाटलें असेल हें आतां त्याच्या ध्यानांत आलें. मेघनाथ बोलत नाहीं असें पाहून मागें असलेला हुजऱ्या धीटपणानें म्हणाला

" मी सांगूं का राणीसाहेब ? "

" हं, सांग पाहूं ! "

" ही सीता त्या कवड्याची बहीण. एकदां कवड्यानें बायकोला व बहिणीला शेरशेर भात देऊन त्याचे पोहे करायला सांगितलें. बायकोचे पोहे शेराचे शेर झाले; बहिणीचे कमी भरले. बायकोचे पोहे मापाला जास्त भरले तरी ते तांबडे नि अर्धवट सडलेले होते आणि बहिणीचे कमी भरले तरी ते पांढरे स्वच्छ न् चांगले सडीक होते, हें कांहीं कवड्याच्या लक्षांत आलें नाहीं. तो आपल्या बहिणीवर रागावला न् म्हणाला, ' सीते, माझ्यावर तुझी खरी मायाच नाहीं. खरी माया हिची आहे. म्हणून हिचे पोहे अधिक झाले.' सीतेच्या जिव्हारीं तें बोलणें लागलें. ती एकदम म्हणाली, ' धरणीमाते, बहिणीची माया बायकोच्या मायेपेक्षां जर तिळभरही कमी नसेल, तर तूं मला आपल्या पोटांत घे. ' धरणी तत्काळ दुभंगली न् सीता आंत गेली. सीता नाहींशी झालेली पाहून कवड्याचे डोळे उघडले. तेव्हांपासून तो सारखा तिला ' उठ ग सीते, कवडा पोर पोर ' म्हणून हांका मारीत असतो. गोष्ट अगदीं खरी आहे बघा, राणीसाहेब. पावसाळ्यांत कवड्याच्या बहिणीचें पांढरें भात न् त्याच्या बायकोचें तांबडें भात उगवलेलें दिसतेंच ना ? '

मेघनाथ हुजऱ्याची गोष्ट मन लावून ऐकत होता. त्याच्या अंतःकरणाला पश्चात्तापाच्या इंगळ्या लागल्या. कवड्याचा स्वर एकसारखा त्याच्या कानांवर पडत होता. कवड्याच्या गोष्टीचेंच त्याचें हळवें मन चिंतन करीत होतें. डोंगरी चढून जातांच तो हुजऱ्याला म्हणाला,

" तूं देवळाकडे जा; आम्ही त्या खडकावर उभें राहून चांदण्यांत दिसणारी समुद्राची शोभा थोडा वेळ पाहतों व मग देवळाकडे येतों ! "

" पण सोबतीला—" हुजऱ्या हळूच म्हणाला.

" सोबत या चंद्राच्या कोरीची आहे ना ? जा तूं." मघाशीं डोंगरीवर दिसलेलें माणूस सीताताई तर नसेल ना, असा पुसट संशय मेघनाथाला आला होता. आपली व ताईची गांठ आतां हुजऱ्यादेखत पडणें बरें नाहीं असें

वाटूनच हुजऱ्याला देवळाकडे पाठविण्याची ही युक्ति त्यानें काढली होती. हुजऱ्या देवळाकडे चालूं लागला व नवराबायको समुद्राकडील उंच कड्याकडे आलीं. अगदीं जवळ येतांच त्याच्यावर कोणी तरी उभें आहे असें दोघांनाही वाटलें. कैलासनाथाच्या देवळाकडे तोंड करून व हात जोडून ती व्यक्ति उभी राहिली होती. मेघनाथाचें हृदय धडधडूं लागलें. चपलेला मागें टाकून तो खडकाकडे धांवणार, इतक्यांत 'देवा, माझ्या भाऊरायाला सुखी ठेव,' हीं अक्षरें त्याच्या कानांवर पडलीं. तो ओळखीचा आवाज कानांवर पडतांच त्याच्या काळजांत चर्र झालें, डोळ्यांपुढें क्षणभर अंधारी आली. डोळे उघडून खडकाकडे तो धांवत गेला. पण तेथें काय होतें ? खालीं समुद्रांतील खडकावर कोणी तरी धाडकन् कोसळल्याचा आवाज तेवढा त्याला ऐकूं आला. लगेच 'उठ ग सीते, कवडा पोर पोर.' हें कवड्याचें करुणगीतही त्याच्या कानांवर पडलें. त्याला काय करावें हेंच कळेना. त्यानें मागून येणाऱ्या चपलेकडे पाहिलें. डोंगरीच्या पायथ्यावर आपटणाऱ्या लाटा 'भाऊराया, भाऊराया' म्हणून आपल्याला हांका मारीत आहेत असें त्याला वाटलें. 'ताई, सीताताई, सीताताई' असा आक्रोश करीत त्यानें खडकावरून एकदम खालीं उडी टाकली. चपलेनें त्याला धरण्याकरितां हात पुढें केला होता; पण तिच्या हाताला मेघनाथ लागला नाहीं. मेघनाथानें उडी टाकलेली पाहतांच चपलेला विजेचा भयंकर धक्का बसल्यासारखें झालें. तिच्या पोटांत विलक्षण कळा येऊं लागल्या. आधींच तिचे दिवस भरत आले होते; त्यांत ह्या भयंकर धक्क्याची भर पडली.

मेघनाथाची राणी त्या खडकावरच एका पुत्राची माता झाली. त्या अर्भकाकडे चपलेनें क्षणमात्रच पाहिलें. खालच्या खडकावर पडून चिंधड्या झालेल्या मेघनाथाचें चित्र तिच्या कल्पनेनें तिच्या डोळ्यांपुढें उभें केलें. त्या अर्भकाचा एकच मुका घेऊन तिनें 'नाथ' म्हणून हांक मारली व त्या खडकावरून खालीं उडी टाकली. आकाशांतील द्वितीयेची चंद्रकोर याच वेळीं मावळली ! मात्र 'उठ ग सीते, कवडा पोर पोर' हें कवड्याचें आक्रंदन डोंगरीवर चाललेंच होतें.

१९२९

# आईचा शब्द

५

" जाणार ! मी जाणार ! " आई जागीच होती ! टोनीच्या या शब्दां-सरशीं तिचा सारा जीव कानांत गोळा झाला.

टोनी या कुशीवरून त्या कुशीवर वळला. ती चुळबुळ तिच्या कानांवर पडली. बाकी सर्व शांत झालें होतें.

तिचें काळीज अजून धडधडत होतें.

" जाणार ! मी जाणार ! " हे शब्द जागा झालेला टोनी स्वतःशीं बोलला असावा असें तिला प्रथम वाटलें होतें.

पण टोनी पुढें कांहींच बोलला नाहीं. खोलींत पुन्हां शांतता पसरली. जला-शयाच्या पृष्ठावर एकदोन बुडबुडे उठावेत नी पुन्हा सर्व निःस्तब्ध व्हावें, तसें झालें. आईच्या काळजांतील धडधड थांबली.

मांजराच्या पावलांनीं ती टोनीच्या बिछान्यापाशीं गेली. खालीं वांकून तिनें पाहिलें. अंधारांत अगदीं अंधुक दिसत होतें. कान देऊन ती ऐकूं लागली. टोनी घोरत होता.

घोरण्याचा तो विचित्र कर्णकटु आवाज ! पण या वेळीं अत्यंत मधुर वाटला तो तिला. ती आनंदून स्वतःशीं म्हणाली, " त्याचे ते मघाचे शब्द— 'जाणार ! मी जाणार !'—छेः तो झोंपेंत ओसणला असावा !"

ती स्वतःशींच हसली. लहानपणापासून टोनीला अशी ओसणण्याची संवय होती. सातआठ वर्षांचा असतांना कितीदा तरी तो झोंपेंत तक्रार करी—'बघ

ना आई ! हा पिटर मला खेळायला बंदूक देत नाहीं !' नी परवांचें त्याचें तें बडबडणें–'अज्ञात सुंदरी येशिल तूं गे केव्हां ?'–टोनीला कविता करायचा विलक्षण नाद आहे हें आपल्याला ठाऊक होतें म्हणून बरें ! नाहीं तर पोराला वेड लागलें असेंच वाटलें असतें आपल्याला ! ही ओळ दोनतीन वेळां तरी म्हटलीन् त्यानें ! तेव्हां आपल्याला वाटलें–टोनी जागा होऊन कुठल्या तरी नव्या कवितेचीं यमकें जुळवतोय ! आपण मुद्दाम जवळ जाऊन पाहिलें—

तो झोंपेंतच ती ओळ गुणगुणत होता ?

मोठा विलक्षण नाद आहे त्याला कवितेचा ! उद्यां तो मोठा झाल्यावर कवि म्हणून त्याचें नांव सगळीकडे गाजूं लागेल, त्याच्या कवितांच्या पुस्तकांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघूं लागतील, एका प्रसिद्ध कवीची आई म्हणून लोक आपल्याला ओळखूं लागतील—कुणी सांगावें ? महाकवि म्हणून त्याला नोबेल प्राइजसुद्धां मिळेल !

मनोरथांच्या गतीला काळ आणि स्थळ हीं दोन्हीं अडवूं शकत नाहींत ! त्यांतून तो आईचा मनोरथ !

नाहीं तर 'ट' ला 'ट' जुळविणारा आजचा सोळा वर्षांचा टोनी पुढें नोबेल प्राइझ मिळवील ही कल्पनासुद्धां त्या शहरांतील दुसऱ्या कोणालाही त्या वेळीं सुचली नसती ! उलट आईच्या या मनोराज्याची जाणीव झाली असती तर प्रत्येकजण म्हणाला असता—"नोबेल प्राइझ ही फार लांबची गोष्ट आहे. उद्यांचा दिवस कसा उजाडतो याचा जिथें भरंवसा नाहीं–आज रात्रीं आकाशांतून सुंदर चांदणें पडणार आहे कीं भयंकर बाँब पडणार आहेत या काळजीनें जिथें सारें शहर काळवंडून गेलें आहे–तिथें आणखी वीस वर्षांनीं कुणाचा किती उत्कर्ष होईल याचें मनोराज्य कोण करीत बसणार ? मघाशींच रेडिओवर बातम्या सांगणारी ती बाई म्हणाली, 'शत्रु अगदीं जवळ आला आहे. आपलें सैन्य त्याच्याशीं शौर्यानें लढत आहे. पण शत्रूची शक्ति फार मोठी आहे... त्याच्यापाशीं खूपखूप विमानें आहेत !...' अशा स्थितींत वीस घटकांनीं काय होईल हें चेरोलासुद्धां सांगतां आलें नसतें; मग वीस वर्षांनंतरची गोष्ट हवी कशाला ?"

आई परत आपल्या बिछान्यावर येऊन बसली तेव्हां तिच्याही मनांत हेच विचार आले–टोनी पुढें मोठा कवि होईल म्हणून मघाशीं आपण क्षणभर

आनंदून गेलों, पण आईनें मुलाविषयीं केलेल्या आशा सफल व्हाव्या असें आजचें जग आहे कुठें ?

एक–दोन–तीन–चार–

चार मुलांच्या भावी आयुष्यांविषयीं आपण मोठमोठे मनोरे उभारले नी तीं चारही मुलें आपल्याला सोडून गेलीं–ते मनोरे मातीला मिळाले.

एक–दोन–तीन–चार–त्या आठवणी—जणूं कांहीं तिला कोणी जीव घेण्याकरितां विजेच्या खुर्चीवर नेऊन बसवीत होतें !

एक–दोन–तीन–चार—

मातृहृदयाच्या असल्या जखमा कधीं बऱ्या होतात का ? स्मृतीचा नुसता स्पर्श झाला तरी त्या ठणकूं लागतात.

या साऱ्या मुलांसाठीं तिनें रात्रीचा दिवस केला होता, रक्ताचें पाणी केलें होतें; पण—

तिच्या डोळ्यांपुढून गेल्या सोळासतरा वर्षांचा चित्रपट झरझर सरकूं लागला–एका लढाईनें आपल्या पतीचा बळी घेतला. आपल्या मुलांपैकीं कोणावरही तसला भयंकर प्रसंग येऊं नये म्हणून आपण एकालाही लष्करी शिक्षण घेऊं दिलें नाहीं. अँड्र्यूला डॉक्टर केला, जॉर्ज एंजिनिअरिंगकडे गेला, क्रिस्तोफर आणि पिटर हेही—

पण हीं चारही मुलें आपल्याला सोडून गेलीं. मृत्यूला चोरी करतां येऊं नये म्हणून हे चार हिरे आपण त्याच्यापासून लपवून ठेवले–हृदयाच्या कपाटांत मायेचें पांघरूण घालून त्यांना दडविलें, पण—

डॉक्टर झालेला अँड्र्यू परदेशीं गेला—गेला तर गेला ! तेथें कुठल्याशा भयंकर तापावर औषध शोधून काढण्याचे प्रयोग करायचें त्याला काय कारण होतें ? त्या सांसर्गिक तापानें तो तेथेंच—

त्याचें शेवटलें दर्शनसुद्धां आपल्याला झालें नाहीं !

एंजिनियर झालेल्या जॉर्जला विमानांचा नाद लागला. “ जॉर्ज, कसलेंही धाडस करूं नकोस ! आईच्या गळ्याची शपथ आहे तुला ! ” असें आपण त्याला वारंवार बजावलें होतें; पण—

पुरुषाच्या पराक्रमाला स्त्रीच्या प्रेमाची कल्पनाच येत नसावी. नाहीं तर जॉर्जनें आईचा शब्द खास ऐकला असता ! कुठलेंसें रेकॉर्ड मोडण्याच्या नादांत तो प्राणाला मुकला !

पांच मुलगे म्हणजे पांच प्राण होते आपले. पहिल्याचा बळी शास्त्रानें घेतला, दुसऱ्याचा यंत्रानें घेतला—

क्रिस्तोफर नि पिटर ! आवळेजावळे भाऊ ! कोठल्याही शास्त्रानें, कसल्याही यंत्रानें आपल्यापासून त्यांना हिरावून घेऊं नये म्हणून आपण डोळ्यांत तेल घालून जपत होतों. पण—

दोघांनाही लहानपणापासून वर्तमानपत्रांचा भयंकर नाद. पुढें दोघेही चांगले संपादक होतील अशी नेहमीं आपल्याला आशा वाटे. दोघे दोन बाजू घेऊन भांडायला लागले म्हणजे त्यांना गप्प करतां करतां अगदीं पुरेवाट होई आपली !

मोठे झाल्यावरही दोघे एकसारखे भांडत असत. एक म्हणे–' आपल्या देशाला समाजवादच हवा ! ' दुसरा म्हणे–' समाजवाद म्हणजे अडाणी बहुमताचें राज्य ! छे: ! आपली जुनी राज्यपद्धतिच फार चांगली आहे. ' त्याच्या या वादाचा कंटाळा येई आपल्याला. पण त्या वादाच्या रूपानें मृत्यु आपल्या घरांत शिरला आहे याची मात्र आपल्याला कधींही कल्पना आली नव्हती.

एके दिवशीं देशांत यादवी सुरू झाली. त्या धामधुमींत ते दोघेही मारले गेले.

एक–दोन–तीन–चार—

मृत्यूनें आपल्या काळजाचे चार लचके तोडले; पण अजून आपण जिवंत आहों. होय, अजून टोनी आहे आपल्यापाशीं. आंधळ्याची काठी, भिकाऱ्याचें धन–कोणी कांहीं म्हणो, पण टोनीला आपण कुठें-कुठें जाऊं देणार नाहीं एक क्षणभरसुद्धां !

झोंपलेल्या टोनीकडे तिनें वात्सल्यानें भरलेल्या दृष्टीनें पाहिलें.

तिच्या मनांत भावनांचें वादळ उठलें होतें. लढाईच्या रूपानें एक क्रूर राक्षसीण आपल्या शहराच्या दारांत येऊन उभी राहिली आहे. तोफांचे ते आवाज— छे: ! तोफा कसल्या ? त्या राक्षसिणीचें क्रूर हास्य आहे तें. ती विमानांची अधिकाधिक भयंकर वाटणारी घरघर—जणूं कांहीं दांतओंठ खात ती राक्षसीण तरुण माणसांवर झडप घालायला येत आहे, असा भास होतो त्या वेळीं !

पण या कृत्येला टोनीच्या केंसालासुद्धां धक्का लावूं देणार नाहीं आपण. शहरावर बॉंब पडायला लागले, तर खालच्या तळघरांत अगदीं सुरक्षित राहूं आपण दोघें. तळघरांत सारेंसारें सामान नेऊन ठेवलेंय ! कश्शाची म्हटल्या कश्शाची आपल्याला अडचण पडणार नाहीं. टोनी लहान होता तेव्हां त्याला पोटाशीं धरूनच आपण वाढविला, थंडीवाऱ्यापासून आपण त्याचें रक्षण केलें.

जगाच्या दृष्टीनें तो आतां सोळा वर्षांचा झाला आहे; पण आमच्या दृष्टीनें— आईच्या दृष्टीनें—छे: ! आईला आपला मुलगा नेहमीं लहानच दिसतो. त्यांतून हा तर पांच मुलांतला उरलेला एकुलता एक ! आतां त्याला क्षणभरसुद्धां विसंबून चालायचें नाहीं आपल्याला. मागें प्रत्येक वेळीं मृत्यूनें आपल्यावर मात केली, पण आतां मात्र आपण मृत्यूचा पराभव केला पाहिजे. शहरावर बॉंब पडोत किंवा आणखी कांहीं अनर्थ ओढवो ! स्पिरिटमध्यें घालून फुलें ताजीं ठेवतात ना ? तस्सें आपण तळघरांत टोनीच्या प्राणांचें रक्षण करणार.

" आई..." अशी टोनीची हांक ऐकूं आली नसती तर तिची ही विचार-मालिका किती लांबत राहिली असती कोणाला ठाऊक !

" काय बाळ ? " असा मृदु स्वरानें प्रश्न करीत ती त्याच्याजवळ गेली.

" तूं जागीच आहेस अजून ? "

" म्हाताऱ्या माणसांना फार झोंप येत नाहीं, बाळ ! "

" मग मीही म्हातारा झालोंय् म्हणायचा ! "

" असें वेड्यासारखें बोलूं नये, टोनी ! "

" खरेंच सांगतों आई ! कित्ती कित्ती दिवस झाले. मलाही चांगली झोंप येत नाहीं ! नुकते बारा वाजले असतील; पण पुन्हा डोळे मिटावेत असें वाटतच नाहीं बघ ! "

" कसलें तरी स्वप्नबिप्न पडलें असेल तुला ! "

" एक भयंकर स्वप्न पडलें होतें खरें ! पण त्यानें कांहीं घाबरून गेलों नाहीं मी ! त्या स्वप्नांत किनई आमच्या शाळेवर बॉंब पडले होते नी माझ्या वर्गातलीं सारीं मुलें जमिनीवर जखमी होऊन पडलीं होतीं. माझा सोबती तो जिम्–त्याचें तोंड असें रक्तबंबाळ झालें होतें म्हणतेस—"

टोनीच्या तोंडावर हात ठेवीत आई म्हणाली, "असें कांहीं अभद्र बोलूं नये बाबा ! स्वस्थ नीज कसा बघूं आतां ! "

" जरा रेडिओ तरी लावून पाहतों ग ! लढाईची काय नवीन बातमी आहे ती—"

टोनी अर्धवट उठला. पण त्याला आईनें पुन्हां अंथरुणावर निजविलें. जणूं कांहीं तो आजारी असून त्यानें पावसांत जाण्याचा भलताच हट्ट धरला होता !

टोनीच्या केसांवरून मायेनें हात फिरवीत आई म्हणाली, " टोनी, मुलें मोठीं झालीं म्हणजे तीं आईची माया विसरतात का रे ?"

आपलें डोकें तिच्या तळहातावर घांशीत तो उद्गारला, " कांहीं तरी बोलूं नकोस आई. मीं आतांपर्यंत तुझा शब्द कधीं तरी मोडला आहे का ? सांग ना, आई—"

त्याला कुरवाळीत ती म्हणाली, "नाहीं, कध्धीं नाहीं ! माझा बाळ आहेच तसा शहाणा ! टोनी, आतां तुझ्याशिवाय मला—"

तिचा स्वर एकदम सद्गदित झाला. तिनें आपलें वाक्य पुरें केलें नाहीं. पण त्या अपुऱ्या वाक्यांत तिच्या मातृहृदयाला झालेल्या त्या चार भयंकर जखमा टोनीला स्पष्ट दिसल्या.

आवंढा गिळून आई म्हणाली, "टोनी, तूं लहान होतास ना ? तेव्हां मी गाणें म्हणायला लागलें कीं तुला हां हां म्हणतां झोंप येत असे ! आतांसुद्धां तसाच—"

" पण आई, मी लहान नाहीं आतां !"

" कोणीं सांगितलें हें तुला ? तूं अजून लहान आहेस—अगदीं कुक्कुबाळ आहेस ! कांहीं कांहीं कळत नाहीं तुला ! म्हणून आई सांगेल तें मुकाट्यानें ऐकायचें ! "

" पण आई—"

" आईचा शब्द मुलानें मोडायचा नसतो. निदान एकुलत्या एक मुलानें तरी ! "

टोनी निरुत्तर झाला.

आई गाणें गुणगुणूं लागली. एक गोड अंगाई–गीत होतें तें ! त्याची पहिली ओळ ऐकतांच टोनी उद्गारला, " हें गाणें नाहीं बुवा आपल्याला आवडत. आई, आपलें राष्ट्रगीत येतें ना तुला ? तें म्हण कीं !"

राष्ट्रगीत ! मातृभूमीचें गीत !...'तुझ्यासाठीं आम्ही हसत आपले प्राण देऊं !' ही त्यांतील पहिली ओळ ! हें गीत टोनीला ऐकवायचें ?

छेः ! आईच्या तोंडून कांहीं केल्या राष्ट्रगीताचे शब्द निघेनात. ती अंगाई-गीतच गुणगुणत राहिली.

सकाळीं चहा घेऊन आई टेबलापाशीं आली, पण टोनीचा कोठेंच पत्ता नव्हता; काल संध्याकाळीं आपल्या शाळासोबत्यांना भेटून तो घरीं परत आला, तेव्हां आई त्याला म्हणाली होती, "मला सांगितल्याशिवाय आतां घराबाहेर-सुद्धां जायचें नाहीं हं, टोनी. दिवस फार वाईट आहेत. बाहेर गेलेलें माणूस

पुन्हा पाहायला मिळतें कीं नाहीं..." बोलतां बोलतां आईच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले होते. त्या अश्रूंमुळेंच टोनीनें तिच्या म्हणण्याला रुकार दिला होता.

आणि आतां आई मनांत म्हणत होती–माझा शब्द मोडून तो बाहेर गेला असेल ? छे: ! मग कुठें ग्रें ?

रेडिओचा अस्पष्ट आवाज तिच्या कानांवर पडला. ती धांवतच आपल्या पतीच्या खोलीकडे गेली.

टोनी दार लोटून एकाग्रतेनें रेडिओ एकत बसला होता. बातम्या सांगणारी बाई म्हणत होती—'मारूं किंवा मरूं अशा ईर्ष्येनें आपले सैनिक लढत आहेत. पण लवकर मदत मिळाली नाहीं, तर त्यांना माघार घ्यावी लागेल. देशांतील प्रत्येक तरुणानें मिळेल तें शस्त्र हातांत घेऊन—'

आईनें हळूच दार उघडून पाहिलें. टोनी भिंतीवरल्या आपल्या पित्याच्या फोटोकडे मोठ्या भक्तीनें पाहत होता. त्या फोटोच्या जवळच त्याची स्मृति म्हणून एक बंदूक टांगलेली होती.

टोनीनें हात वर केला. काय करणार होता तो ? पुन्हा हात खालीं करून तो त्या बंदुकीकडे एकसारखा पाहूं लागला.

टोनीची ती दृष्टि पाहून आईला आश्चर्य वाटलें. कविता करायची लहर आली म्हणजे त्याच्या नजरेंत अशीच विचित्र एकाग्रता येई.

रेडिओवरील बाई म्हणत होती–'मातृभूमि साऱ्या सुपुत्रांना विनंती करीत आहे–आपल्यावर विमानहल्ले केव्हां होतील याचा नेम नाहीं आतां ! तरुणांनो, माझें रक्षण करा. माझ्या असंख्य लहान मुलांबाळांचें रक्षण करा. तुमची आई तुम्हांला निर्वाणीची साद घालीत आहे–तिच्या हाकेला 'ओ' द्या ! तिच्या—'

आईला हें ऐकवेना ! झटकन् पुढें होऊन तिनें रेडिओ बंद केला. एखाद्या गाण्यांत रंगून गेलेल्या मनुष्याला तें मध्येंच बंद झाल्यावर जसा धक्का बसावा, तशी टोनीची स्थिति झाली. पुन्हां रेडिओ सुरू करण्याकरितां त्यानें हात पुढें केला. पण आईनें तो मध्येंच धरला.

टोनी काकुळतीनें म्हणाला, "आई, आई ! आणखी जरा ऐकूं दे ग मला ! आणखी जरा...माझ्या आईचा शब्द—"

"तुझी आई मी आहें ! ती रेडिओवरची बाई नाहीं !"

"आई, तूं माझी आई आहेस हें खरें ! पण आणखीही एक आई आहे मला. ती आई मला बोलावतेय्—"

" ती खरी आई नाहीं ! तिला आईच्या हृदयाची कल्पना नाहीं ! टोनी, कुठली आई ' तूं लढायला जा ' असें मुलाला म्हणेल ? आईच्या तोंडांतून नेहमीं आशीर्वादच निघतात. पण ही तुझी दुसरी आई—ही रेडिओवरून बोलणारी बाई–ही तुला शाप देतेय्. तुला मृत्यूच्या मुखांत—"

आईला पुढें बोलवेना ! टोनीचा हात घट्ट धरून ती खोलीबाहेर आली.

दोघेंही चहाच्या टेबलापाशीं आलीं. आईनें चहाचा पेला टोनीच्या हातांत दिला. पण तो पेला टोनीच्या हातांत तसाच राहिला.

आई त्याच्याकडे भावपूर्ण दृष्टीनें पाहत म्हणाली, " कसला विचार करतोयस् एवढा ? "

" माझ्या वर्गांतलीं मुलें एव्हांना गेलींसुद्धां असतील !"

" कुठें ? "

" स्वयंसेवक म्हणून काम करायला—लढायला ! मी सुद्धां येईन असें वचन दिलें होतें मीं त्यांना ! आई, मी जाणार !"

त्याच्या पाठीवरून हात फिरवीत आई म्हणाली, " मी तुला जाऊं देणार नाहीं. माझ्या जीवांत जीव असेपर्यंत..."

" पण आई, माझा शब्द—"

" आणि माझा शब्द ? टोनी, आईच्या शब्दाची किंमत जगांतल्या कुठ-ल्याही गोष्टीपेक्षां अधिक आहे अशी कविता तूंच लिहिली होतीस ना ? "

टोनी निरुत्तर झाला. पण त्याचे ओंठ मुके झाले तरी डोळे बोलत होते. त्या डोळ्यांची भाषा आईला स्पष्टपणें कळत होती. ते म्हणत होते, 'आईला सुखी करणें हें मुलाचें कर्तव्य आहे हें मला कळतें ! पण या कर्तव्यापेक्षां दुसरें एक श्रेष्ठ कर्तव्य आहे—तें मला हाक मारतेंय् ! आई, जाऊं दे मला ! आई, तूं मला जाऊं दिलें नाहींस, तर–तर माझ्या मनांत तुझ्याविषयीं तिटकारा उत्पन्न होईल—तुझी चीड येईल मला—जन्मभर मी तुझा द्वेष करीन. आई तें तुला आवडेल का ?'

टोनीच्या असल्या मूक प्रश्नांना काय उत्तर द्यायचें ?

बाहेर भोंगे कर्कश स्वरानें ओरडूं लागले. शत्रूचीं विमानें बहुधा शहरावर चालून येत असावींत !

त्या भोंग्यांचा आवाज कानांवर पडतांच टोनी ताड्कन् उठून उभा राहिला. त्याचे डोळे भरून आले होते.

काकुळतीच्या स्वरानें तो आईला म्हणाला, "आई, अशी रागावूं नकोस माझ्यावर. पण माझ्याबरोबरचीं सारीं मुलें गेलीं असतील नी मी मात्र—मी आतां मोठा झालोंय् आई!"

त्याला घट्ट पोटाशीं धरून त्याच्याकडे पाहत आई म्हणाली, "आईचें हृदय तुला कळायचें नाहीं, बाळ! नी आईच्या डोळ्यांची तर तुला कधींच कल्पना यायची नाहीं! त्या डोळ्यांना आपलें मूल नेहमीं लहानच दिसत असतें. लहान मुलांना कोणी लढायला पाठवीत नाहीं! टोनी, असला भलताच हट्ट करूं नये! लहानपणीं-सुद्धां तूं असाच हट्ट करायचास. कुठें बर्फातच खेळायला जा-कुठं—"

"हें बघ आई—"

"काय बघूं, टोनी? मायेइतकी दुःख देणारी जगांत दुसरी कुठलीच गोष्ट नाहीं याचा खूपखूप अनुभव आलाय मला! आतां तूं तरी-" क्षणभर थांबून ती म्हणाली, "आईचा शब्द मोडून तुला जायचेंच असेल तर खुशाल जा. पण एक गोष्ट लक्षांत ठेव. तूं घरीं परत येशील, तेव्हां तुझी आई कांहीं तुला दिसणार नाहीं!"

डोळ्यांत उभे राहूं पाहणारे अश्रु आवरण्याकरितां आपला ओठ चावीत टोनी म्हणाला, "आई, तुझें दुःख मला कळतें ग! पण—"

त्याचे पुढचे शब्द जिभेवरच राहिले.

कानठळ्या बसविणारे आवाज एकदम ऐकूं येऊं लागले. हजारों मधमाशांचीं पोळीं कोणीं तरी डिवचावींत, शेंकडों सुरुंगांचा एकदम स्फोट होत असावा, भयंकर वादळ घोंगावत असावें आणि खडकावर थाडथाड लाटा आपटत असाव्यात—तसा कांहीं तरी भास त्या दोघांना क्षणार्धात झाला.

आईनें झट्कन् टोनीचा हात धरला. जवळ जवळ ओढतच नेलें तिनें त्याला.

तळघरांत गेल्यावरसुद्धां आईनें टोनीचा हात सोडला नाहीं. ती मनांत म्हणत होती—पाऱ्यासारखे असतात पुरुष! केव्हां हातांतून निसटतील याचा नेम नाहीं!

तळघरांत आल्यावर टोनी अधिकच अस्वस्थ झाला. इकडेतिकडे नजर फिरवून तो आईला म्हणाला, "उंदिर बिळांत लपून राहतात तसा मी—"

आईनें त्याला पुढें बोलूं दिलें नाहीं. मात्र ती मनांत म्हणत होती-वाघ होऊन फुकट मरण्यापेक्षां उंदीर होऊन जगणें कांहीं वाईट नाहीं.

टोनीचें डोकें मांडीवर घेऊन ती तें थोपटूं लागली. त्याच्या लहानपणच्या किती तरी गोष्टी तिच्या डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या. शाळेंतून आल्यावर असाच मांडीवर डोकें ठेवून तो झोंपीं जाई. कधीं कधीं पिटर नी क्रिस्तोफर त्याला मुद्दाम चिडवायचे. दोघे दोन मांड्यांवर बसून त्याला म्हणायचे, "टोनी, आतां आईची मांडी तुला मिळणार नाहीं!" मग टोनी भोकाड पसरायचा! त्या दोघांना दूर लोटून याला मांडीवर घेतलें म्हणजे स्वारी शांत व्हायची नी मग असेच डोळे मिटून—

तिनें टोनीकडे मोठ्या प्रेमानें पाहिलें. त्याचे अस्ताव्यस्त झालेले ते केंस— सकाळीं उठल्याबरोबर तो रेडिओ ऐकायलाच गेला असावा. त्यामुळें रात्रीं झोंपेंत विस्कटलेले केंस साफसूफ करण्याचें भानसुद्धां त्याला राहिलें नसावें!

त्याचे केंस हळुवार हातानें सारखे करीत असतांना आई मनांत म्हणत होती—'लहानपणीं टोनी शाळेंतून परत येई तेव्हां त्याचे केंस असेच विस्कटलेले असत नी त्याचें तोंडसुद्धां—'

तिनें वांकून खालीं पाहिलें. तिला हसूं आलें. लहानपणीं शाळेंतून परत आल्यावर तें जसें धुळीनें भरलेलें असे, तसेंच आतांही—काल संध्याकाळपासून त्याचें चित्तच ठिकाणावर नाहीं! लढाई-लढाई-लढाई—

या तंद्रींतच तिचेही डोळे मिटूं लागले.

ती जागी झाली तेव्हां आपण कुठें आहों हेंच तिला पहिल्यांदा कळेना! मग तिनें हळूच तळघराच्या दारापाशीं जाऊन बाहेरचा कानोसा घेतला—

तोफा-बॉंब-धांवपळ

छे! कसलाच आवाज बाहेर येत नव्हता. सारें कसें शांत होतें! मघाची ती विमानांची वावटळ निघून गेली असावी.

एखाद्या भयंकर स्वप्नांतून जागें झाल्यावर माणसाला हायसें वाटावें तशी तिची स्थिति झाली. अजून आपण टोनीला चहा दिला नाहीं हें तिला एकदम आठवलें.

ती लगबगीनें तळघराबाहेर आली.

चहा करीत असतांना तिचें मन एकसारखें म्हणत होतें—टोनी माझा आहे. दुसऱ्या कोणाचाही त्याच्यावर हक्क नाहीं. तो एवढासा—अगदीं कचकड्याच्या बाळाएवढा होता तेव्हांपासून त्याच्यासाठीं मी जागलें आहें, भागलें आहें, रक्ताचें पाणी करून मीं त्याला जगवलें आहे! तो मला सोडून जाणार नाहीं— आईचा शब्द तो मोडणार नाहीं. ही लढाई संपली, कीं सारें पुन्हां सुरळीत

सुरू होईल! टोनीही तोंपर्यंत मोठा होईल! मग मला सुनमुख पाहायला मिळेल! त्या सूनबाईला मी म्हणेन, 'मुली, मी आतां पिकलें पान झालें; केव्हां गळून पडेन याचा नेम नाहीं. माझा टोनी म्हणजे रत्न आहे. पण लक्षांत ठेव. रत्नें मिळणें जितकें अवघड असतें, त्याहून तीं संभाळणें अधिक अवघड असतें. मागच्या त्या लढाईच्या वेळीं स्वारी निघाली होती—"

चहा तयार होत आला होता. ती धांवतच तळघरांत आली.

टोनी स्वस्थ झोंपला होता. तिनें त्याला हालवून जागें केलें. आपल्याला अवेळीं इतकी गाढ झोंप कशी लागली याचें त्याला आश्चर्य वाटलें. लगेच त्याला आठवलें—गेल्या किती तरी रात्री आपण अंथरुणावर तळमळत काढल्या होत्या. आपल्या मनांत एकसारखा एकच रणसंग्राम सुरू होता—आईचा शब्द मानावयाचा कीं मातृभूमीच्या हांकेला 'ओ' द्यायची? शेवटीं—

त्यानें निराशेनें आईकडे पाहिलें.

तळघरांतून घरांत येतांच तो म्हणाला, "आई, चहा कपांत ओत. तोंपर्यंत मी नवी बातमी काय आहे तेवढी पाहून येतों!"

रेडिओच्या खोलीकडे वळणाऱ्या टोनीचा हात प्रेमळपणानें धरून आई म्हणाली, 'तूं एकटा जाऊं नकोस बाबा. तुझ्या वडिलांची खोली आहे ती! त्या खोलींत पाऊल टाकल्यावर आईची आठवणच होत नाहीं तुला; नी रेडिओ लावल्यावर तर—मग बाहेर जग बुडलें तरी त्याचा पत्ता लागत नाहीं तुला! चल, मीच येतें तुझ्याबरोबर."

आईला खुर्चीवर बसवून टोनीनें रेडिओ सुरू केला. रेडिओवरली बाई म्हणत होती—'मातृभूमीची आपल्या सुपुत्रांना ही शेवटची हांक आहे. तिचा एकच संदेश आहे—उठा, मिळेल तें शस्त्र हातांत घ्या आणि शत्रूचा निःपात करण्याला सज्ज व्हा. आतां नुसता तुमच्या स्वतःच्या जीविताचा प्रश्न नाहीं—नुसत्या वर्तमानकाळाचा प्रश्न नाहीं. या भूमीसाठीं ज्यांनीं आतांपर्यंत आपले प्राण वेंचले, त्यांच्या नांवाला काळिमा लागूं नये म्हणून—या भूमींत उद्यां जे लहानाचे मोठे होणार आहेत त्यांचें कर्तृत्व गुलामगिरीमुळें खुरटून जाऊं नये म्हणून—तुमच्या पराक्रमी पूर्वजांकरितां नी प्रियतम वंशजांकरितां तुमच्या उज्ज्वल भविष्यकाळासाठीं नी त्याहूनही उज्ज्वल अशा भविष्यासाठीं लढायला तयार व्हा! साऱ्या राष्ट्रानें सशस्त्र होऊन लढलें पाहिजे असाच हा विलक्षण प्रसंग आहे!..."

आईच्या कानांवर रेडिओंतील शब्द पडत होते; पण तिचे डोळे टोनीच्या चेहऱ्याकडे होते. त्याच्या मुद्रेवरील कोमलपणा केव्हांच नाहींसा झाला होता. एखाद्या पराक्रमी पुरुषाच्या पुतळ्याप्रमाणें तो दिसत होता आणि त्याच्या कपाळावर मधोमध स्पष्टपणें दिसूं लागलेली ती शीर—

टोनीनें आपल्या पित्याच्या फोटोकडे पाहिलें. फोटोच्या खालीं असलेली ती बंदूकही—

आपल्या पतीचीं सर्व शस्त्रें आपण दुसऱ्या खोलींत कुलुपांत ठेवलीं—फक्त त्याची स्मृति म्हणून ही बंदूक तेवढी येथें राहूं देण्यांत आपण फार मोठी चूक केली, असें आतां आईला वाटूं लागलें. तिनें आपली खुर्ची किंचित् पुढें सरकवली नी टोनीचा हात आपल्या हातांत घेतला.

तिच्या हाताचा स्पर्श होतांच टोनीनें वळून तिच्याकडे पाहिलें. तिचा हात घट्ट दाबीत तो म्हणाला, " आई—"

रेडिओवरील बाई बोलत होती—'गॉर्गन या आपल्या जहाजावरून एक बिनतारी संदेश पाठविला जात आहे. तरी श्रोत्यांनीं क्षणभर...गॉर्गन हें जहाज ...अरे देवा !...'

बोलणारी बाई मध्येंच दुःखानें थांबली. याचा अर्थ उघड होता. गॉर्गन बुडत होतें !

रेडिओवरील बाई पुन्हां बोलूं लागली. पण तिच्या स्वरांत विलक्षण कंप उत्पन्न झाला होता. ती म्हणत होती, 'मी मध्येंच थांबलें याबद्दल श्रोत्यांनीं मला क्षमा करावी. गॉर्गनवर माझा मुलगा आहे !'

गॉर्गनला टॉर्पेडो केव्हां लागला, त्या जहाजावर किती माणसें आहेत वगैरे गोष्टी ती सांगत होती. पण आईला त्या ऐकूं आल्या नाहींत. ती स्थिर दृष्टीनें रेडिओकडे पाहत होती—

तो आवाज आतां तिला यंत्राचा वाटत नव्हता—तो माणसाचा होता—एका आईचा होता. देशाच्या संरक्षणासाठीं चाललेल्या युद्धांत जिचा एक मुलगा या वेळीं समुद्रांत बुडत होता, त्या आईचा तो आवाज होता !

तिचें सांत्वन करायचें—नुसतें सांत्वन ? छे ! तिला धीर द्यायची इच्छा आईच्या मनांत उत्पन्न झाली. पण तिच्यासमोर नुसतें एक बोलकें यंत्र होतें !

रेडिओवरून ती बाई—अंहं, ती आई सांगत होती—'क्षणाक्षणाला गॉर्गन खालीं जात आहे. या वीरमरणाचें स्वागत करणाऱ्या आपल्या सैनिकांची एकच

इच्छा आहे—राष्ट्रगीत ऐकण्याची ! मातृभूमीच्या या शूर सुपुत्रांची हीच शेवटची इच्छा आहे.'

टोनी उभा राहून स्वतःशीं राष्ट्रगीत गुणगुणूं लागला. आईलाही राहवेना. तीही उभी राहिली. टोनीशीं समरस होऊन ती राष्ट्रगीत गावूं लागली.

रेडिओवरील आई बोलूं लागली, 'आज सकाळीं शत्रूचीं विमानें आपल्या शहरावरून गेलीं. त्यांनीं इथें बॉम्ब टाकले नाहींत. पण सारें व्हिला मेडिया गांव त्यांनीं उध्वस्त केलें. या हल्ल्यानें आठशें नागरिक बळी घेतले. या आठशेंत नायकाच काय, पण मुलेंसुद्धां होतीं !'

मुलें ? टोनीसारखीं मुलें ?

आईच्या डोळ्यांपुढें कोणी तरी हे शब्द अग्निज्वाळांनीं लिहिल्यासारखे नाचत उभे राहिले.

रेडिओवरील आई बोलत होती. आतां तिच्या स्वरांत मूर्तिमंत कारुण्य भरलें होतें. ती म्हणत होती - 'साऱ्या जगाला आमची विनंती आहे–साऱ्या सज्जनांना आमची प्रार्थना आहे—जगांतल्या माणुसकीला आमचें आवाहन आहे—आज सकाळीं शत्रूच्या विमानांनीं आमच्या बोर्गो नांवाच्या खेड्यावर हल्ला केला. त्या खेड्यांतल्या शाळेवर बॉम्ब टाकले त्यांनीं. शाळेंतून पळून जाणाऱ्या मुलांवर मशीनगन्सचा मारा करण्यांत आला. ऐशीं मुलें जखमी झालीं. एकोणीस मुलें गोळ्या लागून दगावलीं. तीस मुलांचे राईराई एवढे तुकडे झाले—'

आईच्या डोळ्यांपुढें तीं सारीं हसरींनाचरीं लहान मुलें उभीं राहिलीं. आपलीं मुलें लहानपणीं जशीं होतीं तशींच–टोनीसारखीं असलेलीं तीं मुलें–विसकटलेले केंस, धुळीनें भरलेले चेहरे–किती कोमल, निष्पाप—

इतक्या क्रूरपणानें या निरपराधी जीवांची हत्या करणाऱ्या शत्रूला—

तिनें टोनीकडे पाहिलें.

तो म्हणत होता, " आई ! "

आई ताड्कन् उठली. भिंतीवरली बंदूक तिनें खस्कन् ओढून घेतली आणि ती टोनीच्या हातांत देत ती आवेशानें उद्गारली,

" जा–जा "

( कॅरेल कॅपेक् याच्या ' दि मदर ' या नाटकाच्या आधारें. )

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

**वि. स. खांडेकर**

१ फुलें आणि दगड १।।।
२ घरट्याबाहेर १।।।
३ पहिलें प्रेम (आ. दुसरी) ३
४ जळलेला मोहर ३
५ क्रौंचवध ४
६ सायंकाल (आ. दुसरी) २।।
७ अविनाश १।।।
८ मंदाकिनी १।।।
९ सहा भाषणें २
१० कलिका २।
११ स्त्री आणि पुरुष २
१२ पांढरे ढग ४।

**ग. त्र्यं. माडखोलकर**

१ अवशेष २
२ नागकन्या २
३ माझी नभोवाणी २
४ नवे संसार (जप्त) ४
५ चंदनवाडी ६।।
६ व्यक्तिरेखा २।

**ना. धों. ताम्हनकर**

१ तात्या भा. १ ला २।।
२ तात्या भा. २ रा ३
३ निवाडे भा. १ ला २।।
४ चकमकी १।।
५ वच्चा नवरा १।।

**चिं. वि. जोशी**

१ आणखी चिमणराव (आ. २री) ४
२ नवें भारूड २
३ स्टेशनमास्तर २

**साने गुरुजी**

१ पुनर्जन्म २।।
२ आस्तिक २।।

**दत्तु बांदेकर**

१ सख्या हरि १।।।
२ नवी आघाडी १।।

**द. र. कवठेकर**

१ अपुरा डाव ३
२ रेशमाच्या गांठी ३
३ आभाळाची सांवली ४

**वा. म. जोशी**

१ स्मृति-लहरी २
२ विचार-लहरी २।
१ नवें जग ?-पु. य. देशपांडे २।।
१ रॉयचरित्र-भाई बेके १।।

**वि. स. खांडेकर (परिचय लेखक)**

१ काव्यज्योति १
१ पारंव्या आनंदीबाई जयवंत १।।

**लक्ष्मण० सरदेसाई**

१ ढासळलेले बुरूज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

१ व्यक्तिचित्रें २।।
१ फसगत-ना. ह. आपटे १।।
१ साखरपुडा-प्र. के. अत्रे १।।

**कृष्णाबाई मोटे**

१ मीनाक्षीचें जीवन २।
१ चलतीं नाणीं-र. गो. सरदेसाई २

**रा. श्री. जोग**

१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८
१ हितपत्रें-ना. स. पटवर्धन ३
१ बेबीची वहाण वि. वि. बोकील ३
१ ग्रह आणि तारे-सत्यग्राही ४।।

**अनंत काणेकर**

१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३

**काकासाहेब कालेलकर**

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १।।

**य. दि. पेण्ढरकर**

१ प्रापंचिक पत्रें ३
१ स्टॅलिन-वि. म. भुस्कुटे ३।।

**कमलाबाई टिळक**

१ आकाशगंगा २।।

# देशमुख आणि कंपनीचीं आगामी प्रकाशनें

**वि. स. खांडेकर**

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ चल थै राणी
४ विसावें शतक
५ तिसरी भूक
६ वर्षाकाल
७ छाया भाग १–२
८ वालुका
९ कालचीं स्वप्नें
१० चार भिंती
११ मंजिऱ्या
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ वा. म. जोशी ( व्यक्ति आणि वाङ्मय
१४ फुलें आणि कांटे
१५ पहिली लाट
१६ कल्पलता

**ग. त्र्यं. माडखोलकर**

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ति उदयन
५ ऊर्वशी

**द. र. कवठेकर**

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
४ आग आणि पाणी

**कुसुमावतीबाई देशपांडे**

१ मोळी

**ना. धों. ताम्हनकर**

१ दाजी भा. १ ला
२ निवाडे भा. २ रा
३ अनेक आशीर्वाद
४ गुजाताई
५ शेजारी

**य. दि. पेण्ढरकर**

१ घायाळ

**प्र. के. अत्रे**

१ ललितवाङ्मय
२ ‘ मी ’ कसा झालों ?

**कृष्णाबाई मोटे**

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली

**काकासाहेब कालेलकर**

१ स्मरण यात्रा

**अनंत काणेकर**

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे
२ पिकलीं पानें ( आ. दुसरी )

**चिं. वि. जोशी**

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा

**दत्तु बांदेकर**

१ हिरवी माडी

**ना. ह. आपटे**

१ साजणी

**शकुंतलाबाई परांजपे**

१ भिल्लिणीचीं बोरें

# खांडेकर–वाङ्मय

## कथासंग्रह

नवचन्द्रिका ( दुसरी आवृत्ति )
समाधीवरलीं फुलें ( ,, )
पाकळ्या ( ,, )
पूजन ( दुसरी आवृत्ति लवकरच प्रसिद्ध होईल )
नवमल्लिका ( ,, )
नवा प्रातःकाल ( ,, )
पहिली लाट ( ,, )
दत्तक व इतर गोष्टी
जीवन-कला
ऊनपाऊस
दंव-बिन्दु
विद्युत्प्रकाश
अबोली
फुलें आणि दगड
सूर्यकमळें
वरद्यावाहेर
कल्चर्ड मोतीं
कलिका
स्त्री आणि पुरुष

## लघु–निबंध

वायुलहरी ( दुसरी आवृत्ति )
सायंकाल ( ,, )
चांदण्यांत
अविनाश
मंदाकिनी

## कादंबऱ्या

कांचनमृग ( दुसरी आवृत्ति )
दोन ध्रुव ( ,, )
उल्का ( ,, )
हिरवा चांफा ( ,, )
दोन मनें ( ,, )
पांढरे ढग ( ,, )
पहिलें प्रेम ( ,, )
क्रौंचवध ( दुसरी आवृत्ति लवकरच प्रसिद्ध होईल )
हृदयाची हांक ( ,, )
रिकामा देव्हारा ( ,, )
सुखाचा शोध ( ,, )
जळलेला मोहर

## विविध

रंकाचें राज्य ( नाटक )
वनभोजन ( टीका )
धुंधुर्मास ( ,, )
गडकरी ( व्यक्ति आणि वाङ्मय )
आगरकर ( ,, दुसरी आवृत्ति लवकरच प्रसिद्ध होईल )
सहा भाषणें ( अध्यक्षीय भाषणें )

## बोलपट

छाया
ज्वाला
देवता
सुखाचा शोध
माझं बाळ
धर्मपत्नी ( तेलगू )
अमृत
संगम
तुझाच
लग्न पहावं करून
सरकारी पाहुणे
} मूळ कथानक-प्रो. चिं. वि. जोशी

# खांडेकर-वाङ्मय

## अनुवादित खांडेकर वाङ्मय

| | |
|---|---|
| दोन ध्रुव | ( गुजराती, कानडी ) |
| दृष्टिलाभ | ( कथासंग्रह-कानडी ) |
| क्रौंचवध | |
| ( हिंदी, गुजराती व तामीळ अनुवाद छापत आहेत ) | |
| रिकामा देव्हारा | ( तामीळ ) |
| सुखाचा शोध | ( ,, ) |
| पहिलें प्रेम | ( ,, ) |
| उल्का | ( ,, ) |
| जळलेला मोहर | ( ,, ) |
| घरट्यावाहेर | ( ,, ) |

## खांडेकर-वाङ्मय : लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

पहिल्या वहिल्या
गोकर्णींचीं फुलें
मराठीचा नाट्यसंसार
बुद्ध आणि हिटलर
अश्रु
फुलें आणि कांटे
कल्पलता
वालुका
विसावें शतक
वा. म. जोशी ( व्यक्ति आणि वाङ्मय )
तिसरी भूक